
ती ज्योत क्रांतिची तरंगली सिंधूंत
अन् किरणशलाका भरे बिंदु बिंदूंत...



ऑगस्ट
सप्टेंबर
१९६१

५० न.पैं.

# माणूस



पुणें दिनांक १२ जुलै १९६१
मुठेच्या पुराची व्याप्ति
दुपारी तीन ते चार
मुठा नदी
सूचि
नदी
२० ते ३० फूट [दोन मजले]
१० ते २० फूट [एक मजला]
१० फुटा पेक्षा कमी
सिव्हिल कोर्ट
शिवाजीनगर
प्रभात रोड
कर्वे रोड
शनिवार पेठ
शनिवार वाडा
मंगळवार पेठ
मंगळवार हॉस्पिटल
सोमवार पेठ
लक्ष्मी रोड
कुमठेकर रोड
सिटी पोस्ट
मंडई
नातुबाग
टिळक मंदिर
नवी पेठ रस्ता
रास्ता पेठ

— वर्गणीसंबंधीं —

वार्षिक वर्गणी ५ रु. किरकोळ अंक ५० न. पै.
वर्गणी मनीऑर्डरीनेच पाठवावी.

पत्ता बदलावयाचा असल्यास नव्या पत्त्यासोबत जुना पत्ताहि लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**' माणूस ' मराठी मासिक पत्र,**
**४१९ नारायण पेठ, पुणें २.**

( पान २ वरून )

आधुनिक काळांत तर अशा संकटाचा धोका वाढलाच आहे. आपण एका नव्या विज्ञानयुगांत वावरत आहोंत. पंचमहाभूतांना आपण आपल्या सुखसोयींसाठीं व सत्ताभिलाषेच्या पूर्तीसाठी राबवीत आहोंत; आणि कधीकाळी होणाऱ्या या पंचमहाभूतांच्या उद्रेकांना तोंड देण्याची मात्र आपली सिद्धता नाही. सुखसोयींबरोबर जबाबदाऱ्याहि ओघानेच आल्या या जबाबदाऱ्या. आमच्यापैकी कोणीही सम्यक् रीतीने ओळखल्या नाहीत हाच या पानशेत प्रलयाचा खरा बोध आहे. पानशेत धरण पुण्यापासून २५ मैलावर आहे. धरणाची थोडीफार तरी कामचलाऊ माहिती आम्हांला असती तरच ' हें धरण फुटणें ' याचा नेमका अर्थ आमच्या चटकन् ध्यानांत येऊं शकला असता. अशी माहिती पुण्यांतील किती सुशिक्षितांना होती ! खुद्द आम्हीही याबाबत पूर्ण अज्ञानी होतों हें प्रांजलपणें येथे कबूल केलेंच पाहिजे. योग्य त्या किमान जाणीवेचा अभाव असला म्हणजे पुढच्या उपाय योजनेच्या कृतींतहि उणेपणा राहणार हें उघडच आहे. हे धोके भावी काळांत टाळावयाचे असतील तर यासाठी जनतेच्या सामान्य ज्ञानाची पातळी प्रयत्नपूर्वक वाढविण्याचा आपण सर्वांनीं निश्चय केला पाहिजे. विशेषतः ही जबाबदारी प्राध्यापक, लेखक, संपादक, प्रकाशक, शिक्षक इत्यादि सुशिक्षितांच्या वरच्या थरांत वावरणाऱ्या सर्वांची आहे. विज्ञानयुगाच्या या नैतिक व सामाजिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी हा सुशिक्षित समाज पुढे आला तर पानशेत प्रलयांतून एक नवीन समाजसृष्टी येथे निर्माण होईल. सुशिक्षित समाज या नवनिर्माण कार्याचें हें आवाहन स्वीकारील काय ?

★ ★ ★

— अभिराष्ट्रेण वर्धताम् —




संपादक
श्री. ग. माजगांवकर

वर्ष १ लें ) ऑगस्ट – सप्टेंबर १९६१ ( अंक ३–४

संपादकीय

# विज्ञानयुगाच्या जबाबदाऱ्या

**एखाद्या** संघटनेने जनतेचें नेतृत्व करणें याचा अर्थ योग्य त्या वेळीं योग्य ती कृति जनतेकडून करवून घेणें असा आहे. यासाठी काळाचा उमज, कृतीची निश्चित योजना व जनतेशी घनिष्ठ संबंध असणारी यंत्रणा या तिन्ही गोष्टींची आवश्यकता आहे. या तिन्ही गोष्टी ज्या संघटनेजवळ असतात त्याच संघटना आणिबाणीच्या प्रसंगीं जनतेला संकटाची योग्य ती जाणीव देऊं शकतात व त्यांतून बाहेर पडण्याचा मार्गहि दाखवित असतात. दि. १२ जुलैच्या पानशेत प्रलयाच्या भयंकर आपत्तीचें वेळीं एकाहि संघटनेने पुणेकर जनतेचें या अर्थाने नेतृत्व केलें नाही, हा एक खेदजनक अनुभव याविषयीं लिहितांना नमूद करणें अवश्य आहे. ' पानशेत धरण फुटणार किंवा फुटलें आहे; संकटाचें स्वरूप याप्रमाणें भीषण आहे; उपाययोजनेचा हा आराखडा ' एवढ्या स्पष्ट स्वरूपांत कोणत्याहि संस्था–संघटनांनी जनतेला प्रसंगाची जाणीव दिली नाही. पूर ओसरल्यावर मात्र महाराष्ट्र मंडळ, बालवीर संघटना, राष्ट्र सेवा दल, रा. स्व. संघ, निरनिराळ्या तालमी या संघटनांनी पूरग्रस्तांना संघटितरीत्या बहुमोल मदत केली हें खरें आहे; पण वर दिलेल्या अर्थांने जनतेचें नेतृत्व करण्यासाठी एकहि संघटना आघाडीवर आली नाही हेंहि तितकेंच खरें आहे.

जी यंत्रणा सर्वांत जास्त संघटित, सर्वांत जास्त सत्ताधारी, सर्वांत जास्त प्रभावी तीच नेमकी या संकटकालांत प्रथम कोलमडून पडावी, हा प्रकार मोठा विस्मयजनक वाटला तरी तो शंभर टक्के सत्य आहे. ही यंत्रणा म्हणजे आमचें सरकार. पहिल्या दोन – तीन दिवसांत तरी पुण्यांत ' सरकार ' ही चीजच अस्तित्वांत नव्हती. जीवितवित्ताच्या सुरक्षिततेसाठी जी संस्था आम्ही मानवांनी मोठ्या विश्वासाने स्थापन केली तीच संस्था आमचें जीवितवित्त धोक्यांत आलें असतां आमच्या मदतीला धावून येऊं शकली नाही. आमची होत असलेली दैना व हानी असहाय्यपणें पाहत बसण्याचें नाकर्तेपण या यंत्रणेच्या वाट्यास यावें हा अपेक्षाभंगाचा केवढा दारूण प्रसंग आहे ! असें कां घडलें व नेहमीच कां घडतें हें पाहिलें पाहिजे. एखाद दुसऱ्या अधिकाऱ्याच्या लायकीनालायकीचा हा वाद नसून सर्व यंत्रणाच आणीबाणीच्या वेळीं कां पांगळून जावी हा मूलभूत प्रश्न आहे. अमर्याद केंद्रीकरणामुळे या यंत्रणेचें स्वरूप सध्याच्या काळांत अत्यंत परावलंबी झालेलें आहे. नियम आणि उपनियम यांच्या चाकोरींत यंत्रणेचा प्रत्येक घटक जखडून बांधला गेला असल्यामुळे लहान-मोठ्या सर्वच घटकांची

मुखपृष्ठ १९४२ मधील स्वातंत्र्य लढ्यांत बिहार विधानसभेच्या इमारतीवर निशाण रोवण्याच्या प्रयत्नांत मृत्युमुखीं पडलेल्या हुतात्म्यांचें बिहार विधानसभेसमोरील स्मारक. रेखाचित्रकार—दत्ता महाबळेश्वरकर

स्वयंनिर्णयाची शक्ति पूर्ण नाहीशी होत चालली आहे. प्रत्येकजण नियमांचें कांटेकोर पालन करतो; परंतु प्रसंगाला साजेसें वर्तन कोणाच्याच हातून वेळेवर घडत नाही. वरिष्ठांच्या आदेशाचें परिपालन करण्याची व नियमांची चाकोरी सहसा न सोडण्याची ही 'धोका टाळू' वृत्तीच आणिबाणीच्या प्रसंगी सर्व यंत्रणेला 'धोका' देते आणि अनमानधक्क्याने कोणीतरी एखादा 'क्ष' अधिकारी जनतेच्या रोषास सकारण-अकारण बळी पडतो. वास्तविक सर्व यंत्रणेंत पोसल्या जाणाऱ्या गुलामी परावलंबित्वाचा हा एक सामुदायिक पराभव असतो. एखाद्दुसऱ्या अधिकाऱ्याला फांसावर टांगण्याच्या 'शॉक ट्रिटमेंट' ने यंत्रणेतील हा मूळ दोष जाईल ही अपेक्षा करणेंच चुकीचें आहे.

दुसरा दोष म्हणजे यंत्रणेचा बेसुमार व्याप. यंत्रणेच्या अवाढव्य पसाऱ्यामुळे यंत्रणेच्या निरनिराळ्या घटकांचा एकमेकांशी असावा असा सांधा जमलेला नसतो. एका व्यापक संघटनेचे आपण लहान लहान घटक आहोत व एकमेकांना पूरक ठरतील असेच आपले संबंध असले पाहिजेत ही सामुदायिक जबाबदारीची भावना या अस्ताव्यस्त पसरलेल्या घटकांमध्यें निर्माणच होत नाही. जो तो आपल्या खात्यापुरता व त्यांतही आपल्या जागेपुरताच विचार करतांना आढळतो. त्यामुळे खात्याखात्यांतील धोरणांत व कार्यक्रमांत अनेकदा हास्यास्पद विसंगती व विरोध यांचें दर्शन घडून येतें. मानपानांच्या व शिष्टाचारांच्या आडवळणांमुळे खात्याखात्यांतील संबंध दुरावतात व प्रसंगविशेषीं किमान सहकार्य देण्याघेण्याची शक्यताहि नाहीशी होते. पानशेतधरणावर काम करणारें बांधकामखातें व लष्करखातें, खडकवासल्याचें पाटबंधारे खातें, पुण्यांतील पोलीस खातें, नभोवाणी व प्रसिद्धी खातें, या सर्वांचे निकटचे संबंध असते व नेहमी एकत्र विचारविनिमय करण्याची कांही पूर्वपरंपरा या भिन्नभिन्न घटकांमध्ये रूढ झालेली असती तर पानशेतच्या आपत्तीची भयानकता निश्चितच कमी करतां आली असती. हीं सर्व खातीं आणिबाणीच्या प्रसंगींदेखील एकत्र येऊं शकलीं नाहीत यावरून त्यांच्यातील अंतर किती दुरावलेलें आहे याची थोडीफार कल्पना येऊं शकते. बारा जुलैच्या सकाळी ७ वाजतां पानशेतची काळनदी मृत्युचे घांस गिळत गिळत पुण्याकडे रोरावत निघाली असतां पुण्याची आकाशवाणी बिस्मिल्लाच्या मंजुळ व मुलायम सनईवादनांत मशगुल असूं शकते या विसंगतीचा एरव्ही अर्थच लागूं शकत नाही.

यंत्रणेचा तिसरा दोष म्हणजे तिची जनतेपासून झालेली पूर्ण फारकत. जनतेच्या अडीअडचणी, अपेक्षा, गरजा यांचा विचार त्रयस्थाच्या उदासीन व बेफिकीर भूमिकेवरून करण्याच्या संकुचित प्रवृत्तीमुळे लोकांच्या विश्वासास ही सर्व यंत्रणा पात्र ठरूं शकत नाही. यंत्रणेला लोकांच्या हिताची खरी कळकळ नाही आणि लोकांचा यंत्रणेवर विश्वास नाही. अशा अवस्थेंत आणिबाणीच्या प्रसंगीं यंत्रणेला लोकांचें सहकार्य चटकन् उपलब्ध होईल व सरकार आणि जनता यांच्या एकदिलाच्या कृतीमुळे संकटाचा नेटाने प्रतिकार होईल ही गोष्ट संभवनीय नाही. '*पानशेत धरण फुटलें* आहे; खडकवासलाहि फुटण्याचा संभव आहे. नागरिकांनी मौल्यवान् चीजवस्तु घेऊन सुरक्षित स्थळीं जावें' ही खडखडीत व स्पष्ट जाणीव कांही शेवटपर्यंत लोकांपर्यंत पोचली नाही. कारण काय? तर म्हणे अशा जाणिवेमुळे लोकांमध्यें घबराट निर्माण झाला असतां अशी भीति सरकारी अधिकाऱ्यांना वाटली! सरकारी अधिकारी व जनता परस्परांपासून किती दूर आहेत याचें हें प्रत्यंतरच आहे! पोलिस व्हॅन्समधून लाउडस्पीकरच्या सहाय्यानें ओरडत सुटणें हाच एक मार्ग अधिकाऱ्यांच्या डोळ्यासमोर आला काय? धरण फुटल्याचें समजतांच हजर असणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रमुख नागरिकांची तांतडीची सभा घेतली असती, सर्वांच्या सहीचें एखादें पत्रक काढून तें खांबाखांबावर लावण्याची व्यवस्था केली असती, पेठापेठांतून प्रमुख नागरिक व अधिकारी संकटाची जाणीव देत हिंडले असतें तर घबराट होण्याचें कारणच पडलें नसतें. परंतु नागरिकांना बोलवावें, विश्वासांत घ्यावें हा पर्याय नोकरशाही यंत्रणेच्या विचारकक्षेत बसत नाही. पुढे पुनर्वसन कार्यात या मार्गाचा अवलंब नोकरशाहीला करावाच लागला की नाही? मग तो याचवेळीं कां करतां येऊं नये? पण नाईलाज झाल्यावरच आपली चाकोरी सोडायची असा या घट्ट यंत्रणेचा शिरस्ता असल्याने संकटाची चाहूल आल्यावरच तिने जागें व्हावे हें कसें योग्य आहे?

सरकारी यंत्रणेच्या सामुदायिक पराभवाची चिकित्सा करीत असतां आपण इतर संस्था व समाजांतील जबाबदार घटकांनी दाखविलेल्या उणीवांकडेहि डोळझाक करून चालणार नाही. चौसष्ट नगरपित्यांपैकी चार किंवा पांच नगरपित्यांनी या कालावधींत तळमळीने कार्य केल्याचें पुरावे आम्हाला उपलब्ध होऊं शकले. इतरांच्या खात्यावर मात्र 'बाकी येणें' फारच निघत आहे. वृत्तपत्रें हा दुसरा जबाबदार घटक. पानशेत धरण फुटल्याची बातमी सकाळीं ७॥-८ पर्यंत बहुतेक सर्व प्रमुख वृत्तपत्रांना समजली होती किंवा समजणें जरूरच होतें. हातीं असलेल्या यंत्रसामुग्रीच्या बळावर कोणीहि संपादक वीतभर लांबीचा जादा अंक काढून धरण फुटल्याची व नागरिकांनी मौल्यवान् जिनसा घेऊन सुरक्षित स्थळीं जाण्याची सूचना देऊं शकत होता. पुढे सरकारी यंत्रणेवर कडाडून हल्ला करण्याची जणू या संपादक वर्गांत चढाओढच लागून राहिली होती; पण आपल्या उणीवेची जाणीव होऊन एकहि महाभाग व्यथित झाल्यासारखा दिसला नाही. धरण फुटल्याचें समजतांच कोणी आपला कागद वांचविण्याच्या धडपडीला लागला तर कोणी कामगार हाताशी नाही म्हणून स्वस्थ राहिला. जणु चार ओळी जाड टाईपांत कंपोज करायला कामगारांच्या फौजाच लागणार होत्या आणि ताशी चाळीस पन्नास हजार अंक छापूं शकणारीं सर्व लहानमोठीं यंत्रे यासुमारास नादुरुस्त होतीं! पुण्याच्या शिक्षणसंस्था म्हणजे पुण्याचा मानबिंदूच. पण कांही शाळाचालकांनी पाणी आल्याचें समजतांच शाळेंतील लहानमोठ्या सर्व विद्यार्थ्यांना बेजबाबदारपणें जें सोडून दिलें त्याबद्दल अनेक संतप्त पालकांच्या लेखी तक्रारी आमचेकडे दाखल आहेत. पाणी ओसरल्यावरहि आठ-आठ तास मुलांच्यां शोधासाठी पालकांना जीव मुठींत धरून हिंडावें लागत होतें ही गोष्ट आमच्या मानबिंदूंच्या परंपरेला शोभणारी आहे काय?

ह्या गोष्टी कोणी हेतुपुरःसर करीत नसतो हेंहि तितकेंच खरें. अशा तऱ्हेचे आणिबाणीचे प्रसंग नेहमी येत नसतात; त्यामुळे कधीकाळी ते अचानक उद्भवले तर आपली कर्तव्यें काय, आपण कोणत्या दिशेने काम केलें पाहिजे याचा बोध चटकन् होत नाही. पण अशीं संकटें येऊं नयेत अशी अपेक्षा व्यक्त केली तरी ती येणारच नाहीत असें गृहीत धरून वागणें मात्र वेडेपणाचें ठरणार आहे.

(पान १ वर)

# पानशेत! नवमहाराष्ट्राची ही प्रयोगभूमि ठरो! ...

ले. : श्री. एस्. बी. जोशी, स्थापत्यविशारद् मुंबई

### जनतेला विश्वासांत घ्यावे

जुलैच्या बारा तारखेला पुण्यापासून तेवीस मैलांवरील पानशेतचें धरण फुटून पुण्याचा बराच भाग पाण्यांत बुडाला. दिवसाची वेळ असल्यामुळे व महाराष्ट्रांतील बऱ्याच तरुण लोकांना पोहतां येत असल्यामुळे बरेच जीव बचावतां आले. प्राणहानी त्यामानाने थोडी झाली. वित्तहानी मात्र अपरिमित झाली. साहजिकच अखिल महाराष्ट्रांत धरणाचें कामाबद्दल कुतूहल व थोडीबहुत भीतीहि निर्माण झाली. अनमानधक्याने साधारण माणसाला असें वाटणें साहाजिक आहे की, मातीचें धरण दगड-सिमेंटच्या कामापेक्षा कच्चें असणारच. तेव्हा मातीचें धरण बांधलें व तेंदेखील एवढ्या पावसाळी भागांत हीच खरी चूक. इतर कांहीजण म्हणतील की, सगळे इंजिनियर खातें कुचकामी लोकांचें आहे. त्यांच्या कामाच्या कुचराईमुळेच धरण फुटलें असेल. एकंदरीत काय, एवढ्या मोठ्या अपघाताने तरी जनतेमध्यें इंजिनियर लोकांच्या कामाची चर्चा व काय असावें, काय नसावें याबद्दल तांत्रिक मार्गदर्शन होऊं लागलें. या अपघाताचा थोडासुद्धा विचार मनांत आला कीं, प्रत्येक स्थापत्याविशारदाला खंत वाटते. आपण महान् अपराधी आहोंत असा देखील विचार येतो. अशीं मोठालीं कामें एका माणसाच्या कल्पनेंतून निघत नाहीत. त्याला-पांच-पंचवीस माणसांचा विचारविनिमय व्हावा लागतो. तेव्हा दोष घ्यावयाचाच तर तो स्थापत्यांतील सर्व व्यवसायबंधूंनी सारखा वांटून घ्यावयास पाहिजे. प्रत्येकाने आपल्या वांटणीचा एक चाबूक मुकाट्याने सहन करावयास पाहिजे. अशा तऱ्हेचे अपघात मुद्दाम कोणी घडवत नाही. कांही तरी हिशेबांत न धरलेली किंवा आयत्यावेळी हिशेबांत धरतां न येण्याजोगी एखादी घटना झाली असली पाहिजे हें उघड आहे. स्थापत्यविशारद आपल्यापैकीच माणसे आहेत व त्यांना नाउमेद न करतां त्यांचेकडून बेडरपणें मोठमोठीं कामें करवून घेतलीं पाहिजेत व महाराष्ट्राची शूरपणाबद्दलची परंपरा लढाईंतच काय पण विधायक कार्यांतहि कायम टिकविली पाहिजे, अशी जाणीव जनतेला कालांतराने झाल्याशिवाय राहणार नाही. कारण भेकडपणा महाराष्ट्रांत कधीहि नव्हता व कधीहि डोकावणार नाही. भेकडपणाचा आपला पिंडच नाही. सर्वच गेलें असतांनासुद्धा महाराष्ट्रांतील जनतेचा स्वाभिमान व बेडरपणा दिसतो तोच महाराष्ट्राचा खरा आत्मा आहे. जनतेची एवढी मात्र अपेक्षा असणारच की, इंजिनियर लोक आमच्यातर्फे निसर्गाशी जी टक्कर देत असतात—जी लढाई करीत असतात—त्याबद्दल आम्हास इंजिनियर मंडळींनी मधून मधून विश्वासांत घ्यावें. काय चाललें आहे, त्यांत हेतू काय, त्यांत धोके काय आहेत हें जनतेला कळावें.

या दृष्टीने आपल्या वर्तमानपत्रांतून, मासिकांतून, सभा-सम्मेलनांतून, खाजगी संभाषणांतून केवळ राजकारण व समाजकारण याचीच जी चर्चा चालते त्या पद्धतींत फरक पडला पाहिजे. स्थापत्याचीं कामें हा देखील जनतेला जिव्हाळ्याचा व कळणारा विषय वाटला पाहिजे.

पानशेतच्या अपघाताचीं तांत्रिक कारणें काय आहेत याबद्दलची अधिकृत चौकशी लवकरच चालू होईल. शिवाय अधिकृत माहितीच्या अभावी अर्धवट मत बनविणेंहि योग्य होणार नाही. पण तरीदेखील पानशेत धरणाच्या अपघातापासून सामान्यपणें काय धडे घ्यावयाचे ते ठरविण्यास अधिकृत चौकशीच्या निर्णयाची वाट पाहण्याचें कारण नाही. पानशेतच्या अपघातापासून सामान्यपणें आपल्याला हे धडे शिकतां येतील—

### अपघाताचे धडे

(१) आधुनिक यांत्रिक युगांतील अपघातांचें स्थान आपण ध्यानांत घेतलें पाहिजे. (२) अपघात कां व कसा झाला याची शास्त्रीय मीमांसा झाली तरच पुष्कळसे अपघात टाळतां येतील. (३) मोठालीं कामें करण्यास आपल्या तांत्रिक शिक्षणाला संशोधनाची हि पार्श्वभूमि पाहिजे. मी महाविद्यालयांत किती धडे शिकलों याला महत्त्व नसून, 'कां' व 'कसें' असें प्रश्न सुचून माझी जिज्ञासा वाढते की नाही व प्रयत्नाने मी माझ्या जिज्ञासेचें समाधान करूं शकतों की नाही, हा शिक्षणाचा खरा निकष असावा. म्हणजे केवळ तांत्रिक विद्येची उसनवारी करून आता चालणार नाही. (४) जनतेच्या ज्ञानाची पातळी वाढली, की त्याचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे सगळें वातावरण बदलतें. मजूर, तंत्रज्ञ व स्थापत्यविशारद यांच्या ज्ञानाची व अनुभवाची पातळीहि वाढते (५) मोठाल्या कामाची यंत्रणा शुद्ध पायावर उभी असली पाहिजे. पुरातन काळीं एका कामास दहा-बारा वर्षें लागत. आता तेव्हापेक्षा अवाढव्य कामें यथावत् शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून

एक-दोन वर्षांत पुरी करावयाचीं असतात. तेव्हा जुनी यंत्रणा त्या कामांना कशी पुरी पडणार? (६) सरकारी अधिकारी व जनता यामधील अंतर कमी झालें पाहिजे. (७) धरणें मातीचीं की दगडाचीं बांधावींत याचा निर्णय शास्त्रीय दृष्टीनेच ठरवावा. केवळ भीतीनें व अंधश्रद्धेच्या भरीस पडून मातीचीं धरणें नकोत असें म्हणण्यांत भ्याडपणा आहे. (८) मोठ्या वस्तींना येणारा धोका काय आहे याची खास चौकशी व तो टाळण्याकरता योजना करावयास पाहिजे. (९) वाईटांतून चांगलें काढण्याची शूर माणसाची प्रवृत्ति असते. तद्वतच पुणें शहराची नवी उभारणी करावयास ही एक मोठी वाहून आलेली संधी आहे असें जाणून योग्य ती योजनापूर्वक शास्त्रीय आंखणी करावी.

(१) पूर्वीच्या काळीं शहरांत गाडीखालीं एखादा माणूस मेला तर त्याचा फार बभ्रा होत असे. हल्ली मुंबई, लंडन, न्यूयॉर्क, टोकियो या सारख्या शहरांत रोज अपघात होतात. त्यामुळे अपघात हे लोकांच्या अंगवळणीं पडलेले आहेत. यांत्रिक युगांत मनुष्याची निसर्गाशीं अव्याहत टक्कर चालू आहे. त्यामुळे शास्त्रशुद्ध पद्धतीने योजिलेल्या कामांतसुद्धा अपघात होतात. टाकोमा पुलाचें उदाहरण घ्या. हा २८०० फुटाच्या एका गाळ्याचा पूल जून १९४० मध्यें पूण होऊन त्यावरून जा-ये सुरू झाली. ताशी १२० मैल वेगाचा वारा आला तरी पुलाला धोका नाही अशी योजना केलेली होती. अवघ्या सहा महिन्यांच्या आंत ताशी ४० मैल वेगाच्या वाऱ्यांतच हा पूल कोलमडला. स्थापत्यविशारदांनी वाऱ्याने पुलावर होणाऱ्या परिणामांचें संशोधन करण्याकरिता बोगदे तयार केले. त्यांत कृत्रिम वायूवर प्रयोग करून नवीन अनुमानें काढलीं व जगाच्या ज्ञानांत भर टाकली. अखेरीस हा पूल नवीन तत्त्वाप्रमाणे योजना करून पुन्हा बांधण्यांत आला कॉंक्रिटचें धरण भक्कम अशी कांही लोकांची समजूत. पण फ्रान्समध्ये दोन वर्षांपूर्वी जगप्रसिद्ध इंजिनियर कॉयने याने योजलेलें कॉंक्रिटचें धरणांत पुरें पाणी भरल्याबरोबर तें कोलमडलें. तीनशेपन्नास माणसें मेलीं आणि एक शहर वाहून गेलें. फ्रान्ससारख्या पुढारलेल्या देशांत दोन वर्षांपूर्वी झालेली ही घटना आहे! तेव्हा अपघात होऊं नयेत म्हणून सावधगिरी घ्यावी पण ते होणारच नाहीत असें समजून चालतां येणार नाही. त्यापासून होणाऱ्या नुकसानींत सर्व जनतेने भागीदार झाले पाहिजे असा लोकशाही समाजवादाचा अर्थ आहे.

(२) आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, अपघातांच्या कारणांची शास्त्रीय मीमांसा करण्याकडे सरकारची प्रवृत्ति नसते. मुख्य भर सरकारचें किती नुकसान झालें व तें कोणाकडून भरून घ्यावयाचें यावर असतो. तें नुकसान भरून मिळालें, कीं, मग सरकारला अपघाताच्या कारणांची फारशी फिकीर वाटत नाही. ही वृत्ति आत्मघातकी आहे. अपघातकी आहे. अपघात लहान असो की मोठा असो, त्याची शास्त्रीय चिकित्सा होऊन तसे अपघात टाळण्याचे प्रयत्न होणें जरुर आहे. हें साध्य प्राप्त होण्यास स्थापत्यविशारदांच्या मनांतील शिक्षेच्या भीतीचें वातावरण गेलें पाहिजे.

### विद्येची उसनवारी नको

(३) आपलीं सध्याचीं कामें अमेरिकेंत तयार झालेल्या स्थापत्य विद्येची उसनवारी करून होतात. अमेरिकेने ही विद्या कोणाकडून घेतली? पुढारलेल्या राष्ट्रांत संशोधन केंद्रांना महत्त्व आहे. स्वतः प्रयोग करून, शास्त्रीय चिकित्सा करून नवीन कामांची उभारणी करतात. अशा कामांमध्यें सर्व राष्ट्रांची एक प्रकारची चढाओढ चालते. आपली मात्र याबाबत सारखी आयातच चालू आहे. जगाच्या ज्ञानांत आपल्याकडून भर पडत नाही. जें ज्ञान स्वानुभवी नाही, जें केवळ पुस्तकी आहे त्याचा उपयोग किती होणार? सुरुवातीस आपण दुसऱ्यावर अवलंबून रहावे हें साहजिक आहे. पण आपल्या कार्याची दिशा तरी अशी पाहिजे, की आणखी कांही दिवसांनी आपल्याकडे संशोधनाचें बी रूजेल. तशा खुणा आज दिसत नाहीत. जपानची १९४० पूर्वीची प्रगति अवघी २५ वर्षांत घडून आलेली आहे. आधुनिक जर्मनी अवघ्या बारा वर्षांत वर आला आहे. हिंदुस्थानांत नाही म्हटलें तरी जवळजवळ १९३७ पासून आपलें राज्य चालू आहे. त्यापैकी गेलीं चौदा वर्षे आपण पूर्ण स्वतंत्र आहोत. या कालावधींत आपली भौतिक प्रगति झाली असली तरी विद्येंत मात्र आपण मागेच आहोंत. समाजक्रान्तीच्या काळांत आपण जुन्या पाऊलवाटा सोडूं शकलों नाही. परदेशांत एकदा सुरू झालेलें संशोधनकेंद्र किंवा शिक्षणसंस्था पांचपंचवीस वर्षांत जागतिक कीर्ती मिळवतात. आमच्याकडे 'इरिगेशन टीचर्स डिव्हिजन' होता तो पुढे बंद केला व आता कोठे नासिक येथे संशोधन केंद्राच्या इमारतीचें काम सुरू झालेलें आहे! आपलें इंजिनियरिंग कॉलेज शंभर वर्षांचें जुनें आहे. त्याची इतकी हेळसांड, की हिंदुस्थानांत त्या कॉलेजला संशोधनकेंद्र म्हणून ओळखतसुद्धा नाहीत. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी, सातारा येथील जनता शिक्षण मंडळ वगैरे संस्था उच्च ध्येयाने निघाल्या हें खरें; पण त्यांच्याकडून शिक्षणक्षेत्रांत क्रांति झाली नाही. त्यामानाने बंगालमध्ये निघालेल्या शिक्षण संस्थांमध्ये शास्त्रीय शिक्षणाची जास्त प्रगति झाली. आपल्या इंजिनियरिंग कॉलेजमधील प्राध्यापकांची प्राथमिक शिक्षकाप्रमाणे एकीकडून दुसरीकडे सारखी बदली होते. त्यामुळे त्याने संशोधनवृत्ति दाखवूंच नये अशीच जणू सरकारी यंत्रणेची इच्छा असावी असें वाटतें! अशा स्थितींत आपल्या स्थापत्यविशारदांना विद्यार्थीदशेंत संशोधनाचें बाळकडू कसें मिळणार? आपल्या तांत्रिक शाळांची परिस्थिति पहा — शेतकऱ्याच्या घरीं इंग्रजी भाषा नाही, विजेचा दिवा नाही, टेंपरेचर, प्रेशर वगैरे शब्द घरांत वापरतील इतपत समाजांत शास्त्रीय शिक्षणाची बैठक नाही; कागद, पेन्सिल व पुस्तकांना पैसे नाहीत. या सर्व परिस्थितीचा विचार करून आमच्या तांत्रिक शाळा चालतात काय? शाळे-

तील प्रयोगशाळाहि जेमतेमच. कारण काय तर म्हणे परदेशी चलन मिळत नाही. इंग्रजी शिक्षण कां, तर म्हणे पारिभाषिक शब्द नाहीत. अशा गोष्टींवर महात्मा गांधींपासून स्फूर्ति घेतलेल्या मंडळींचा विश्वास तरी कसा बसतो? कोणी म्हणेल या शिक्षणांतील दोषांचा व पानशेत अपघाताचा काय संबंध? यावर आग्रहपूर्वक असें म्हणणें भाग आहे, की पानशेतचा अपघात हें आपल्या तांत्रिक शिक्षणांतील चुकीच्या धोरणांचेंच फल आहे. बुद्धिमान् मेकॅनिकला इंग्रजी येत नसेल तर आपल्या सरकारी यंत्रणेंत वरची जागा मिळण्यास वाव आहे काय? प्रवेशपरीक्षेतील इंग्रजीचें स्थान, बुद्धिमान् कामगारांच्या कल्पकतेची हेळसांड, यामुळे आपल्या मोठाल्या कामांवर असे लोक मजुरांप्रमाणे राबत आहेत. नकाशे कितीहि बारकाईनें व शुद्धरीतीनें तयार केले तरी अखेर कामावरचें कसब म्हणून राहतेंच! हें कसब ज्या कामगारांना अनुभवानें प्राप्त होण्यासारखें असतें त्यांचीच हेळसांड होते असा अनुभव आहे. तेव्हा संशोधनाचें व यांत्रिक विद्येचें बीज आपल्या भूमींतच पेरलें पाहिजे व त्याला जेव्हा अंकुर फुटतील तेव्हाच आपण स्वावलंबनाचे मार्गास लागलों असें होईल.

### ज्ञानाची पातळी वाढावी

आपल्याकडे राजकारण, समाजकारण, अर्थकारण या क्षेत्रांत जनतेला जें सामान्य ज्ञान असतें तसें तांत्रिक बाबतींत असत नाही. लोकशाही, मार्क्सवाद, समाजवाद वगैरे विषयांचे 'डोस' समाजास रोज पाजले जातात. पण आपल्या मिनिस्टर मंडळींत, म्युनिसिपल सभासदांत, एवढेंच काय पण प्रत्यक्ष स्थापत्यविशारदांमध्येहि स्वतः बोल्ट-नट फिरवतील, आपली गाडी आपण हाकतील व नीट करतील आणि हातानें काम करण्यांत मोठेपणा मानतील अशीं माणसें किती आहेत? एवढालीं कामें चाललीं आहेत. त्यांचीं गांवोगावीं कायम स्वरूपाचीं प्रदर्शनें कां ठेवलीं जाऊं नयेत? रे इंडस्ट्रीयल म्युझियममध्ये जनतेच्या शिक्षणासाठी अशीं प्रदर्शनें असावीत व सर्व देशभर त्यांचा प्रसार व्हावा अशी पहिल्या क्युरेटरची मनीषा होती. पण ती त्या व्यक्तीबरोबरच नामशेष झाली. त्या कल्पनेची वाढ होण्याचीं लक्षणें आज दिसत नाहीत

(५) मोठमोठीं कामें करतांना जागचे जागीं अडचणी निवारण करून त्यावर त्वरीत उपाय करण्याचे अधिकार पाहिजेत. तसें होण्यास आजची केवळ वेळकाढू यंत्रणा उपयोगी नाही. त्यामुळे मोठ्या कामांवरील सामुदायिक जबाबदारीची जाणीव अधिकारी वर्गांत राहत नाही. प्रत्येक अधिकारी आपापली जबाबदारी सांभाळण्यांत गुंतलेला असतो.

(६) सरकारी अधिकारी व जनता यामध्ये पूर्वीसारखेंच अन्तर राहिलें आहे. सरकारी अधिकारी व खाजगी इंजिनियर यांच्यांत विचारविनिमय किंवा सल्लामसलतीस वाव नाही. भारतांत स्थापत्य विषयक एक मोठी संस्था आहे. स्थापत्यविषयक प्रश्नाची चर्चा व्हावी असा या संस्थेचा हेतू आहे. परन्तु अशा संस्थांत सरकारी अधिकाऱ्यांना चर्चा करण्यास अनुकूल असें वातावरण नाहीं. त्यामुळे अशा संस्था वाढीस लागत नाहीत.

### संशोधन वाढलें पाहिजे

(७) मातीचें धरण पडलें म्हणून पुन्हा मातीचें धरण नको अशी भूमिका घेऊं नये. तसें करण्यांत भ्याडपणा आहे. पुन्हा पूर्ण चौकशीअंती असा निर्णय लागला की, पूर्वीची पद्धत तांत्रिकदृष्ट्या चूक होती तर ती खुशाल बदलावी. परंतु शास्त्रीय दृष्ट्या जर या निर्णयांत चूक आढळली नाही तर जनतेनें पूर्वानुभव जमेस धरून मातीचीं धरणें बांधूं नयेत असा हेका धरूं नये. ८७ वर्षांपूर्वी कॉटन नांवाच्या प्रख्यात इंजिनियरनें इंग्लंडमध्ये एका भाषणांत पुणें शहरास धरण फुटून जीवित व वित्तहानी होण्याचा धोका आहे असें मत प्रदर्शित केलें होतें. या मताचें त्यानें दिलेलें कारण चिंतनीय आहे. तो म्हणतो, एक तर शहराजवळ धरण बांधू नये. तें इतकें लांब बांधावें कीं, कधी धरण फुटलेंच तर त्या पाण्याला अनेक वाटा करून देऊन शहराचें संरक्षण करतां यावें. दुसरें असें कीं, दगड – चुना किंवा कॉंक्रीटचें धरण फुटायचें असेल तर त्याची पूर्वसूचनाहि मिळत नाही. तें निमिषार्धांत फुटतें व पाणी अवघ्या अर्ध्या तासांत शहराचा नाश करूं शकतें. याउलट मातीचें धरण फुटण्यापूर्वी पूर्वसूचना मिळते. तें एकदम कधीच फुटत नाहीं. त्यामुळे जीवित व वित्त यांचें संरक्षण करण्यास वाव मिळतो. स्थापत्यशास्त्रांतील एका अनुभवी माणसाचें हें मत आहे. ह्या चिंतनीय मताचा विचार व्हावयास पाहिजे. न जाणो पानशेत धरण फुटल्यामुळे पुणें शहरावरील भविष्यकाळी एकदम फुटणाऱ्या खडकवासल्याच्या धरणापासून होणारा सर्वनाश टळला! मातीच्या धरणाचें शास्त्र हल्ली झपाट्यानें वाढलें आहे. अमेरिकेंत ५३० फूट उंच, ६२० फूट उंच व ७०० फूट उंच अशीं मातीचीं धरणें होत आहेत. एवढेंच काय पण रशियांत तर ९०० फूट उंचीचें मातीचें धरण योजिलें आहे. तेव्हा कोणत्या प्रकारचें धरण बांधावयाचें तें शास्त्रीय चिकित्सा करून ठरवावें. केवळ भावनेच्या आहारीं जाऊन ठरवूं नये

### धरण हें दारूचें कोठार

(८) आधुनिक धरणकामाच्या विद्येंत पानशेत धरणामुळे सर्व जगाला गिरविण्यासारखा एक धडा आहे. धरणांत एकदा पाणी भरलें की, शत्रू राष्ट्रांकडून किंवा कामांतील कमजोरपणामुळे धरण आठ दिवसांनीं फुटणार आहे असें समजलें, तर आपल्याजवळ धरणाखालील वस्ती वांचविण्याचें कांही तरी साधन असणें जरूर आहे. भरलेलें धरण हें दारूचें कोठार आहे. त्यावर जर आपलें प्रत्येक क्षणाक्षणाला नियंत्रण नसेल तर केवढा धोका निर्माण होईल?

> तेव्हा कोणत्याहि धरणांतील पाणी व विशेषतः शहर वस्तीजवळील धरणांतील पाणी आपल्या मर्जीप्रमाणे कमी करण्याची व वेळप्रसंगी तें पूर्णतया रितें करण्याची खास योजना धरण बांधतेवेळींच केली पाहिजे. हल्लीच्या धरण बांधणींतला हा मोठाच दोष आहे. अमेरिकेंत शहर वस्तीजवळील धरणास अशी अपघातापासून वांचविण्याकरिता व्यवस्था केलेली असते.

(९) शेवटी पुण्याच्या झालेल्या नुकसानींतून पुण्याचें कल्याण व्हावें अशीच सर्वांची इच्छा असणार. नवीन शहररचना अद्यावत् शास्त्रीय दृष्टीनें करावी. म्हणजे घर, पाणी व हवा याबाबत प्रत्येक नागरिकांस सारखाच फायदा मिळावा अशी दृष्टि असावी. योजना अशी करूं नये की, आणखी पांच दहा वर्षांत नवे प्रश्न पुन्हा उभे राहतील. उदाहरणार्थ पुण्याची पाणीपुरवठ्याची योजना ८ लाख वस्ती पुरतीच न करता निदान दहा वर्षांनी २५ लाख वस्तीला पाणी पुरेल अशी करावी.

★ ★ ★

# राष्ट्रीय एकात्मतेची समस्या

लेखक
के. एन्. फडके

जबलपूर येथील जातीय अथवा जमातीय दंगल त्या दंगलीनंतर मुस्लीम परिषदेच्या रूपाने मुस्लीम लीग मनोवृत्तीने धरलेली नवी उभारी, आसाममधील काचार प्रकरण इत्यादि घटनांमुळे भारतावर जातीयतेच्या संकटाची एक नवी व प्रचंड लाट येऊं पहात आहे व त्या संकटाचा एक राष्ट्रीय अरिष्ट म्हणून मुकाबला करण्याची निकड जणू नव्याने निर्माण झालेली आहे अशी ओरड आजकाल विशेषेकरून सत्ताधारी काँग्रेस पक्षाकडून करण्यांत येत आहे. जातीयतेच्या ह्या लाटेमुळे भारताच्या राष्ट्रीय ऐक्यावर प्रलयकाळ ओढवणार असून त्यामुळे भारताची छकलें होणार अशी भीति वारंवार व्यक्त करण्यांत येत आहे. ह्या अरिष्टाचा मुकाबला कसा करावा ह्याचा विचार करून एक कार्यक्रम आखण्यासाठी येत्या ऑक्टोबर महिन्यांत एक सर्वपक्षीय जनता परिषद् भरविण्यांत येणार असून ह्या परिषदेस कांही अपक्ष पण मान्यवर अशा विद्वज्जनांना पाचारण करण्यांत येणार आहे. दिल्ली येथे नुकत्याच भरलेल्या मुख्य मंत्र्यांच्या परिषदेंत हा निर्णय घेण्यांत आला आहे.

ह्या संदर्भात श्री. एम्. आर. मसानी यांनी 'टाइम्स ऑफ इंडियाच्या' १० ऑगस्टच्या अंकांत लिहिलेल्या लेखामुळे निधर्मी राज्याच्या कल्पनेच्या कांहीशा तात्विक चर्चेला तोंड फुटलें आहे.

## निधर्मी म्हणजे धर्मसहिष्णु

प्रस्तुत लेखक हा श्री. मिनू मसानी यांच्या राजकीय व आर्थिक विचारसरणीशी सहमत नाही. परंतु ह्या देशांत जातीय संकट हें एक नव्याने निर्माण झालेलें अरिष्ट आहे असा जो देखावा निर्माण करण्यांत येत आहे तो वस्तुस्थितीशी धरून नाही ह्या श्री. मसानी यांच्या मतांत आमच्या मतें बराच तथ्यांश आहे.

त्याचप्रमाणे भारतीय शासन हें निधर्मी शासन आहे ह्याचा अर्थ तें अधार्मिक अथवा धर्मविरोधी शासन असा अर्थ करणें म्हणजे भारतीय शासनाच्या मूलभूत कल्पनेचा अन्यायकारक विपर्यास करणें होय, हें श्री. मसानी यांनी मांडलेलें मत तर्कदृष्ट्या व व्यावहारिक अनुभवाचे दृष्टीनेदेखील निरपवाद असें आहे. ज्या भारतांतील नव्व्याण्णव टक्के जनता धर्मोपासक आहे त्या जनतेच्या प्रतिनिधींनी निर्माण केलेलें शासन अथवा त्या शासनाची संहिता अथवा घटना धर्मविरोधी अथवा धर्मोच्छेदक असणें शक्य नाही. भारताचें राष्ट्रीय ऐक्य भंग पावण्याचा धोका काँग्रेस नेत्यांनी निर्माण केलेल्या 'निधर्मी' शासनामुळे निर्माण झालेला आहे हा जनसंघ पक्षाचा प्रचार असत्य आणि भ्रामक आहे. भारतीय शासन हें धर्माधिष्ठित शासन नसलें तरी तें धर्मसहिष्णु शासन आहे. धर्माचरण हें व्यावहारिक अथवा ऐहिक पुरुषार्थाला मारक आहे ह्या कल्पनेवर भारतीय शासन आधारलेलें नाही. भारताचे राष्ट्राध्यक्ष सनातनी हिंदू असूं शकतात; तसेंच आज भारतांतील राज्यपाल इस्लामी, झरतुष्ट्र अगर ख्रिश्चन धर्माचे अनुयायी असूं शकतात. ह्या वस्तुस्थितीमुळे भारतांत कोठेहि असंतोषाचा अथवा प्रतिकाराचा डोंब उठलेला आढळणार नाही. कारण भारतीयांची मूळ प्रकृति ही भारतीय शासनाप्रमाणे धर्मसहिष्णु आहे.

भारतीय शासन व बहुसंख्यांक भारतीयांची प्रकृति अथवा जीवननिष्ठा यांच्यामधील विसंवादामुळे भारताच्या राष्ट्रीय ऐक्यावर कोणतेंहि संकट गुदरलेलें नाहीं. त्याचप्रमाणे असा कोणताहि विसंवाद भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विकासाच्या आड येत असल्याचें दिसून येत नाहीं.

धर्मसंस्थाधिष्ठित शासनामुळे राष्ट्रीय ऐक्याची निर्मिति होते, अगर असें शासन हें राष्ट्राच्या सामर्थ्याला, स्थैर्याला अथवा भरभराटीला पोषक ठरतें, ह्या विधानाला मानवी इतिहासांत कोठेहि आधार सांपडणार नाही. भारताचा गेल्या दोन हजार वर्षांचा इतिहास वरील विधानाचा फोलपणाच सिद्ध करतो.

भारताच्या राष्ट्रीय ऐक्याला धर्मवेडापासून, जात्यंधतेपासून, भाषिक अभिनिवेशापासून व प्रादेशिक अस्मितेपासून सतत धोका आहे ह्यांत शंका नाही. भारतांतील बहुसंख्याकांचें म्हणजे हिंदूचें समाजजीवन अजूनहि कालबाधित अशा जातिसंस्थेने जखडून राहिलेलें आहे. कालबाधित झाल्याने कुजलेल्या ह्या जातिसंस्थेंतून जी मनोवृत्ति निर्माण झालेली आहे तिची बाधा भारतांतील अन्य धर्मीयांनाहि झालेली आहे. जातीय मनोवृत्ति म्हणजे कळप करून रहाण्याची वृत्ति. ह्या वृत्तीला छळगण्डाची जोड मिळाली की, ती अधिकच बळावते.

शासनाभावाच्या अथवा दुर्बल शासनाच्या प्राग्-मध्ययुगीन काळांतील समाजधारणेचा आधार म्हणजे जातिसंस्था. त्या जातिसंस्थेंतून निर्माण झालेली जीवनसरणी म्हणजे जातीयता. आधुनिक शासनाचा विकास हा जातिसंस्थेचा उच्छेद करूनच होत आलेला आहे. ह्या संघर्षाचा इतिहास म्हणजेच लोकशाही शासनाच्या विकासाचा इतिहास होय.

## संघर्षाचें व्यापक स्वरूप

भारताने लोकशाही व कल्याणकारी शासनाचा अंगिकार केल्याने हा संघर्ष निर्धाराने लढविल्यांवाचून भारतीयांना गत्यंतर नाही. हा संघर्ष केवळ जातीय संघर्ष नसून तो संघर्ष जीवनाच्या, अर्थात् पुरुषार्थाच्या हरएक क्षेत्रांत लढविला गेला पाहिजे. त्या संघर्षापासून पळ काढतां येणार नाही. जातीयतेशी मुकाबला ही एक आकस्मिक उत्पन्न झालेली निकड नसून तो संघर्ष हा आजच्या युगधर्माचा एक भाग आहे.

प्राग् मध्ययुगीन जीवनांतून लोकशाही व लोककल्याणकारी शासनाच्या युगांत ज्या ज्या नवस्वतंत्र राष्ट्रांना प्रवेश करावा लागत आहे त्या त्या सर्व राष्ट्रांना हा संघर्ष लढवावा लागणार आहे. हा संघर्ष हीं राष्ट्रें ज्या प्रमाणांत व ज्या निर्धाराने लढवितील त्या प्रमाणांत त्यांच्या राष्ट्रीय जीवनांत कस येईल व त्याला स्थैर्य प्राप्त होईल. ही युगान्तराची समस्या मागसलेल्या देशांना अल्पावधित सोडविणें भाग असल्याने प्रस्तुतचा संघर्ष आपणा सर्वांना वाजवीपेक्षा अधिक प्रमाणांत भेडसावीत आहे.

जातीयतेविरुद्ध लढा ही तत्कालीन अथवा ह्या किंवा त्या घटनेने, उपद्रवाने अथवा उत्पाताने उत्पन्न झालेली निकड नव्हे. प्रत्येक भारतीयाने, मग तो हिंदू, मुस्लीम, झरतुष्ट्र किंवा ख्रिश्चन कोणीहि असो, पुरुषार्थाच्या हरएक क्षेत्रांत लढावयाचा तो एक लढा आहे.

बंगालमध्ये दोन तीन पिढ्या स्थायिक झालेली महाराष्ट्रीय, महाराष्ट्रांत दीर्घकाल स्थायिक झालेली कर्नाटकी मंडळी अजूनहि कळप करून राहातांना दिसतील. कोणत्याहि भाषिक प्रदेशांत जा, तेथील ग्रामीण भागांतील जीवन लोक अजूनहि कळपाकळपाने जगत असल्याचें दिसून येईल. अशा ह्या जीवनाची कोंडी फोडल्यावांचून राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणार नाही. म्हणून जातीयताविरोधी लढा केवळ राजकीय प्रचाराच्या शस्त्राने लढवितां येणार नाही.

भारतांत प्राचीनकाळीं राष्ट्रीय एकात्मता होती, अथवा ब्रिटिश अमदानीनंतर ती निर्माण झाली होती आणि आता ती एकाएकी धोक्यांत आलेली आहे असा प्रकार नसून राष्ट्रीय एकात्मता आपणांस अजून निर्माण करावयाची हेंच खरें. म्हणून राष्ट्रीय एकात्मतेची घडण हें राजकीय कार्य नसून ती एक सांस्कृतिक मोहीम आहे. आणि ती दीर्घकाळ लढावी लागणार आहे.

## हें केवळ राजकीय कार्य नव्हे

राष्ट्रीय एकात्मतेची घडण हें केवळ राजकीय कार्य आहे हा भ्रम दृढमूल झाल्यास ह्या संघर्षाचें नेतृत्व केवळ राजकीय पक्षांचें हातीं राहून त्यांतून नैराश्य निर्माण होण्याचाच अधिक धोका आहे. केवळ निवडणुकीच्या यशावर लक्ष ठेवून मुस्लिम लीगशी लगट करणाऱ्या अथवा कॅथॉलिक धर्मसंस्थांचा अनुनय करणाऱ्या कॉंग्रेस अगर प्रजासमाजवादी पक्षाचे नेते अथवा द्रविड मुन्नेत्र कझगममध्ये अथवा मुस्लीम परिषदेमध्ये ज्या पक्षाला लोकशाही पुरोगामित्वाचा व जनशक्तीचा प्रसंगोपात् साक्षात्कार होतो अशा कम्युनिस्ट पक्षाचे नेते जातीयतेविरुद्ध निष्ठेने लढा लढवितील अशी आशा करणें व्यर्थ आहे.

कम्युनिस्ट पक्ष हा क्रांतिकारक पक्ष असतो. संसदीय राजकारण ही क्रांतिकारक म्हणविणाऱ्या पक्षाची ' निष्ठा ' असूं शकत नाही. परंतु संसदीय राजकारणांत पडल्यापासून हिंदी कम्युनिस्ट पक्षाने, संसदीय पक्षांची कार्यपद्धति न स्वीकारतां संसदीय राजकारणांत गुरफटून गेल्यामुळे पक्षाच्या ठिकाणीं ज्या दुष्ट प्रवृत्ति निर्माण होतात व ज्यांच्या संबंधीं लेनिन आपल्या पक्षास सतत सावध ठेवीत असे, त्या प्रवृत्ति मात्र आत्मसात् केल्या आहेत. भाषावार राज्य रचनेचाच प्रश्न घ्या. ह्या प्रश्नासंबंधीं ज्या योजनांबद्दल पक्षामध्ये मतैक्य आहे अशी राज्यपुनर्रचनेची कोणतीहि योजना राष्ट्रापुढे न ठेवतां पक्षाचे विभागीय नेते आपापल्या विभागांतील भाषिक किंवा वांशिक वेडाने बहकलेल्या ' नेत्यांच्या ' सुरांत सूर मिळवून युद्धगर्जना करण्यांत मग्न झाले होते. महाराष्ट्र, म्हैसूर व आंध्र या राज्यांतील पाण्याचा वाद हे कम्युनिस्ट पक्षाच्या तत्त्वच्युतीचें दुसरें उदाहरण देतां येईल. वास्तविक अशा व्यापक प्रश्नांचे बाबतींत पक्षाच्या मध्यवर्ति समितीने निर्णय घेतल्यावांचून व ज्या योजनेवर जनमत संघटित करतां येईल अथवा व्यापक मोहिम उभारतां येईल अशा योजनेचा गुजबी का होईना आराखडा जनतेपुढे ठेवल्यावांचून, कम्युनिस्ट पक्षाचा कोणताहि नेता अथवा कार्यकर्ता जनतेसमोर आग्रही भूमिका उघडपणें मांडीत सुटणार नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या शिस्तींत तें बसत नाहीं. परंतु आंध्रमधील कम्युनिस्ट पक्षाचे श्री. प्रसादराव आदि नेते तेथील प्रतिगामी पक्षांच्या नेत्यांच्या सुरांत सूर मिळवून लढ्याची बरळ करतांना दिसत आहेत. संसदीय राजकारण गौण मानणाऱ्या कम्युनिस्ट पक्षाची ही स्थिति नि मग इतर पक्षांची काय कथा !

## जातियता कोण राबवितो ! राजकीय पक्षच

देशांतील राजकीय पक्षाचे नेते संसदीय कारभार यंत्रणेंत इतके गुंतून राहिले आहेत की, निवडणुकांतील यशापयश हा आपल्या पक्षाचा एकमेव आधार होय असें त्यांना वाटूं लागलें आहे. स्वातंत्र्याच्या लढ्याचा पूर ओसरल्यामुळे सर्व पक्षांचीं पाळेमुळें उघडीं पडलेलीं असून आपल्या पक्षाचा डोलारा कधीं कोलमडून पडेल ह्या चिंतेंत ते व्यग्र आहेत. कोणत्याहि व्यापक निष्ठेशी बेडरपणें चिकटून राहून जनमत संघटित करीत राहण्याचा दमदारपणा नेत्यांच्या ठिकाणीं उरलेला नाहीं. सर्वच संसदीय नेत्यांना राजकीय पक्षांत अवास्तव महत्त्व प्राप्त झालेलें आहे. आणि ह्या सर्वांचा परिणाम देशांतील राजकीय वातावरणावर झालेला दिसत आहे.

> भाषिकवाद, जातीयवाद ही संसदीय राजकारणासाठी व त्यांतील प्रतिष्ठेसाठी सरसहा राबविण्यांत येत आहेत. भाषिक, प्रादेशिक व जातीय प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळत आहे ते राजकीय पक्षांकडूनच मिळत आहे. एकमेकांना नाक खाजवून खिजवीत राहणारे हे पक्ष जातीयता नष्ट करूं शकणार नाहीत.

राज्य कॉंग्रेस पक्षाचें आणि सत्ता भ्रष्टाचाराने बेगुमान झालेल्या नोकरशाहीची अशी परिस्थिति झाल्याने कोणताहि ध्येयवाद सामान्य जनतेच्या मनांत विश्वास व उत्साह उत्पन्न करूं शकत नाही. प्रत्येक राजकीय पक्षाला रिक्रूट भरतीचे सारे मार्ग चोखाळून पक्षामध्ये नवें रक्त आणावें लागत आहे ! ही भाडोत्री भरतीदेखील अपुरी पडत आहे !

> ह्या परिस्थितींत बदल झाल्यावांचून व तरुण कार्यकर्त्यांच्या उपक्रमशीलतेला समाजजीवनाच्या हरएक क्षेत्रांत वाव मिळून त्यांच्या कार्याच्या व तपश्चर्येच्या द्वारा नवा ध्येयवाद जनतेपर्यंत पोहोचेपर्यंत राष्ट्रीय एकात्मतेची चिरस्थायी वाढ होणें कठीण आहे.

## परिस्थितीची अनुकूलता ओळखा

परंतु आपल्या भोंवतालचें जीवन झपाट्याने बदलत आहे. शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या जातिजमातींमधील शिक्षित तरुणांच्या व छोट्यामोठ्या भांडवलदारांच्या कर्तृत्वाला नवीं नवीं क्षेत्रें उपलब्ध होत आहेत. त्यामुळे छळगंडामुळे अथवा न्यूनगंडामुळे जातीय अस्मितेच्या विकृत स्वरूपांत उफाळून येणाऱ्या असंतोषाचा जोर हळूं हळूं ओसरत आहे. पुढारलेल्या जमातींमधील तरुणांनाहि केवळ सरकारी नोकऱ्यांचें विलोभन उरलेलें नाहीं. समाजांतल्या ह्या वर्गांमधील अन्योन्यकलहामुळे दुर्बल व रुग्णाइत अशा जातिसंस्थेंत जातीय विद्वेष चेतविला जातो. ह्या अन्तकलहाला आहोटी लागलेली आता स्पष्टपणें दिसत आहे.

देशांतील प्रत्येक राजकीय पक्षांत ऐदी, आत्मसंतुष्ट व मिरासदार नेतृत्वाविरुद्ध असंतोष धुमसत आहे.

> अशा ह्या संक्रमणाच्या काळांत समाजांतील ध्येयवादी विचारवंतांनीं आपल्या निष्ठा कोत्या महत्त्वाकांक्षांनीं गढूळ होऊं न देतां लोकमतास सुजाण करण्याचें प्रयत्न निर्धाराने चालू ठेविले पाहिजेत. राष्ट्रीय एकात्मता सुदृढ करण्याचा तो प्रभावी उपाय आहे.

★ ★ ★

प्रा. पु. ग. सहस्रबुद्धे

# कॅन्सस



## एक प्रलय नगरी...

**१२ जुलैचें** वरुण राजाचें तें प्रलयनृत्य! सारी नगरी पाण्याखाली बुडून गेली होती. घरें धडाधड कोसळत होतीं. माणसें या छपरावरून त्या छपरावर जीव वांचविण्यासाठी दोरांवरून, तारांवरून जात होतीं. त्यांतलेच कांही दुर्दैवी जीव पाण्याच्या लोंढ्याबरोबर वाहून जात होते. आणि गच्चीवर, शिखरावर, झाडावर बसलेलीं माणसें हताश होऊन हा प्रलय पाहत होतीं.

हें वृत्त पुण्याचें नाही. अमेरिकेंतल्या कॅन्सास नगरींतल्या जलप्रलयाचें हें वृत्त आहे. आणि तें सुमारे दहा वर्षांपूर्वीचें आहे!

कॅन्सास नगरी मिसूरी नदीच्या दोन्ही तीरांवर वसली आहे आणि नगरीच्या मध्यभागींच मिसूरीला कौ नदी येऊन मिळते. या दोघांनीं मिळून कॅन्सासमध्यें जें भीषण तांडव केलें तें १९५० च्या जुलैच्या १२ तारखेलाच!

आधी चाळीस दिवस त्या भागांत अखंड पाऊस पडत होता. जगाच्या अंतकाळचे मेघच वृष्टि करीत असल्याचा त्यावेळीं भास होत होता. एक दिवस मॅनहॅटन शहर पाण्यांत बुडाल्याची बातमी आली. पण मॅनहॅटन १३० मैल लांब आहे. तेथून कॅन्सासपर्यंत पाणी येतें की काय? पण दुसऱ्या दिवशीं टोपेकाचे बंधारे फुटून गांवांत पाणी शिरलें. ७० मैल. मग लॉरेन्स बुडालें! ३८ मैल. कॅन्सासमध्ये ही जगबुडी येणार की काय?

११ जुलै—लष्करी इंजिनियर सावध होऊन कौचें दर्शन घेण्यास बाहेर पडले तों अपार अनंत जलराशि हिसळत, घुसळत, घोंघावत प्रचंड वेगाने कॅन्सासकडे लोटत होता. वरून मेघ कोसळत होते. वारा थैमान घालीत होता. प्रत्यक्ष कृतांतच आपला भेसूर जबडा उघडून कॅन्सासचा घास घेण्यासाठी येत होता. इंजिनियर कामाला लागले.

नगरींत जी उद्योगपेठ होती ती लोकांच्यामतें सुरक्षित होती. तिच्या दोन्ही बाजूला ३५ फूट उंचीच्या कॉंक्रीटच्या भिंती घातलेल्या होत्या. १९०३ सालीं महापूर आला होता. त्यापासून या भिंतींनीच पेठ वांचविली होती. पण इंजिनियरांच्या ध्यानांत आलें की, आजचा रंग निराळा आहे. तासाला अर्धा फूट पाणी चढत होतें. नदीवरच्या पुलावर उन्मळलेले प्रचंड वृक्ष येऊन आदळत होते. पाण्याचे लोट थडकत होते. क्षणार्धांत नगरीला जागें करण्यांत आलें. हजारो स्वयंसेवक धावले. वाळूचीं पोतीं, टनावारी दगड भिंतीच्या मागे व पुढे रचण्यांत आले. जेथे भेगा दिसत होत्या तेथे पर्वतप्राय राशी उभ्या करण्यांत आल्या. पण सगळें व्यर्थ झालें. हे बंधारे फुंकून टाकून आता कृष्णवर्ण झालेला तो महासागर भेसूर गर्जना करीत कॅन्सासवर आदळलाच. गिरण्या, कारखाने, कोठे, निमिषमात्रांत पाण्याखाली गेले. हजारो मोटारी, एंजिनें, मायकली, बसे, तुळया तुफान वेगाने उसळून धावूं लागल्या. पांच कोटी, दहा कोटी, वीस, चाळीस, दोनशे कोटींचें मानवनिर्मित धन निसर्गाने पुन्हा परत घेतलें.

कामगार, स्वयंसेवक दोन मैल मागे हटले. पुन्हा त्यांनी अवसान धरलें. अर्जेंटाइन पेठ बुडाली. आता निदान आरमरडेल तरी वांचवूं. पुन्हा तीच लढाई. दगड, गोटे, वाळूचीं पोतीं—पण आता कौ-मिसूरीला मिळाली होती. ती स्वतःच पाषाणहृदय झाली होती. तिला या दगडगोट्यांचें काय वाटणार! आरमरडेलमध्ये त्या दोघी घुसल्या आणि तेथे त्यांनी थैमान सुरू केलें.

पण हा प्रलयसंहार विधात्याला अपुराच वाटत होता. या महाशोकांतिकेचा कळस अजून यावयाचाच होता. कोट्यवधि गॅलन पेट्रोल, डिझेल असलेल्या इमारतीवर पाण्याची धडक बसली आणि त्याच वेळीं विजेच्या तारा त्यावर पडल्या आणि वरुणाच्या जोडीला साक्षात् अग्निनारायणच आले. चार चौरस मैल पाण्यावर पेट्रोल पसरलें नि सगळा भडका उडाला. फायर ब्रिगेडचे लोक पंपांनी खालचें पाणी उपसून आगीवर घालूं लागले. पण महाभूतांच्यापुढे कोण काय करणार? पांच दिवस आगीचें व पाण्याचें हें संहारनृत्य चालू होतें.

सहाव्या दिवशीं पहाटे पांच वाजतां पाणी किंचित् ओसरत आहे असें लष्कराला, कामगारांना, स्वयंसेवकांना वाटूं लागलें. पलीकडच्याच टेकडीवर नगरींतले लोक जाऊन बसले होते. सर्व देशभर आता वार्ता पसरल्या होत्या. रेडिओ सारखा मदतीची, साहाय्याची याचना करीत होता. तारा तेंच सांगत होत्या. कर्णे तेच बोलत होते. कॅन्सासला चला! आणि कौचा महापूर जसजसा ओसरूं लागला तसतसा मदतीचा महापूर कॅन्सास नगरीकडे वाहूं लागला.

एक अब्ज डॉलरची हानि झाली होती. असेल नसेल तें मातींत मिसळलें होतें. त्याची राख झाली होती. पाणी, आग व वारा यांशी सतत सात दिवस झुंझ घेऊन कॅन्सासकर थकून गेले होते. बाहेर आणि आंत घोर अवकळा पसरली होती. पण हें एक-दोन दिवसच! तिसऱ्या दिवशीं हातांत फावडें घेऊन कॅन्सासकर उठले. कौ आणि मिसूरी या दोघींनी मिळून सोळा दशलक्ष टन चिखल नगरीवर पसरून दिला होता. तो आता काढावयाचा होता. ट्रक्स, बुलडोझर आणि कॅन्सासकरांचें अपराभूत मन त्या कामाला लागलें.

# हिरा

ब. मो. पुरंदरे

गेल्या पन्नास वर्षांत कऱ्हेपठारावर असा पाऊस पडला नव्हता अन् कऱ्हेला असा पूर आला नव्हता. सतत चौदा तास आभाळ गळत होतं. कऱ्हा खवळून फेसाळून दुथडी वाहत होती. आधीच कऱ्हेला ओढ भयंकर अन् त्यांतून महापूर! बाबूजी नाईक बारामतीकरांचा प्रचंड वाडा कऱ्हेच्या कांठावरच आहे. त्याच्या तटाबुरुजांवर कऱ्हेच्या लाटा थडाथड आपटून फेस उधळीत होत्या. संध्याकाळच्या आधी घटकाभर पाऊस पूर्ण थांबला आणि बारामतींतलीं हजारो माणसं पुराची गम्मत बघायला लोटलीं. ही झिम्मड!

महापूर इतका अकाळविक्राळ होता की, नजर फिरत होती. गोरगरिबांच्या झोपड्या, गवताच्या गंजी, बाजा, पाळणे, म्हशी अन् काय नाही!—टिनपाटापासून गुळाच्या काहिल्यापर्यंत किती तरी डाग खालीवर हेलकावे घेत आणि भोवऱ्यांत गिरक्या खात वाहत येत होते. नवीन कांही वाहत आलं की, पोरं ओरडत. कागदाच्या नावा पाण्यांत फेकीत, टाळ्या पिटींत. वर आभाळ गडगडत होतंच.

बाबूजी नाइकाच्या तटावरहि बायकापोरांचा एक घोळका गम्मत पाहत उभा होता. किलबिल चालू होती. तेथून अलीकडच्या बुरुजावर नानासाहेब उभे होते. त्यांच्या डाव्या बाजूला छत्री आणि गोंडेदार थैली घेऊन हिरा उभा होता. बांदलवाडीच्या राजबा परवान्याचा हा एकुलता एक लेक. जिथं नानासाहेब तिथं हिरा असायचाच सावलीसारखा. अन् तो होता सावलीसारखा काळाच, पण भारी तुकतुकीत कांतीचा. वयान तेविशीच्या आंतबाहेरचा. नानासाहेब कुठहि जावोत—गडावर जावोत, जेजुरीला जावोत, मळ्यांत, कोर्टांत, बाजारांत—कुठहि; हिरा असायचाच संगतीला. कऱ्हेचं तें उग्र तांडव पाहून हिरा म्हणाला,

"सरकार, आज कऱ्हाबाई लई खौळलीय्!"

"खरंच खवळलीय. माझ्या ह्यातींत आजच बघतोंय हिचं असं रूप! ही बघ ना वीस वीस खंडीचीं झाडं हरबऱ्यासारखीं मुळासकट उपटून आणलींत हिन!"

अन् नानासाहेब एवढं बोलताहेत न बोलताहेत तोंच नजीकच्या त्या बुरुजावरच्या बायकापोरांत एकदम भयंकर आक्रोश उडाला! पोरगं पडलं! पोरगं पडलं! भयंकर ओरडा, रडारड, आक्रोश! नानासाहेबांचं लक्ष एकदम खेचलं गेलं तिकडे. खरोखरच दहा-बारा वर्षांचा एक पोरगा पुरांत पडला होता! "हिरा, हिरा!" एकदम त्या पोराकडे बोट करीत नानासाहेब ओरडले.

अन् पापणी लवायच्या आंतच हिराची उडी पाण्यांत पडली! कपड्यांसकट! पण त्याची उडी पडायच्या एकच क्षण आधी त्या गलक्यांतून एक उडी धाडकन् कऱ्हेंत पडली! सतरा-अठरा वर्षांच्या एका मुलीची उडी होती ती! ती मुलगी उसळून वर आली. मानेला हिसडा देऊन तोंडाने तिने फुरंकन् पाणी उडविलें. गटांगळ्या खात पोरगं चाललं होतं सर सर वाहत. विजेच्या चपळाईने तिने त्याचा शर्ट पकडला अन् लगेच त्याचा दंड पकडला. तो इतका भयंकर घाबरला होता की, त्याच्या तोंडून चटकन् आक्रोशहि फुटत नव्हता. नाका-तोंडांत पाणी शिरल्यामुळे तो ठसके देत होता. मधूनच एकदम ओरडत होता. तो तिच्या गळ्याला मिठी मारण्यासाठी धडपडत होता. ती ओरडून त्याला म्हणत होती,

"घाबरूं नकोस! मीं तुला धरलय्! मिठी मारूं नकोस!"

पण त्याला कसं पटावं तें? ती शिकस्त करीत होती. कऱ्हेच्या लाटा इतक्या भयंकर फोफावत येत होत्या की, प्रत्येक निमिषाला तीं दोघं झपाट्याने धारेंत खेचलीं जात होतीं. कांठावरचे, तटावरचे अन् तिकडे पुलावरचे लोक ओरडत होते, पण उडी मात्र एकहि पडत नव्हती! हिम्मतच नव्हती कुणाची. कऱ्हेला तुफानी अवसान चढलं होतं. हिरा एवढा पट्टीचा पोहणारा मासा, पण तोहि पन्नास हात भिरकावला गेला होता. तो झपाट्याने हात मारीत त्या दोघांना गाठण्यासाठी झेपावत होता. नदीच्या ऐन प्रवाहांत झपाट्याने वाहत चाललेलीं तीं दोघं हिरापासून पंधरा हातांवर होतीं. तो मुलगा, मुलगी आणि कऱ्हा एकमेकांशी झुंजत होते.

तेवढ्यांत हिराने त्यांना गाठलंच. पोराचा दुसरा दंड पकडण्याकरिता हिराने आपला उजवा हात टाकला, पण मागून लाटेची धडक इतक्या जोरांत त्याला बसली की, तो अवचित त्या पोराच्या पुढ्यांतच ढकलला गेला! अन् त्या पोराने एकदम हिराला घट्ट गळामिठी मारली!! त्या क्षणाला हिराने भयंकर किंकाळी फोडली! तो त्या पोराला हिसडून काढण्यासाठी धडपडूं लागला, पण जणू ती मगरमिठीच होती. हिराने आणि त्या पोराने गटांगळी खाल्ली! तिच्या हातून पोराचा दंड निसटला! क्षणभर तिला पाण्यावर तीं दोघंहि दिसलींच नाहींत! बुडालीं! बुडालीं! एवढ्यांत उसळून दोघांचींहि डोकीं वर आलीं. दोघांच्याहि नाका-तोंडांत पाणी शिरलें होतें. दुसरी गटांगळी त्यांना मिळणार हें ठरलेलंच! आणि मग मरण! मरण! पण तिने एकदम झेप घेतली ती हिराच्या गळ्यापाशीच! पोराचं मनगट तिने शिताफीने आपल्या तोंडांतच पकडलं आणि सारं बळ एकवटून ती त्याला कडकडून चावली! अन् त्याच वेळी तिने पोराची हिराला पडलेली मिठी हिसकली. हिराहि निर्वाणीची धडपड करीतच होता. कडकडून चावा बसल्यामुळे



पोराची मिठी ढिली पडली अन् सुटली! हिरा सुटला! मृत्यूच्या दाढेंतून सुटला! त्याने लगेच त्या पोराचा दंड पकडला. तिनेहि त्याचा दंड धरला अन् मगच चावा सोडला! आता मात्र पोरगा त्यांच्या पुरता कबजांत आला होता. दोघांनीहि मग त्या पोराला धरून कांठाकडे हात मारण्यास सुरुवात केली. पोराच्या मनगटांतून रक्त वाहत होतें!

पडल्या जागेपासून जवळ जवळ ते अडीच फर्लांग भरकटले गेले होते. धार कापीत कापीत ते काठाशी आले. लोक ओरडत होते. कौतुक करीत होते. हिरा पोराला घेऊन वर आला. त्याने त्या मुलीला हात दिला. तेवढयांत वीज लखाखली. हिराने नदीकडे पुन्हा वळून पाहिलं—तो चकीतच झाला. नानासाहेब पोहत येत होते!

"सरकार तुम्ही?—"

आपल्यासाठी आपल्या सरकारांनी उडी घेतलेली पाहून हिराचे शब्द गळ्यांतच दाटले. त्याने झटकन् नानासाहेबांना हात दिला, अंगावरच्या कपड्यांसकट नानासाहेबांनी उडी टाकली होती. वर आल्यावर ते कांहीच बोलले नाही. नुसते हसले, मान डोलवीत हिराकडे पाहत हसले. त्यांत सारं कांही होतं.

हिरा आज बुडून मरायचाच, पण त्या मुलीन वाचवलं त्याला. गर्दीमुळे ती मुलगी संकोचून गेली होती. चिंब भिजलेली, दमलेली. अंग चोरून ती उभी होती. सांजचा अंधार पडत होता. हिराचं लक्ष तिच्याकडे गेलं, अन् विजेच्या लखलखाटांत ती गोरीपान मूर्ति उजळून गेली. हिराला कससंच होऊन गेलं. त्या मुलीबद्दल कांहीतरी त्याच्या मनांत रुजलं. त्याला काय वाटत होतं तें त्यालाहि समजेना. अंगांतली पैरण पिळीत हिरा तिच्याकडे पाहत होता—अन् पैरण पिळायचंहि भान त्याला उरलं नाही. तो स्तब्धच उभा राहिला. पोलादाचा रेखीव पुतळा जणू! अजाण मुलासारखा तिच्याकडे तो पाहतच होता. ती संकोचून उभी होती. गर्दीमुळे तिला हालतांहि येईना. अन् मग हिरा ओशाळला, लाजला. त्याला काय वाटलं कोण जाणे. त्याने मग तिच्याकडे अजिबात पाहिलं नाही.

"काय बाळ नांव तुझं?" नानासाहेबांनी तिला विचारलं.

"सुमित्रा देशपांडे!"

"शाबास, बाळ शाबास! कुठं राहतेस?"

तिने सांगितलं. तेवढयांत पावसाची जोराची सर आली. गर्दी भराभर पांगली. सुमित्राहि जाऊं लागली. तेव्हा नानासाहेब म्हणाले,

"थांब बाळ! अरे हिरा, जा हिच्याबरोबर. हिला तिच्या घरीं पोहोंचवून ये! हा पोहोंचवील हं ऽ जा!"

हिराने ओली पैरण पुन्हा अंगांत घातली अन् तिच्याबरोबर तो निघाला.

हिराला तिच्याशी कांही तरी बोलायचं होतं, पण त्याला तें स्वतःलाच उमजेना. पुरंधर गडाखालच्या खेड्यांतल्या महाराचा पोरगा तो! सिनेमांतल्यागत जडावाचं बोलणं कुठून साधायला? तिचं घर आलं अन् एकच वाक्य हिरा बोलला—आपोआपच बोलला—

"जलमभर इसरणार न्हाई मी तुम्हाला!

—नानासाहेब घरीं आले. नंतर हिराहि आला. घरीं म्हणजे राशीनकरांकडे. नानासाहेब बारामतीला कधीहि आले तरी तिथेच उतरत. हिराहि तिथेच—देवडीवर. पाहुणेपणा असा नव्हताच.

त्या रात्रीं सगळ्या बारामतींत चर्चा महापुराचीच अन् त्यांत ही घडलेली विलक्षण घटना. राशीनकरांकडेहि बैठकींत हीच चर्चा. सुमित्राचं अन् हिराचं कौतुक दुथडी भरून वाहत होतं...अन् गप्पागोष्टींत नानासाहेबांना एका गोष्टीचा उलगडा झाला. पुण्याच्या तिकोने वकिलांनी पाहिलेली ती हीच मुलगी. दुपारीं बारामतीच्या कोर्टांत तिकोन्यांची आणि नानासाहेबांची गाठ पडली होती. तेव्हा सहज बोलण्यीं निघालीं,

"आमच्या आप्पासाठीं पाहत होतों. मुलगी तशी हजारांत उठून दिसेल. देखणी



आहे. मॅट्रिक झालीय्. सारं ठीक आहे... परंतु—!" तिकोने वकिलांनी तंबाखूची चिमटी तोंडांत सोडली.

"मग उणं कुठ पडलं !"

"फारच उणं आहे नानासाहेब ! मुलीच्या पायावर कोड आहे ! पांढऱ्या पायाची !" शेवटचे दोन शब्द बारीक आवाजांत...

"असं ? "

"अन् बाप साधा कारकून आहे ! म्हणजे दुसऱ्या बाजूनेहि ह्या वैगुण्याची भरपाई होण्याची आशा शून्यच !"

म्हणजे गडगंज हुंडा मिळत असता तर ही पांढऱ्या पायाची सून बिनतक्रार पसंत होती वकीलसाहेबांना !

आणि संध्याकाळीं कन्हेच्या पुरांत उडी पडली नेमकी याच मुलीची. सुमित्रा माधव देशपांडे...

या मुलीच्याच पायावर कोड आहे हें राशीनकरांच्या बोलण्यांत आलं. नानासाहेब एकदम गंभीर झाले. पांढरं कोड ! त्यांना फार वाईट वाटलं.

हिरा देवडीवर झोपला होता. तो कसल्या तरी गोड गुंगींत होता. त्याला सारखी दिसत होती सुमित्रा. कन्हेच्या पुरांत सळसळणारी ती चपळ मासळी त्याला दिसत होती. तो अजून तिच्याबरोबर महापुरांतच पोहत होता. तो जिवावरचा प्रसंग आणि तिच्या धारिष्टाची कमाल—स्वप्नांतहि त्याला तो प्रसंग दिसत होता. सुमित्रा आपला प्राण वांचवतीय्.

सकाळ झाली. नानासाहेब जरा गंभीरच होते. हिराहि गंभीर होता. दुपारच्या मोटारने नानासाहेब आणि तो गावीं परतणार होते. पुन्हा ती हिरकणी आपल्याला कधी भेटेल, दिसेल या उदास विचाराने हिरा गंभीर होता.

नऊच्या सुमाराला कपडे घालून नानासाहेब निघाले. हिरा त्यांच्यामागोमाग निघाला. कधीहि ,पत्तूप न चालणारे दोघेहि मुकाट्याने चालले होते. कुठे ? बाजारांत ! वाटेंत नानासाहेबांनीं एक पाकीट पोस्टांत टाकलें.

नानासाहेबांनी नऊ वारी जरीची एक साडी आणि खण खरीदला. पेढयाचा पुडा विकत घेतला. हिरा आश्चर्याने फक्त बघत होता. नंतर नानासाहेबांनी टांगा केला. हिरा पुढे बसला.

आणि टांगा उभा राहिला तो सुमित्राच्या घरापुढे !

नानासाहेब वाड्यांत गेले. पेशवाई पगडी, शेल्याइतकंच भारी उपरणं, लांब कोट आणि पुणेरी जोडा. अंगणांत प्रवेशतांच डावीकडच्या बिन्हाडांतला झोपाळा थबकला. मोरीवर भांडीं घासणारे हात तसेच थांबले. दाढीसाठी साबण लावलेला एक चेहरा खिडकींतून डोकावला. केर लोटणारी एक केरसुणी थांबली. सगळे डोळे नानासाहेबांच्या पेशवाई आकृतीवर खिळले.

"इथ माधवराव देशपांडे—?"

"मीच ! या—या !"

समोरच्या बिन्हाडांतून माधवराव देशपांडेच हसत हसत सामोरे आले. अतिशय आस्थेने नानासाहेबांचं स्वागत करीत माधवरावांनीं हाक मारली.

"अग सुमित्रे !"—आणि या हाकेने हिराचं मन मोहरून गेलं, आणि त्यावर ऐकूं आलेल्या 'ओ' ने तर अधिकच !

नानासाहेब तक्क्याशी बसले. हिरा दाराशीच बसला. आंत सारं गरिबीचंच वैभव होतं. पण अत्यंत स्वच्छता, टापटीप आणि कौशल्य डोळ्यांत भरत होतं. नानासाहेबांसारखी कन्हेपठारांतली मातब्बर असामी अगदी अनपेक्षित आलेली पाहून माधवरावांना आनंदहि होत होता आणि जरा गोंधळल्यासारखंहि झालं होतं.

"मी आपल्याला आणि आपल्या मुलीला मुद्दाम भेटायला आलों आहें. केवढं धाडस तिचं ! तुमच्या मुलीन एवढया भयंकर महापुरांत उडी घेतली. डगमगली नाही !"

लेकीचं कौतुक ऐकून माधवरावांचं काळीज परातीएवढं फुगलं. त्यांनी मान वळवून सुमित्रेला हाक मारली. हिराचं लक्ष होतं दाराला लावलेल्या पडद्याकडे. पडदा किंचित् हलला. बाजूला झाला आणि कालची ती चाफेकळी बाहेर आली. प्रसन्न—सात्त्विक स्मित तिच्या मुखावर विलसत होतं. अहंकाराचा लेशहि त्यांत नव्हता. तिने नानासाहेबांना वाकून नमस्कार केला. त्यांनी आशीर्वाद दिला अन् सुमित्रेला म्हणाले,

"बस बस मुली ! लाजायचं कांही कारण नाही—बस. लाजायचं बघायला येणारांच्यापुढे !" आणि नानासाहेब मोठ्याने हसले.

आता मात्र सुमित्रा खरंच लाजली. हिरा विश्व विसरून तिच्याकडे तन्मयतेने पाहत होता. त्याला तिचं तें कुलीन लाजणं, हसणं फार फार आवडलं. पापणीहि न लववतां तो तिच्याकडे पाहत होता.

"आमचा हा हिरा—!" नानासाहेबांच्या ह्या शब्दांनी हिरा एकदम भानावर आला. ओशाळता चेहरा सावरीत सावरीत त्याने उगीचच मांडी बदलली.

"केवळ तुझ्यामुळे वांचला बरं हा ! आमचं घर तुला जन्मभर विसरणार नाही !"

हिरासुद्धा नेमकं हेंच म्हणाला होता काल. झुळझुळीत कागद बाजूला करीत नानासाहेबांनी साडी व खण उलगडला अन् म्हणाले,

"हं, बाळ घे हें !"

ती संकोचली, परंतु नानासाहेब पुढे झुकल्याबरोबर जवळ जाऊन तिने ती साडीचोळी घेतली.

"हें एवढं कशाला ?" तिचे वडील उद्गारले.

"कौतुकाचं अन् तिच्या हक्काचंहि !" पेढयाचा पुडा तिच्या हातीं देत नानासाहेब म्हणाले; आणि त्याच वेळीं त्यांचें तिच्या पावलांकडे लक्ष गेलें. तळहाताएवढा पांढरा डाग तिच्या एका पावलावर होता. कोड ! नानासाहेबांच्या काळजांत चर्र्ऽ झालं, त्यांचं हास्य उदासवाणं बनलं.

नंतर नानासाहेब सुमित्रेचा व तिच्या वडिलांचा निरोप घेऊन परतले. वाटेने बराच वेळ हिराशी ते कांहीहि बोलले नाहीत. पण मग उदासपणे त्याला म्हणाले,

"पाहिलंस हिरा, दैव कसं असतं तें ! एवढी सोन्यासारखी गुणारूपान पोर आहे, पण दैवान गरळ टाकलीय् !"

"जी ? काय झालं सरकार ?"

"पायावर पांढरं कोड आहे तिच्या ! कोण पत्करणार हिला आता ? लोक चमत्कारिक असतात. नुसतं कातडं पाहतात ! गुण पाहत नाहीत, आतडं पाहत नाहीत. नुसतं कातडं पाहतात !

हिराचं काळीज गलबललं. कोड ? पांढऱ्या पायाची ? तो बेचैन झाला.

घरीं आल्यावर तो देवडीवर भिंतीशी टेकून बसला. त्याच्या मागच्याच बाजूला अंगणांत दोन मोलकरणी भांडीं घाशींत घाशींत बोलत होत्या.

"कोन कुनासाठी करील यवढं ? त्या पोरीन काल पुरांत सखू कुंभारनीच्या

पोरासाठी घातलीन् ना उडी ? मग ? "

" खरं हाये बाया ! ती पोरगी ठाव होय मला. माझ्या गल्लीला भिशाच्या वाड्यांत ऱ्हातीया. पर कसं तिचं फुटकं नशीब बगा, कोड हाये तिच्या पायावर ! लगीन न्हाई जमत. जो त्यो म्हनतो, पांढऱ्या पायाची, पांढऱ्या पायाची ! तिचा बा कोनाच्याबी पदरांत तिला टाकाया तयार झालाय ! काय करल ? पैका न्हाई त्येच्यांत नवऱ्याला पैका द्याया लागतो. कुनीकून आनावा हंडाभर पैका गरिबान ? सांगा... "

" बैय्या ऽ ! कोडाची हाये ? "

" तर ना ! आधी चिचुक्यायवढा ठिपका व्हता. आता यवढा झालाया ! उंद्या ! समद्या अंगभर पसरल ! मंग कोन घील तिला पदरांत ? म्हातारा, लंगडाबी म्हनल नगं म्हनून. आज त्ये तरी नडले आडल्येले नवरे ऱ्हातील बाशिंगाला हुबे, म्हनून तिचा बा कुनालाबी द्यायाला तयार झालाये ! बा घाईला आलाय ! "

" बया ग ! म्हातारान् लंगडा फेंगडा नौरा ? "

इंगळी डसल्यागत हिरा तटकन् उठला. त्याला हें ऐकवेचना. त्याच्या जिवाची उलघाल झाली, पण करावं काय ? सांगावं कुणाला ?

हिराला जेवण गोड लागलं नाही. दुपारच्या मोटारीने नानासाहेब अन् तो बारामतीहून गांवीं परतले. हिराला आणि त्यांना त्या मुलीविषयीं एकमेकांशी खूप बोलायचं होतं. पण दोघेहि गप्प होते. दोघेहि तिच्याविषयीं स्वतःशीच बोलत होते !

दोघेहि गांवीं पोहोचले. सारी रात हिराची तगमग चालू होती. ती चाफेकळी, ती हिरकणी त्याच्या डोळ्यांपुढून हलेना. आता पुन्हा कधी भेटेल का ? म्हातऱ्याशी, लंगड्याशी लगीन तिचं—?

सकाळींच हिरा सासवडच्या वाटेने निघाला. त्यानं पुण्याची मोटार पकडली.

हिरा पुण्याला आला. त्याने रायाची खोली गाठली. राया म्हणजे नानासाहेबांचा मुलगा. पुण्याच्या शेतकी कॉलेजांतून तो यंदाच पदवीधर झाला होता अन् त्याच कॉलेजांत लेक्चरर म्हणून नोकरी करीत होता. रायाची अन् हिराची अगदी रांगत्या वयापासून जिगर दोस्ती. हिराचा बाप, आजा, पणजा पिढयान् पिढया नानासाहेबांच्या देवडीवर चाकरी करीत आले होते. राया अन् हिरा एकत्र खेळले. लोकल बोर्डाच्या मराठी शाळेत एकत्र शिकले. मास्तरांच्या छड्या, लोकांच्या कैऱ्या-चिंचा आणि शिव्या दोघांनी एकत्रच खाल्ल्या ! पुरंधरगडावरच्या तळ्यांत एकत्र डुंबले. तालमीच्या मातींत अन् जेजूरीच्या जत्रेंत एकत्र रंगले. दोन्ही पोरं एकजीव दोस्त होतीं. आणि म्हणूनच हिरा मनांतलं अवघड दुखणं बोलायला पुण्याला रायाकडे धावला.

हिरा आला. राया पाठमोरा उभा होता.

" जोहार, सरकार ऽ ऽ जोहार ! "

हिराचा आवाज ऐकल्याबरोबर रायाने एकदम मोहरा वळवला आणि हिरा दिसतांच आनंदाने तो एकदम ओरडला—

" हिरा ! अरे पांचशे वर्षे आयुष्य तुला ये ये ये ये ! "

" इकतं औक्ष ! एवढं कशाला ? "

एवढ्यांत बैरागी होतोयस् ? लगीन करून टाकतों तुझं एखाद्या हिरकणीशी ! "

हिरा लाजला—हंसला. लग्नाचं नांव निघालं ! राया थट्टेनं हंसला. हिराचे दंड गदगदा हलवीत तो म्हणाला—

" कमाल बाबा तुझी ! केवढी भयंकर वेळ आणली होतीस परवां बारामतीला ! काळीज फाटलं माझं ! "

" आँ ? तुम्हास्नी कसं ठाव पडलं ? नवल म्हनायचं ! इसतांयसा ? "

अरे, पोष्ट नाहीत का ? हें सकाळींच नानासाहेबांचं पत्र आलं. अन् पेपरांत छापून आलंय् ना ! "

" माझ्या डोकशांतच न्हाई ! "

" थांब जरा हिरा ! पांच मिनिटांत येतों ! "

असं म्हणत रायाने पायांत चपला कोंबल्या अन् घाईने तो बाहेर पडला.

" सरकार, सरकार थांबा वाईच ! "

पण रायाने सायकलवर टांग टाकलीच. पसार ! अन् मग हिरा भिंती न्याहाळीत बसला. पुरंधरच्या दिल्ली दरवाजाचा आणि बालेकिल्ल्याचा असे दोन फोटो तिथे लावले होते. एवढ्यांत सायकल वाजली. राया आला.

" सरकार, कशापाई घाई ? "

" हिरा, विचारूं नकोस ! "

पेढ्याचा पुडा सोडीत राया म्हणाला. अन् त्याने बचकभर पेढे हिराच्या ओंजळींत घातले.

" खा ! हिरा खा ! " ह्या लाडक्या मित्राचं किती अन् कसं कौतुक करूं असं रायाला झालं होतं.

" सरकार पेढे ? परक्षा उतरला जनूं ? "

" हिरा तूं परीक्षा उतरलास ! तूं पास झाल्याचे हे पेढे ! बारामतीला तूं पास झालास ! शाबास मर्दा ! काय देऊं तुला ? बोल ! हिरा मागून घे लौकर ! खजिना


सोन्या-चांदीचे सर्वोत्कृष्ट
गिलिट करणार !
एकवेळ अवश्य भेट देऊन पहा
डी. अेस्. कदम
४११ रविवार, मोतीचौक, पुणें २.
( वन्देमातरम् प्रेस समोर. )



व्ही. जोशी अॅण्ड को.
ब्लॉक मेकर्स अँड आर्ट प्रिंटर्स
शनिपार नजीक, शेवडे बोळ,
पुणें २.

खुला आहे !”

हसत हसत अन् पेढयाचा बकाणा भरीत राया म्हणाला.

आँऽआँ सरकार ? मागन त्यें द्याल ?”

“माग ! माग !” रायाला माहीत होतं हिरा कसा आहे तें. हा मागून मागून काय मागेल ? पैसेसुद्धा मागणार नाही. दिले तरी घेणार नाही. मग मागेल असं कांही तरी लहान मुलासारखं. शेवटीं आपल्यालाच त्याला बळें बळें कांही तरी द्यावं लागेल.

“माग माग, बेशक माग, हिरा !”

“सरकारच्या वाणीला बेलभंडाऱ्याचं मोल !”

“शब्द दिला ! अगदी बेलभंडार !”

हिराला विलक्षण आनंद झाला.

“सरकार, माझ्यासंग बारामतीला चला !”

“बारामतीला ?”

“सरकार, माझं मागणं तिथ मागीन. मला जें हवय् त्यें बारामतींतच हाये !”

प्रथम रायाला ही सारी थट्टा वाटली, पण कुतुहलान तो हिराला विचारूं लागला. हिरा हट्ट धरून बसला बारामतीला चलण्याचाच. मग मात्र रायाची खात्रीच पटली की, हिराच्या मनांत खरचं कांही तरी आहे. केवळ थट्टा नव्हे. हिराचं गूढ त्याला उलगडेना. अखेर तो म्हणाला,

“कबूल ! येतों बारामतीला ! परत केव्हा यायचं ?”

“लगीच ! चार घंट्यांनी माघारी !”

आणि दुसऱ्या दिवशी पहिल्या मोटरने दोघेहि बारामतीला निघाले. रायाने आडबाजूनी हजार प्रश्न टाकून हिराचं ‘गूढ’ मागणं हेरायचा प्रयत्न केला, पण हिराचा हट्ट कायम ! बारामत्तीच !

महापुरांत काय काय घडलं त्याची सगळी पोथी त्याने रायाला सांगितली. त्या लाटा, ती ओढ, तें पोरगं, ती पोरगी अन् सगळं.

“सरकार, तुम्हीं माझं कौतुक केलंत, पर म्यां काय केलं ? समदं केलं त्या हिरकनीन. एवढीशी नाजुक नवतीची नार, पर काळीज वाघिनीचं हाये तिचं ! माझा पराण तिन वांचविला. तिन मला पुन्हा जलम् दिला !”

“एवढीशी पोर ? म्हणजे केवढी ?”

“आला आसल की पदर !”

आणि हिरान सुमित्रेचं रूप गायलं. कुळ, शीळ, गुण, बोलणं, बसणं, वागणं अगदी न्याहार गायलं. फक्त सांगितलं नाही तिच्या पावलावरचं आणि आपल्या मनांतलं कोड !

“अशी हाय ती गुना-रूपाची चंद्रावळ. थोरल्या सरकारांनी तिच्या घरीं जाऊन तिला साडी-चोळी अन् पेढयाचा पुडा दिला !”

“हं ? लग्न झालंय का तिचं ?”

“च् च् च् ! लगीन कसं हुईल ? न्हाई झालं !”

राया मिस्किलपणान विचारत होता अन् हिरा कळकळीन बोलत होता.

“घरीं कोण कोण आहे तिच्या ?”

“नवरा सोडून समदीं हैत !”

“नवरा कुठ सोडला ?”

“वाऱ्यावर ! नका वाकडं लावूं अडाण्याला !”

दुपारीं चाराला हे दोन पाशिंजर बारामतींत उतरले. आणि त्यांनी एक गेस्ट हाऊस गाठलं. हिरा विचारांत चूर होता. इतकं जमलं. पुढचंच फार अवघड होतं. खाणंपिणं झालं अन् हिरा एकटाच बाहेर निघाला.

“सरकार, घटकेंत येतों म्या !”

राया गूढ नजरेने फक्त पाहत राहिला. हिराचीं पावलं सुमित्रेच्या घराकडे वळलीं.

कित्ती तरी वेळ सुमित्रेच्या रस्त्यावर तो रेंगाळत राहिला, पण त्याला हवं होतं तें माणूस दिसेचना. सव्वा तास गेला अन् अखेर नेमकं हवं तें माणूस समोरून येतांना त्याला दिसलं. सुमित्रेचे वडील ! हिरा आनंदला. आपल्या ध्यानीं मनीं कांहीहि नसल्याचा आव आणीत हिरा त्यांच्या रोखाने गेला. अन् नाजिक येतांच, सहज लक्ष गेल्यासारखं दाखवीत त्याने त्यांना रामराम केला.

“म्हणजे ? अजून मुक्काम आहे नानासाहेबांचा ?”

“न्हाई जी ! थोरलं सरकार गांवीं गेलं. धाकलं सरकार आज आल्याती. उद्या सक्काळा पुन्याला जायच्यात.”

“असं ! धाकटे म्हणजे रायासाहेबच ना ?”

“जी-जी ! म्हंजी वळख हाये म्हनायची ?”

“नाही. पूर्वी एकदा बघितलंय् फक्त ! मग त्यांना आमच्या घरीं चहाला—!”

“येतील की ! येतील ! पर जातीन सांगाया व्हवं. न्हाई, म्हंजी म्यां सांगितलं तरी बी येतीलच, पर्— ”

“बरोबर आहे तुझं. मी स्वतः येईन.” अन् मग त्यांनी हिराला पत्ता विचारून घेतला.

हिरा रायाकडे माघारी आला तो घाईतच.

“सरकार, त्ये तुमास्नी च्या प्यायाला बोलाऊ येत्याती ! आवरा बिगी बिगी”!

### रेव्हरंड दत्तो वामन पोतदार

एकदा म. म. द. वा. पोतदार दिल्लीहून मुंबईस येण्यासाठी स्टेशनवर गेले. पहिल्या वर्गाचें रिझर्वेशन केलेलें असल्यामुळे डब्यांच्या दारावर ते आपल्या नांवाचें रिझर्वेशन लेबल पाहूं लागले, पण त्यांचें नांव कुठेच सापडेना! एका डब्यावर ‘रेव्हरण्ड डी. व्ही. पोतदार’ असें लेबल होतें. प्रा. पोतदारांना वाटलें की, हें नांव कुणा तरी खिश्चन पाद्र्याचें असावें ! पण स्टेशनमास्तरकडे जाऊन चौकशी केल्यावर सारा खुलासा झाला. तें नांव दत्तो वामनांचेंच होतें ! लेबल लिहिणाऱ्या कारकुनाने आपलें बहुश्रुत डोकें चालवून ‘महामहोपाध्याय’ ह्या शब्दाचें ‘रेव्हरण्ड’ असें भाषांतर करून लेबलावर लिहिलें होतें !

“आँ ? ते म्हणजे कोण ?”

“त्ये त्या हिरकनीचं बा हैती !”

“अन् ते कुठ भेटले तुला ?”

“म्या असा गुमान चाललों व्हतों. तवा त्ये सडकेवर भ्येटले. म्हनाले च्या प्यायाला बलिवतों ! म्या म्हनलं यावा !”

“बरं, पण तुझं काय ‘मागणं’ आहे तें सांग की आता !”

“न्हाई ! अजून टाईम हाये !”

राया थट्टेन हसून म्हणाला,

“हिरा, तुझं ‘मागणं’ म्हणजे कैकीयीच्या मागण्याप्रमाणेच दिसतंय् ? तुझ्या मागण्यांत कुणासाठी राज्य अन् कुणासाठी वनवास वगैरे आहे का ?”

आता मात्र हिरा चमकला. त्याचं मागणं खरंच अवघड होतं. त्याच्या मुखीं शब्दच येईना आपण कैकेयीसारखे आहोत का ? आपल्यामुळे कुणाला वनवास घडणार आहे का ?

एवढयांत सुमित्रेचे वडील आले. रायाने त्यांचं प्रसन्न स्वागत केलं अन् मग थोड्या वेळाने त्यांच्याबरोबर राया आणि हिरा निघाले.

‘चहाचं’ घर आलं. अगदी साध्या, पण अत्यंत टापटिपीने सजविलेल्या घरांत राया प्रवेशला आणि मग बैठकींत गप्पागोष्टी सुरू झाल्या. आंतल्या खोलींतून स्टोव्हचा

आणि कप-बशांचा आवाज येऊं लागला. दारावरचा झुळझुळीत पडदा हलत होता. हिराचं लक्ष त्या पडद्याकडे होतं. त्याचं मन पडद्यापलीकडे होतं. मध्ये होता पडदा. अंतर-पाटासारखा. हिराला प्रत्येक क्षण जड होता अन् थोड्याच वेळांत तो पडदा हलला. बांगड्यांची किणकिण् उमटली—आणि बटाटे-पोह्यांचं ताट घेऊन सुमित्रा बाहेर आली. रायाची दृष्टि वळली. तिला पाहातांक्षणींच रायाला पटलं की, हिरा म्हणतो तेंच खरं. हिरकणी! चाफेकळी! चांदणी! अगदी साध्या वेषांतहि सुमित्रा खुलत होती.

"ही आमची सुमित्रा! यंदा मॅट्रीक झाली."

"असं? वा छान!"

सुमित्रेने हसून नमस्कार केला अन् तिची दृष्टि खाली वळली.

आणि मग पुरांतल्या गमतीकडे विषय वळला. खरोखर सुमित्रेचं बोलणं फार प्रसन्न होतं, गोड होतं, शालीन होतं. गप्पा गोष्टींत पोहे, चहा केव्हा संपला हें समजलंच नाही. वेळ भुर्रकन् उडाला.

चहा घेतांना हिराचं लक्ष तिच्या पावलां-कडे गेलं. कोड होतं तिथ!

आणि मग लवंग वेलदोडा घेऊन राया उठला. वडिलांनी आणि तिने रायाला निरोपाचा नमस्कार केला. रायाच्या या भेटीने वडिलांना फार बरं वाटलं होतं. ते म्हणाले,

"अगदी अचानक योगायोग आला हा!"

"खरोखर योग! कित्येकदा मुद्दाम ठर-वूनहि असं घडत नाही!"

"म्हणूनच याला योगायोग म्हणतात.!" सुमित्रा हसून म्हणाली. सर्वच हसले.

राया आणि हिरा बाहेर पडले अन् हिरा रायाला म्हणाला—

"सरकार, कन्हाबाईकड चलतांना?"

"हो! चला जाऊं या!"

पावसाच्या तडाख्याने अनेक ठिकाणीं पडझड दिसत होती. राया बोलत होता. हिराचं आपल्या बोलण्याकडे मुळीच लक्ष नाही हें त्याच्या लक्षांत आलं. कन्हेचा कांठ आला. पूर ओसरलेला होता.

"सरकार, तिथ्योर पानी चढलं व्हतं अन् तिथ्यून उडी घेतली त्या पोरीन!"

हिरा एकदम बोलला. रायाला महापुराचं आणि सुमित्रेच्या धाडसाचं आश्चर्य वाटलं.

"बापरे! कमाल आहे तिची! खरंच हिरा फार फार चांगली आहे मुलगी!"

"होय ना? मंग आता सांगा!"

"काय?"

"सरकार, तुम्ही वळखलंय् माझ्या मनांतलं?"

"अरे काय ओळखलंय्? वेडा?"

"खरंच वेड लागलंय् मला! मंग येड्यालाबी समजल असं सांगा!"

"अरे काय पण? स्पष्ट बोल ना हिरा तुला काय म्हणायचंय् तें!"

"सरकार!" हिराचा चेहरा कसासाच झाला. छाती धडधडत होती. त्याला भय वाटत होतं.

"सरकार, तुमचा बाळपणींचा सखा म्हनून इचारतों. इचारूं?"

"विचार ना?"

"तुमच्या मनापल्याडचं बोललों म्हनून राग न्हाई न धरनार?"

"नाही, कधीच नाही!"

हिराच्या मुखावर हजार तऱ्हेच्या लाटा उमटत होत्या. जिवाचा धडा करून तो म्हणाला,

"मला ती पोर लई लई आवडलिया!"

रायान चमकून हिराकडे पाहिलं.

"तिची मूरत माझ्या मना जडलीय! लई माया जडलीय् माझी! मी मागणं माग-तोय् सरकार—पुरवाल?"

"बोल!"

"साऱ्या जल्मभर माझ्या डोळ्यापुढ त्या लक्षिमीची मूरत ऱ्हावी! यवढं करनं तुमच्या हातीं हाये!"

"म्हणजे हिरा—?"

"ह्या कऱ्हेंत तिनं मला पुना जलम् दिला. पहिला जलम् देणारी आई मला न भेटतांच मरून गेली. दुसरा जलम् देणारी ही आई हाये माझी! ती तुम्ही मला काय-मची घरीं आणून द्या!"

"म्हणजे हिरा–?"

"म्हंजी तुम्ही तिच्यासंग लगीन लावा! होय म्हना सरकार! मला हक्काची आई, हक्काची भावजय आना! यवढी गुनारूपाची खान माझी बाई. तिचं रीण म्या कसं फेडूं?"

"हिराऽ!" राया त्याचा दंड धरून हसला.

"थांबा बाईच धनी! सोपं न्हाई त्यें! त्या लक्षिमीच्या पावलावर सुबडानं पीस चिकटलंय्!"

"म्हणजे?"

"कोड आहे तिच्या पावलावर? वाढतंय् त्यें! उंद्या समद्या आंगभर पसरल त्यें!"

"होय हिरा?"

"व्हय, पांढऱ्या पायाची म्हनत्यात समदीं तिला. दुसऱ्याचा येकुलता येक पोर वांचिवणारी अन् दुसऱ्याच्या सौंसारांत आनंद वोतणारी ही लक्षिमी लोकान्ला पांढऱ्या पायाची वाटतीया. यवढी इद्यावती, रूपावती पर पायदळीं चाललीया. तिचा बा लगनाची घाई करून कुनाबी निब्बर नवऱ्याच्या गळ्यांत घालनार हाये. मला समदं कळलंय् —पर कुनाला सांगूं? मी लोकांच्या पायदळींचा महार! येडा-अडानी. कुत्रं इचारींना जगांत!"

"हिरा—!" राया संतापून ओरडला.

"न्हाई न्हाई! चुकलों धनी. थोरलं सरकार तुमच्यावर करीत न्हाईत यवढी पीर्त माझ्यावर करत्यात. धाकल्या भावावर करनार न्हाई यवढी माया तुम्ही माझ्यावर करता. म्हनूनच म्या तुमच्याकड धावलों. पर ऽ सरकार...म्या कैकयीचा प्येच न्हाई घालीत. तिच्या सुखाइकतंच तुमचंहि सुख मला प्यार हाये. पर ऽ म्या काय करूं? म्या काय करूं?"


हिराचा गळा दाटून आला होता. डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या होत्या. राया हिराकडे पाहतच राहिला होता. त्याला हिरा मोठा दिसत होता. खूप मोठा! डोंगरा-एवढा! हिराची आकृति आणखीनच मोठी मोठी होत चालली आहे असं त्याला भासत होतं. हिरा रायाकडे पाहत होता. कौल लावलेल्या देवाकडे पाहावं तसं.

आणि एकदम रायाच्या मुद्रेवर हास्य उमलत उमलत गेलं. त्याने कऱ्हेच्या पाण्याची ओंजळ भरली अन् हिराच्या ओंजळींत ओतीत म्हटलं,

"हिरा तुझं मागणं मंजूर, हें वचन!"

सरकाऽऽऽर!"

हर्षातिरेकाने हिरा गरजला आणि त्याने रायाला एकदम उंच उचललें.




## ★ शिवण्याचें मशीन ★

दि. बा. मोकाशी

### यंत्रामुळे होणारी कौटुंबिक बचत

जगभर सर्वत्र आढळणारें यंत्र कोणतें असेल तर तें शिवणाचें. असें म्हणतात की, ध्रुव प्रदेशावरील झोपड्यांपासून तें वाळवंटांतील अरबांच्या तंबूपर्यंत सर्व ठिकाणी शिवणाच्या यंत्राचा ' कट् कट् कट् कट् ' आवाज ऐकूं येतो. आपल्या देशांतहि आता शिवण्याचीं यंत्रें तयार करणारे कारखाने निघाले आहेत. वर्षाला हजारो शिवणयंत्रें तेथून बाहेर पडतात. या यंत्रांच्या किंमतीहि सर्वांच्या आटोक्यांत येतील अशा होत आहेत. हल्ली ज्या किंमती आहेत त्याहि पुष्कळांना जास्त वाटत असण्याचा संभव आहे. हें खरें असलें तरी आहेत त्या किंमतीतसुद्धा हीं यंत्रें घेणें फायद्याचें ठरेल. असें मला वाटतें.

एका कुटुंबांत चार माणसें आहेत असें समजूं. त्यांत दोन मुलं व आई-वडील आहेत असं धरूं. कांही फॅशनचे म्हणून व कांही शिवण्यास कठिण म्हणून शिंप्याकडे दिले तरी बाकीचे कपडे शिवण्यानेसुद्धा माशिनची किंमत वसूल होईलच आणि कौटुंबिक बचतहि होईल. कशी तें पाहा—

चार माणसांच्या कुटुंबाला वर्षाला खालीलप्रमाणे कपडे लागतात. त्यांची शिलाईहि पुढे दिली आहे.

| | रु. | न. पै. |
|---|---|---|
| ६ फ्रॉक्स् | ६ | ० |
| ३ चड्या | ० | ७५ |
| ६ शर्ट<br>६ हाफपँन्टस् | ९ | ० |
| ६ झंपर | ६ | ० |
| ६ परकर | १ | ० ० |
| २ अंडरलिनन | २ | ० ० |
| ३ चड्या | १ | ० ० |
| ६ अभ्रे | १ | ५ ० |
| ६ हातपिशव्या | १ | ५ ० |
| खिडक्याचे पडदे, चादरीला मुरडी, रुमाल, फाटलेले कपडे शिवणें, इ. | ३ | ० |
| | ३१ — | ७५ |

वर्षाची शिलाई बत्तिस रुपये होते. यांत बाळंतविडे वगैरेसाठी होणाऱ्या प्रासंगिक शिलाया धरल्या नाहीत. त्या धरल्या तर वर्षाला पस्तीस रुपयांची शिलाई मशीन घेतल्यानें सहज वाचते. आतां मशिनच्या हल्लीच्या किंमती पाहा—पन्नास रुपयांपासून नवीं शिवणयंत्रें विकाऊ आहेत. पण इतकीं स्वस्त यंत्रें घेऊं नयेत. कारण तीं टिकाऊ नसतात. साधारण चांगल्या प्रतीच्या मशिनच्या किंमती पुढीलप्रमाणे आहेत—

हातमशिन रु. १८०—०—०
पाय मशिन रु. २५०—०—०

याशिवाय जसजशा सोई वाढत जातात तसतशी मशिनची किंमत वाढत जाते. पण घरगुती कामाला येणाऱ्या मशिनच्या किंमती वरीलप्रमाणे धरावयास हरकत नाहीत. एका कुटुंबाला शिलाईसाठी येणारा वार्षिक खर्च आपण पस्तीस रुपये धरला आहे. जर हातमशिन घेतलें असें धरलें, तर साधारण पंधरा वर्षें तरी तें मशिन काम देतें. पैकी हातमाशिनची एकशेऐशीं रुपये किंमत. वर्षास पस्तीस रुपये शिलाई वांचली. या हिशेबाने पांच वर्षांत मशिनची किंमत वसूल होते. पायमशिन घेतलें तर साधारण सात वर्षांत किंमत वसूल होते. पंधरा वर्षांनंतर मशिन विकलें तर त्याची कांही तरी किंमत येतेच. दोरा, सुई आणि दुरुस्ती यासाठी ही रक्कम खर्चीं गेली असें धरलें तरी हरकत नाही.

वर्षास पस्तीस रुपये शिलाई ही रक्कम आपण अतिशय कमी धरली. कांहींच्या मतें ही रक्कम पन्नासपर्यंत धरण्यास हरकत नाही. शिवाय आपण कुटुंबांत चारच माणसें धरलीं आहेत. या सर्वांचा विचार करून मशिनच्या पंधरा वर्षांच्या कालांत कमींत कमी ५०० रुपयांची बचत होईल.

### शिवणयंत्रांच्या तऱ्हा

निरनिराळ्या तऱ्हेचीं शिवणयंत्रें आहेत. उपयोग आणि विविध प्रकारची सोय या धर्तीवरच विविध नमुने आधारले आहेत. साधारणतः खालील नमुने सर्वत्र दिसतात.

१ ) लिंक — धंदेवाईकांसाठी आणि चालण्यास चांगली मशिन.
२ ) डी. लक्स् — टेलरिंगला चांगली मशिन.
३ ) टेलर मॉडेल — याचें पायाचें चाक मोठें असतें. त्यामुळे वेग जास्त येतो.

४) फॅमिली मॉडेल — घरगुती कामाला उत्तम मशिन.

५) कॅबिनेट मॉडेल — याचें मशिन आंत उलट बसवून ठेवतां येतें. त्यामुळे माशिन नको असेल तेव्हा टेबलासारखा उपयोग करतां येतो.

६) डबल पाट — रेडिमेड कपडे शिवणारांसाठी याचा चांगला उपयोग होतो.

७) कपाट मॉडेल — कपाटासारखें बंद करून ठेवतां येतें.

उपयोग आणि सोईच्या दृष्टीने वरील मॉडेल्स् चांगलीं आहेत. त्यांतील आपल्याला सोईस्कर असें मॉडेल घ्यावें. याशिवाय अनेक तऱ्हेच्या व विविध सोयींनी युक्त अशीं मशिन्स आहेत. भरतकामहि याच माशिनवर होतें. रफलर व हेमरहि त्यांत मिळूं शकतात. त्यासाठी तीस – चाळीस रुपये जास्त पडतात. पायमशीन व हातमशीन दोन्हीहि जड वाटत असतील तर विजेच्या मोटारवर कोणतेंहि मशिन फिरवतां येतें. या मोटारची किंमत अंदाजे १८० रुपये पडते. विजेची मोटार लावण्यांत एक फायदा असा कीं, मशीन पाहिजे त्या वेग ने फिरवतां येतें. एखादे वेळेस कुणी हातमाशिन घेतलें तर त्याचें पाय-माशिन करतां येतें. त्यासाठीं वापरण्यांत येणाऱ्या स्टँडची किंमत साधारणत: ६० रुपयापर्यंत पडते.

नवीन मशिन विकत घेण्यापूर्वी तज्ज्ञ अशा शिंप्याचा सल्ला जरूर घ्यावा. मशिन पाहतांना साधारणतः खालील गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावें—

१) चालवतांना मशीन हलकें यावें. सुरुवातीला जड असणारें मशिन पुढें वापरून हलकें होतेंच असें नाही. म्हणून प्रथमच हलकें चालणारें मशिन घ्यावें.

२) मशिननें टाका सोडूं नये.

३) मशीन चालतांना त्याचा योग्य तोच आवाज यावा. दुसरा आवाज येऊं नये.

४) मशिनला चालतांना कोणत्याहि प्रकारची अडचण होऊं नये. तसेंच मशिन घेऊन वापरूं लागल्यावरहि तें असेंच व्यवस्थित चाललें पाहिजे. तें जर तसें चाललें नाही तर ताबडतोब दुरुस्त करून घ्यावें. माशिन वापरूं लागल्यावर नेहमी लागणाऱ्या वस्तूंत दोरा हा मुख्य होय. सर्वसाधारण शर्टींग, चादर यासारख्या कापडां साठी चाळीस-साठ नंबरचे व पँटसारख्या कापडाला तीस ते चाळीस नंबरचा दोरा वापरावा.

मशिनमध्ये कांही वस्तु मधून मधून बदलाव्या लागतात. अशा वस्तु जादा एक एक जवळ ठेवणेंच चांगलें. विशेषतः तुम्ही शहरा-पासून दूर असलो तर ही सावधगिरी बाळगणेंच योग्य असतें. पाय-मशिनची वादी तुटण्याची शक्यता असते. तेव्हा एखादी जादा वादी जवळ असावी. या वादीची किंमत १ ते १–५० रुपयांपर्यन्त पडते. आपण ज्या कापडाचें शिवणकाम नेहमी करतों त्याला योग्य अशा निरनिराळ्या नंबरच्या सुया अधिक घेऊन ठेवाव्यात. सुईची किंमत प्रत्येकी पांच आण्यांपर्यन्त पडते. सदरा, पोलकीं वगैरेसाठी चौदा नंबरची सुई, पँटच्या कापडासाठी सोळा नंबरची आणि भरतकामां-साठी सात किंवा नऊ नंबर सुई अशा विविध नंबरच्या सुयांचा उपयोग करावा. हातमशिन घ्यायची की पायमशिन हें ज्याने त्याने आपल्या सोईवर ठरवावे. जागा कमी असेल तर हातमशिन घेणें चांगलें. कारण घरगुती काम शिंप्यासारखें सतत नसतें. त्यासाठी हातमाशिन पुरेसें होतें. मशिन फिरवतांना हात दुखूंच लागला तर आसपासचीं व घरचीं मुलें व घरांतील मोठीं माणसें (यजमानसुद्धा) हौसेने मशिन फिरवायला येतात.

### हीं हत्यारें ठेवावींत

नव्याने मशिन खरेदी केल्यानंतर त्यासाठी लागणारीं कांही हत्यारें जवळ असणें आवश्यक असतें.

१) बहुरूपी–(युनिव्हर्सल) पान्हा.

२) लहान स्क्रूड्रायव्हर–साधारणतः तीन इंच लांबीचा (मुठ सोडून पुढील पात्याची लांबी) असावा. या स्क्रूड्रायव्हरचें टोक मागील पात्याच्या जाडीपेक्षा रुंद नसावें. टोक जाड नसावें.

३) स्क्रूड्रायव्हर–मोठा. साधारणतः नऊ इंची असावा.

४) मेजर टेप–गुंडाळणाऱ्या टेपाप्रमाणे फूटपट्टी असूं द्यावी.

५) मशिनला तेल घालण्यासाठी बुधलीचा उपयोग करावा. मशीनकरिता मिळणारें खास तेल वापरावें अगर पेट्रोलपंपावर विकत मिळणारें 'स्पिंडल ऑईल' वापरावें. मशिनमध्यें रॉकेल किंवा खोबरेल तेल वापरूं नये.

---

## तयार कपड्यांची जन्मकथा

आज आपल्याला बाजारांत वाटेल ते तयार कपडे मिळतात आणि ते अंगालाहि बहुधा फिट् बसतात. त्याचें श्रेय सैनिकां-कडे म्हणजेच युद्धाकडे जातें. अमेरिकेच्या यादवी युद्धांत सैनिकांच्या कपड्यांसाठी सरकारने मापें घेतलीं व त्यावरून सर्वसाधारण मापें ठरवलीं. त्यामुळे प्रत्येक सैनिकाचें माप घेऊन कपडे शिवण्यांत जाणारा वेळ वांचून या ठरविलेल्या मापांचे भराभर कपडे शिवून पुरवितां आले.

या सर्वसाधारण मापांवरूनच आयते कपडे करणाऱ्या कारखानदारांनी नंतर नागरिकांसाठी कपडे करण्यास सुरुवात केली. छाती अमुक असली की, बाह्यांची लांबी अमुक, कमर अमुक हे ठोकताळे सैनिकांसाठी काढलेल्या आकड्यांवरूनच त्यांनी तयार केले. या मापांचा सशास्त्र अभ्यास करून "३६"–"४०" असे आकार ठरविण्यांत आले.

## स्त्री स्वातंत्र्याला हातभार

स्त्रियांना स्वातंत्र्य मिळवून देण्यांत शिवण्याच्या यंत्राचा मोठा किंबहुना सर्वच हात आहे. पूर्वी घरचे कपडे हातानें शिवतां शिवतां स्त्रियांना किती कष्ट पडत आणि किती वेळ जात असे याची कल्पना मशिन नसतांना कपडे शिवलेले ज्यांनी पाहिले असतील त्यांनाच येईल. शिवण्याचीं यंत्रें निघाल्यानंतर कपडे शिवण्याचें कारखानेंच निघाले आणि त्यांतून स्त्रियांना काम मिळालें. मोठ्या प्रमाणांत याचवेळीं स्त्रियांनी अर्थोत्पादन सुरू केलें. अर्थात् त्याचा परिणाम कुटुंबांत त्यांचें स्थान बदलण्यांत झाला आणि स्त्री-विमोचनाचें कार्य जास्तच सुकर झालें.

६ ) कातरी—आपल्याला झेपेल अशी कातरी घ्यावी. मिरतच्या कातऱ्या चांगल्या असतात.

**मशिन घेतल्यावरची दक्षता**

मशिन घेतल्यानंतर मशिनची संपूर्ण माहिती करून घ्यावी. एवढेंच नव्हे तर त्यांतील कांही गोष्टी तर चांगल्या जाणकाराकडून शिकून घ्याव्यात.

१) सुई कशी बसवावी, कशी बसवूं नये हें शिकून घ्यावें. जर सुई उलटी बसली तर टाका येत नाही. किंवा शटल्वर मार खाते.

२ ) मशिनमध्ये तेल कोणकोणत्या ठिकाणीं घालावयाचें त्या जागा माहीत करून घ्याव्यात.

३ ) पट्टा तुटला तर नवा पट्टा कसा जोडतात तें पाहून घ्यावें.

४ ) बॉबीन भरतांना बॉबीन भरण्यासाठी जागा केलेली असते, त्या जागेवरच भरावी. चाकाला घासून भरूं नये.

५ ) दोऱ्याचें बंडल वर लावल्यानंतर दोरा कशा रीतीने ओवून घ्यावा लागतो तें पाहावें.

६ ) चांगलें कापड शिवण्यास घेण्यापूर्वी वाईट कापड पुष्कळदा शिवून पाहावें. म्हणजे शिवण्याच्यावेळीं सर्व क्रिया आत्मसात होतील.

**नवशिक्यांस कांही सूचना**

नवशिक्यांना सुरुवातीला धागा नालेंत गुंतण्याचा नेहमी त्रास होतो. तेव्हा नाल काढण्याचें दुकानदाराकडून शिकून घ्यावें. मशिन चालू करण्यापूर्वी कापड दाबून ठेवणारा घोडा खाली करावा लागतो. सुरुवातीला ह्या गोष्टीचें विस्मरण होतें. बॉबीन भरतांना चाक सैल करून ठेवावें लागतें. टिपेची मर्यादा संपतांच वेगांत आलेलें मशीन थांबवण्यासाठी चाकाकडे हात झटकन् जावा लागतो ····ही गोष्ट सरावाने साध्य होते. टीप घालतांना कापडाचें खालचें टोक वर येऊन घोड्याखालून जाऊं लागतें व दोन्हीवर एकदम टीप बसते ही चूक सरावाने निघून जाते. मशिन कांही वेळा नकळत उलट्या दिशेने फिरवली जाते. या सर्वसाधारणपणें नवशिक्यांच्या बाबतींत होणाऱ्या चुका आहेत. त्या लक्षपूर्वक टाळल्यास आपण थोड्याच दिवसांत वाकबगार होत जातों. साधारणतः दर आठ दिवसांनी मशिनला तेल देत जावें. मधून मधून जरी मशिनला काम नसलें तरी त्याला तेल देत जावें. त्याचप्रमाणे मशिन कांही वेळ फिरवून स्वच्छ करून ठेवावें

❉ ❉

# डाग काढण्याचे उपाय

कपडे स्वच्छ राहावेत म्हणून आपण सर्वप्रकारची काळजी सदैव घेत असतों. तरीसुद्धा लहान मुलांच्या हातून कपड्यांवर डाग हे पडतातच. कित्येक वेळेला तर कपड्यांवरचे डाग काढणें त्रासदायक होतें. म्हणून येथे कपड्यांवरचे डाग काढण्याचे अत्यंत सोपे व घरगुती उपाय सांगितले आहेत.

विशेषतः रंगीत कपड्यांवरचे डाग संपूर्णपणें काढतां येत नाहीत. कारण कपड्याचा रंग जाण्याचा संभव असतो. रंगीत, रेशमी व गरम कपडे यांच्यावरचे डाग काढतांना सोडा अगर पाणी यांचा कधीहि उपयोग करूं नये.

**शाईचे डाग—**

( १ ) डाग ओला असेल तर त्यावर ताबडतोब उकळतें पाणी ओतावें.

( २ ) शाईचा डाग वाळलेला असेल तर तो प्रथम ओला करावा, त्यावर मीठ व लिंबाचा रस चोळावा. थोड्या वेळानंतर कपडा साबणाने स्वच्छ धुवावा.

( ३ ) डाग पडलेला भाग रात्रभर दह्यांत अगर ताकांत बुडवून ठेवावा व दुसरे दिवशीं चोळून धुवावा.

डाग पडलेल्या भागावर टोमॅटो कापून लावला असतांहि डाग ताबडतोब जातो.

**गवताचा डाग—**

गवताचा डाग पडला असेल तर डाग पडलेला भाग रात्रभर रॉकेलमध्यें भिजत ठेवावा; नंतर दुसऱ्या दिवशीं साबण लावून तो डाग पडलेला भाग ताबडतोब धुवून टाकावा म्हणजे गवताचा डाग ताबडतोब निघून जातो.

**रक्त, अंडीं व सर्दीचे डाग—**

कपड्यावर रक्त, अंडी आणि सर्दीचे डाग पडले असतील तर प्रथम थंड पाण्यांत मीठ घालून डाग पडलेला भाग रात्रभर त्यांत भिजत ठेवावा नंतर दुसऱ्या दिवशीं चोळून तो धुवून टाकावा.

**चहा, कॉफीचे डाग—**

१ ) थोडें ऊन पाणी घेऊन त्यांत अंड्यांतील पांढरा बलक मिसळावा व त्या मिश्रणाने तो डाग चोळून धुवून टाकावा.

२ ) चहा व कॉफी यांचे डाग जुने असतील तर त्या डागांवर सोडा चोळावा व उकळतें पाणी त्यावर ओतावें; किंवा डाग पडलेला भाग सरसाच्या पाण्यांत बुडवून ठेवावा व नंतर चोळून धुवून टाकावा.

३ ) चहा, कॉफीचे डाग ओले असतील तर त्यावर तांदुळाची पिठी लावली किंवा तांदुळाची पिठी पाण्यांत मिसळून त्या मिश्रणाने डाग चोळून धुवून टाकला तरी हे डाग ताबडतोब जातात.

**डांबर किंवा गाडीच्या वंगणाचे डाग —**

टरपेंटाईन व अंड्याचा बलक यांचें समप्रमाणांत मिश्रण करावें. त्या मिश्रणांत डाग पडलेला भाग भिजवून ठेवावा. कांही वेळानंतर साबणाच्या ऊन पाण्याने तो डाग चोळून धुवून टाकावा.

**लोखंडाच्या गंजाचे डाग—**

मीठ व लिंबाचा रस यांचें मिश्रण करावें. नंतर हें मिश्रण डागावर चोळावें. असें थोडा वेळ करीत राहिल्यास हा डाग ताबडतोब निघून जातो.

सौ. रानडे

**विधानसभा म्हणजे आमच्या लोकजीवनाचा आरसाच होय. या सभेंतील कामकाज म्हणजे समाजपुरुषाच्या विविध अंगांचें, भाव-भावनांचें प्रतिबिंबच ! ह्या प्रतिबिंबांतील आमच्या निरीक्षकाने वेचलेल्या कांही छटा विधानसभेंतील कामकाजाची, त्याच्या रंगरूपाची यथातथ्य कल्पना आणून देतील.**

# विधानसभेंतील कामकाज

सांसदीय लोकशाहींत सरकारी कारभाराची गति मंद कां असते या 'यक्षप्रश्ना'चें उत्तर विधानसभेंतील कामकाज निरखून पाहिल्याशिवाय सुचणें कठिण वाटतें. एकीकडे 'अंधळी न्याय-देवता' आणि दुसरीकडे 'झोपाळू सभागृह' असलें म्हणजे सरकारी कारभाराची गति मंद नसेल तरच नवल ! अर्थात् न्यायदेवतेला दृष्टि आणण्याचे मार्ग आहेत, तसेंच सभागृहाची झोप उडविण्याचेहि मार्ग उपलब्ध आहेत. सभागृहाची झोप उडविणें हेंच विरोधी पक्षाचें जीवितकार्य होय. अर्थात् कधी कधी केवळ बहुमताच्या जोरावर सभागृहाची झोप उडूं न देण्याचा प्रयत्न सरकार करतें ती गोष्ट वेगळी, परंतु अखेरीस जसें संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत घडलें तसें कांही घडलें कीं, मग मात्र सभागृहाची झोप उडून तें खडखडीत जागें होतें यांत शंका नाहीं. सभागृह जागें होऊं शकतें नव्हे, तर तें जागें होतेंच होतें हा विश्वासच लोकशाहीचा मूलाधार होय. हा विश्वास अभंग राहील अशा रीतीने विधानसभेचें कामकाज चालतें का ?

खरें म्हणजे हा प्रश्न भारतीय लोकसभेच्या कामकाजाबाबत विचारला पाहिजे. कारण सांसदीय लोकशाही हा देशव्यापी विषय आहे, परंतु केवळ आपल्या प्रान्तापुरतेंच बघायचें म्हटलें तर काय दृश्य दिसतें ? महाराष्ट्र राज्यनिर्मितीपूर्वी काय किंवा नंतर काय तर सत्तारूढ पक्षाला बहुमत घवघवीत प्रमाणांत उपलब्ध. विरोधी पक्ष म्हणजे 'संयुक्त आघाडी' पांच गटांचे पांच विचार, पांच नेते. दर वर्षी विरोधी पक्षाचा नेता बदलण्याची प्रथा पडली. या प्रथेमुळे विरोधी पक्षाच्या विरोधामागील सूत्रबद्धता नाहीशी झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासारखा जर ज्वलन्त राजकीय प्रश्न नसता तर 'समिति' कांहीच करूं शकली नसती. कारण असें की, समितीच्या नांवावर निवडून आलेले आमदार विधानसभेच्या कामकाजांत फारसे प्रवीण होऊं शकले नाहीत. या उलट काँग्रेस पक्षांत नानाविध प्रवृत्तींचीं माणसें व गट, त्यांच्यांतहि सलोखा केवळ कामापुरताच ! विधानसभा काँग्रेस पक्षाची संघटना आहे, पण या संघटनेंत सभासदांना विश्वासांत घेऊन आवश्यक ती सल्लामसलत मात्र घेतली जात नाही, असा आजवरचा अनुभव आहे. (यापुढे कांही नवा प्रयत्न झाला तर मात्र गोष्ट वेगळी !) या अशा स्थितींत विधानसभेचें कामकाज कसें चालेल असें वाटतें ?

**प्रश्नोत्तरें म्हणजे कसोटीची वेळ**

विधानसभा जेव्हा भरते तेव्हा आजच्या बैठकींत काय घडणार याविषयीं उत्कंठा नसली तरी औत्सुक्य मात्र जरूर वाटतें. महाराष्ट्र विधानसभा सामान्यतः दुपारीं एक वाजतां आपल्या कामकाजास प्रारंभ करते आणि सायंकाळीं सहा वाजतां आपलें दिवसभराचें काम हातावेगळें करते. या पांच तासांच्या वेळांत केवळ दिवसभराचींच नव्हे तर कधी कधी वर्षानुवर्षें परिणाम टिकतील अशीं कामें हातावेगळीं करतात. (अर्थात् असे भाग्यवान् दिवस थोडे !) खरें म्हणजे चारच तास ! कारण रोजचा पहिला तास प्रश्नोत्तरांसाटी राखून ठेवलेला असतो.

हा प्रश्नोत्तरांचा तास म्हणजे सर्वांच्याच कसोटीचा तास ! उपप्रश्नांचा मारा करतां येतो की नाही यावरून सभासदाची, प्रत्येक उपप्रश्नाला परतवून लावणें जमतें की नाही यावरून मंत्र्यांची (वा उपमंत्र्यांची) आणि पाठशिवणीचा खेळ खेळणाऱ्या या 'प्रश्नोत्तरांशी साथ ठेवतां येते की नाही यावरून श्रोत्यांची दररोजच कसोटी लागून जाते. कधी कधी एखादा आमदार 'माईक' चा वापर न करतांच उपप्रश्न विचारतो आणि मंत्री उत्तराऐवजी 'पुन्हा प्रश्न विचारा' असें सांगतो, तेव्हा श्रोत्यांना दोघांचीहि चीड येते, कारण त्यांना उपप्रश्न चांगला ऐकूं आलेला असतो. (योगायोग !) परंतु एकादेवेळीं सभासदाने काय प्रश्न विचारला हें समजण्यापूर्वीच सभागृहांत हास्यकल्लोळ उठल्याने नव्याने आलेला श्रोता क्षणभर गोंधळून जातो. या प्रश्नोत्तराच्या तासांत सरकारी कारभारावर विदारक प्रकाशझोत टाकणें हेंच आपलें एकमेव कार्य होय असें विरोधी पक्ष मानतो. त्याचबरोबर साहजिकपणें आपले दोष झाकले जातील अशा रीतीने सत्तारूढ पक्षाचे प्रतिनिधीहि आपल्या 'उत्तराची मांडणी' करतात ! एकदा एका आमदाराने विचारलें, "××× गांवची जमीन सरकारने सीड फर्मसाठी आपल्या ताब्यांत घेतली आहे हें खरें आहे काय ?"

त्यावर कृषि खात्याच्या उपमंत्र्यांनी उत्तर दिलें, "नाही." त्यावर त्या आमदाराने नाना प्रकारचे प्रश्न विचारले, परंतु त्यालाहि ते उपमंत्री बधेनात. अखेरीस त्या आमदाराने त्याचा नादच सोडला ! प्रश्नोत्तरांचा तास संपल्यावर लॉबीमध्ये या दोघांची गाठ पडली, तेव्हा उपमंत्री म्हणाले, "ती जमीन

××× गांवची आहे"

"मग तुम्हीं सभागृहांत तसें कां नाही सांगितलें?" आमदार.

"तुम्हीं तसें विचारलें नाही—" असें म्हणत आणि मिष्किलपणें हसत ते उपमंत्री आपल्या खोलीकडे गेले. अगदी साध्या साध्या गोष्टींतदेखील असा प्रकार होतो तर अधिक गंभीर गोष्टींत काय होत असेल याची केवळ कल्पनाच केलेली बरी!

**मंत्रीमहाशयांचीं अजब उत्तरें**

कधी कधी तर मंत्रीमहाशय अशीं उत्तरें देतात की, प्रश्नकर्ता चाटच पडतो. वानगीदाखल एक उदाहरण देतों. उन्हाळा अधिवेशनांत एका सभासदानें प्रश्न विचारला की, "आजकाल साखरेचे भाव कां चढत आहेत?" त्यावर मंत्रीमहाशयांनी उत्तर दिलें, "माणसें सरबतें जास्त पितात"—अशीं उत्तरें ऐकल्यानंतर गप्प बसण्यापलीकडे तो बिचारा सभासद तरी काय करणार! त्यांत मोठी अडचण अशी की, सभागृहांत मंत्र्यानें दिलेलें उत्तर खरें मानलें पाहिजे असा शिरस्ता आहे. मंत्र्यानें दिलेलें उत्तर चुकीचें आहे असें वाटलें तरी त्याविषयीं त्याक्षणीं वाद घालतां येत नाही. फारतर इतर उपप्रश्नांच्या द्वारें त्यांतील चूक सभापतींच्या नजरेस आणून तो प्रश्न 'रोखून' धरला जातो. सभापतींनी प्रश्न रोखून धरावा यासाठीच विरोधी पक्षीयांनी प्रयत्न केला असेल तर एक प्रकारची विजयाची भावना विरोधी पक्षाच्या आमदारांच्या चेहऱ्यावर तरळून जाते. अशीच आनंदाची छटा उत्तर देणारा मंत्री किंवा उपमंत्री उपप्रश्नांच्या भडिमारानें जेरीस आला म्हणजे आढळते. केळीच्या सालीवरून घसरावें त्याप्रमाणे एखाद्या उपप्रश्नाचें उत्तर देतांना मंत्री किंवा उपमंत्री घसरला तर मग मात्र सभागृहांत हास्याची खसखस पिकते. अर्थात् असे हास्याचे फवारे उडायला मोठा विनोदच व्हावा लागतो असेंहि नाहीं. मंत्री उत्तर देण्यासाठी उभे राहिले आणि 'माईक' बोलेनासा झाला तरीदेखील सभागृहाचें अर्धांग हसून उठतें!

या प्रश्नोत्तरांच्यावेळीं अनेकदा सत्तारूढ पक्षाचे प्रवक्ते सभागृहाला लहान-मोठीं आश्वासनें देऊन प्रश्नकर्त्यांची नाकेबंदी करतात. दिलेलीं हीं आश्वासनें पाळलीं जातात किंवा नाहीं हें पाहण्यासाठी सभागृहाची एक समिति डोळ्यांत तेल घालून काम करीत असते. या समितीला 'आश्वासन समिति' (ॲशुअरन्स कमिटी) असें म्हणतात. या समितीनें केलेली शिफारस खुद्द सरकारवरहि बंधनकारक असते, यावरून तिचें महत्त्व कळून येईल. प्रश्नोत्तरांचा तास जेवढा गंभीरपणें पाहिला जातो. तेवढाच गंमतीनेहि पाहिला जातो. कधी कधी तर केवळ हसण्यासाठी, फुलण्यासाठी, प्रश्नोत्तरें दिलीं घेतलीं जातात! मात्र हा तास संपतांच सभागृहांतील वातावरण एकदम बदलून जातें.

मुख्य म्हणजे सभागृह एकदम 'मोठें' झाल्याचा भास होतो. कारण अनेक आमदार व मंत्री उठून बाहेर जातात आणि त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागांमुळें सभागृह एकाएकी मोठें झाल्यासारखें वाटतें तें असें. त्यांचें अनुकरण करून श्रोतेहि एकदम 'गॅलरी' तून नाहीसे होतात, (आणि वृत्तपत्रांचे प्रतिनिधि 'गॅलरी' मागच्या खोलींत शान्तपणें प्रवेश करतात.) कांहीं क्षणांपूर्वी तेथे केवळ चैतन्य वावरत होतें याचा नन्तर मागमूसहि लागत नाही. कधी एखाद्या विधेयकावरील चर्चा रंगते, फुलते; तर कधी एखाद्या सरकारी किंवा बिनसरकारी ठरावावर खडाजंगी होते. एखादे वेळीं 'दोन वर्षांपूर्वीच्या' (जुन्यापुराण्या अगर इतिहासजमा झालेल्या) अहवालावर 'रटाळ' चर्चा होते आणि सभागृहाचा 'मूड' पालटतो. तर केव्हा 'कामतहकुबी'-च्या सूचनेवर साक्षात् पानिपत अवतीर्ण होतें. सांगायची गोष्ट अशी की, ज्यांना ज्यांना ज्यांत 'इंटरेस्ट' आहे तें सारें ठराविक वेळेला सभागृहांत उपस्थित होतें. या तासानंतर मंत्री आणि उपमंत्री यांची पांगापांग होते आणि त्याच वेळीं कोणी 'कोरम' चा प्रश्न उपस्थित करतांच 'कोरमबेल' वाजूं लागली म्हणजे सरकार-पक्षाच्या प्रतोदाची अनेकदा तारांबळ उडते, पण सहसा त्यांची नाचक्की होत नाही!

**केवळ राजकीय दृष्टिकोन नको**

कधी कधी तर खिन्नता यावी असें दृश्य सभागृहांत दिसतें. ज्याचा अत्यंत दूरगामी परिणाम होणार आहे अशा लोकशाही विकेंद्रीकरणाच्या योजनेवरील चर्चा धिमेपणानें मार्ग आक्रमीत असते आणि एकूण उपस्थिति अवघी ४०–५० टक्क्यांवर आलेली असते. शिक्षण खात्याच्या मागणीवरील चर्चाहि अशीच रेंगाळते. थोडक्यांत म्हणजे ज्याचा तात्कालिक राजकारणाशी संबंध नाही अशा चर्चांकडे बहुसंख्य आमदारांचें दुर्लक्ष असतें. त्याचवेळीं वाटतें की, राजकीय दृष्टीशिवाय सभागृहाला दुसरी दृष्टि नाही काय? वास्तविक सभागृहांतील कामकाजाला वळण लावण्याचें सामर्थ्य सत्तारूढ पक्षांतच असतें, परन्तु जर या सत्तारूढ पक्षानेच केवळ राजकारणी, तात्कालिक नफ्यातोट्याचा दृष्टिकोन अंगीकारला तर साऱ्या सभागृहालाच राजकीय महत्त्व प्राप्त होतें. अशा वेळीं विरोधी पक्षांतील सदस्य सभागृहांतील भाषणांच्या द्वारें लोकांपर्यंत आपले विचार पोहचवूं शकतात. चतुर व पार्श्वभूमीची चांगली माहिती असलेला सभासद त्यासपीठावर सर्वसामान्य नागरिकांच्या अन्तःकरणाला हात घालूं शकतो. एकदा होमगार्ड संघटनेवर चर्चा चालू होती. त्यांत अनेक वक्त्यांचीं भाषणें झालीं. अखेरीस श्री. एस्. एम्. जोशी उभे राहिले. अत्यंत सौम्यपणें पण खोचक शब्दांत एस्. एम्. होमगार्ड-संघटनेचा आढावा घेत होते. ते म्हणाले, "होमगार्ड-संघटनेच्या उपयुक्ततेचा आढावा घेण्यासाठी सरकारनें वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची एक समिति नियुक्त करावी अशी सूचना मी करूं इच्छितों."

सरकारतर्फे खुद्द मुख्यमंत्र्यांनीच उत्तर दिलें. ते म्हणाले, "पोलिस खात्यांत होमगार्ड-संघटनेबद्दल अनास्था आहे आणि त्यांचीं मनें पूर्वग्रहदूषित आहेत म्हणून पोलिस अधिकाऱ्यांची समिति नेमून उपयोग नाही"

श्री. एस्. एम्. जोशींना ही माहिती होती म्हणूनच त्यांनी तशी खोचक सूचना केली यांत शंकाच नाही. परंतु त्यामुळे पोलिसखातें व होमगार्ड यांच्यांतील अन्तर्गत वैमनस्य जगजाहीर झालें. शिवाय होमगार्ड संघटनेंत कांहीतरी घोटाळा असला पाहिजे आणि त्याची माहिती पोलिसांना असली पाहिजे म्हणूनच मुख्यमंत्री असें उत्तर देतात असा समज पसरायचा तो पसरलाच!

**समाजपुरुषाच्या विविध अंगांचें दर्शन**

सभागृहांतील चर्चा ऐकतांना समाजपुरुषाच्या विविध अंगांचें, सुष्टदुष्ट पैलूंचें दर्शन बसल्याजागीं होऊन जातें, परन्तु त्यासाठी रोज नेमाने पांच तास सभागृहाच्या कामकाजाचें लक्षपूर्वक निरीक्षण करावें लागतें. (अनेकांना ही शिक्षा वाटते!) अनेकदा या चर्चा कंटाळवाण्या होतात. कारण बोलणारे सारेच

सभासद चांगले वक्ते असतातच असें नाही, पण त्यांच्याजवळ सांगण्यासारखें पुष्कळ असतें. ( अर्थात् कधी विसंगत आणि विपर्यस्त विधानें अनेकांच्या तोंडून ऐकावयास मिळतात आणि हास्याची एखादी सर येऊन जाते ) अलीकडे तर विरोधी पक्षांत ' आम्हांला बोलूं द्या ' ची चट निघाली असल्याने चांगलें वक्तृत्व अंगीं असलेले सभासद बोलेनासे झाले आहेत, परन्तु विषयाची पार्श्वभूमि जर चांगली माहीत असेल तर विशेषसें वक्तृत्व नसलेला सभासदहि प्रभावी ठरूं शकतो. लोकांच्या नजरेंत भरून जातो. एक उदाहरण सांगतों—एकदा कशावरून तरी ' क्युम्युलिटिव्ह सिस्टीम ऑफ व्होटिंग'चा विषय निघाला. ॲड. श्री. भंडारे ( विरोधी पक्षाचे नेते ) बोलत होते. मुंबईतील महापालिकेच्या निवडणुकीचा अनुभव लक्षांत घेतां ' अशा मतदान-पद्धतीने जातीयवादाला वाव मिळतो ' असें श्री. भंडारे म्हणाले. त्यावर मुख्यमंत्री मोठ्या खोचकपणें म्हणाले, " तुम्हीदेखील आत्मनिरीक्षण करून पाहा " त्याबरोबर वातावरण एकदम बदललें. त्याहि परिस्थितींत श्री. भंडारे म्हणाले, " आमच्या लोकांनी जातीच्या नांवाने मतें दिलीं नाहीत हें मी सिद्ध करून देईन " पुढे हा विषय तितक्यावरच थांबला.

अशा रीतीने सामाजिक घडामोडींचें प्रतिबिंब सभागृहाच्या कामकाजांत पडलेलें दिसेल. मात्र कित्येकदा हीं प्रतिबिंबें नेमकीं कशाचीं आहेत याचा उलगडा त्यांतील दर्दी जाणकारांशिवाय इतरेजनांना होत नाही. उदा. जुन्या कायद्यांना ज्या दुरुस्त्या सुचविण्यांत येतात त्या असतात मोठ्या खुसखुसशीत, परंतु अमक्या कलमांतील असलेल्या या शब्दां ऐवजी पुढील शब्द घालावेत असें सुचवून काम उरकलें जातें. अशा वेळीं कायद्याच्या क्षेत्रांतील जाणकारच त्यांतली नेमकी ' मेख ' ओळखूं शकतात. ( इतरांच्या दृष्टीनें हें अणुविज्ञानच ! ) या दुरुस्ती-सूचनांनाहि दुसऱ्या दुरुस्त्या सुचविण्यांत येतात आणि त्या मतास टाकतेवेळीं सभापतींना वा अध्यक्षांना बोलावें लागतें की, ' मूळ दुरुस्ती ' सूचनेकरितां आलेल्या दुरुस्ती-सूचनेची ही दुरुस्ती-सूचना आपल्यापुढे आहे... ( अर्थात् यांत केवळ नवख्या श्रोत्यांना चमत्कारिकपणा वाटतो ).

## ए क च प्या ल्या चा........
## ........गो ड शे व ट ! ! !

एकदा पुण्यांतील कांही गाळीव कलावंतांचा नाट्यसंच सावंतवाडीस गेला. एका नाट्यमंदिरांत त्यांचे नाट्यप्रयोग सुरू झाले. हे दिवस गणेशोत्सवाचे होते. एके दिवशीं गांवांतील एका गणेशोत्सव मंडळाचे कांही कार्यकर्ते ह्या कलावंतांकडे कार्यक्रम मागायला आले आणि म्हणाले,

" आमच्या गणेशोत्सवांत तुम्ही ' एकच प्याला ' नाटकाचा प्रयोग कराल काय ? बिदागी चांगली देऊं जर करीत असाल तर ' सुपारी ' देतों ! ठरवा ! "

ह्या सुपारीनें कलावंतांना आनंदच झाला. चांगलीशी बिदागी सहज जातां जातां पदरांत पडत होती. कलावंतांनी त्यांना होकार दिला, पण निमंत्रण देणाऱ्यांनी लगेच एक अट घातली. ते म्हणाले,

" ह्या तुमच्या एकच प्याला नाटकाचा शेवट दुःखांत होतां कामा नये ! सुखांत झाला पाहिजे ! अहो हा गणेशोत्सव आहे. सर्व सुखाचं, आनंदाचंच असलं पाहिजे ! दुःखबिःख चालणार नाही ! "

आता आली का पंचाईत ! ' एकच प्याला'चा शेवट गोड करायचा ! अन् तो कसा ? मूळ नाटकांत असें आहे की, दारूबाज सुधाकर पश्चात्ताप पावतो. दारू सोडण्याचें सिंधूला वचन देतो. पुन्हा सुखी संसार जगण्या साठी नोकरी शोधायला जातो, परंतु त्याला कोणीच नोकरी देत नाही. त्यामुळे तो वैतागून पुन्हा दारूकडे वळतो अन् अखेर दुःखाचा कडेलोट होऊन नाटक संपतें.

आता अशा ह्या ' प्याल्याचा ' शेवट गोड कसा करायचा ? पण ह्या बहाद्दर कलावंतांनी शेवट गोड करण्याच्या अटीवर बेधडक होकार दिला.

नाटकाचा खेळ सुरू झाला—रंगत चालला.

—आणि आमच्या ह्या कलंदर कलावंतांनीं ह्या ' नोकरी मागायच्या ' प्रवेशांत सुधाकराला एकदम पांचशे रुपयांची नोकरी देऊन टाकली ! सुधाकराला गेल्या चाळीस वर्षांत न मिळालेली नोकरी मिळाली ! त्याला आनंद झाला ! सिंधूला आनंद झाला ! प्रेक्षकांना आनंद झाला ! गणेशोत्सवाच्या कार्यकर्त्यांना आनंद झाला ! आणि कलावंतांना झालेला ( अ ) कलेचा आनंद तर काय वर्णावा ! आनंदी आनंद !

### अशीहि माणसें असतात !

लाचलुचपत, वशिलेबाजी, दारूबंदी आदि प्रश्नांवर आजपर्यंत अनेकदा सभागृहांत लढाऊ-मोठ्या शाब्दिक चकमकी झाल्या आहेत. कधी त्यांची दखल घेतली गेली, तर कधी घेतली गेली नाही, परन्तु सरकारी कारभारांतील दिरंगाईप्रमाणेच याहि दुखण्यावर सभागृहाला अद्यापि रामबाण औषध सापडलें नाही. सामान्यपणें दैनंदिन जीवनाशी निगडित अशा बाबींविषयी निर्णायक, फलदायी असें कांहीच करतां येत नसल्याने अनेक तळमळीच्या आमदारांच्या जिवाची तगमग होते. अनेकदा त्यांची ही तळमळ, तगमग कधी चिडीच्या स्वरूपांत तर कधी निराशेच्या स्वरूपांत सभागृहांत व्यक्त होते, पण हीच मंडळी आपल्या ओळखीच्या, खास ' सलगी '-च्या आणि जरुरीच्या व्यक्तींसाठी अधून मधून खुद्द मुख्यमंत्र्यांनादेखील गळ घालण्यास कमी करीत नाहीत, परन्तु अशाहि समुहांत ' कोणाहि व्यक्तींची मी तरफदारी करणार नाहीं ' अशी स्पष्ट जाणीव निवडणुकीच्याच वेळीं आपल्या मतदारांना करून देणारा एखादा आमदार भेटतोच ! अशीं माणसें सभागृहांतील कामकाजापेक्षा सभागृहाच्या समित्यांतून प्रामुख्याने भाग घेतात.

## विधानसभेची कार्यपद्धति

एस्टिमेट कमिटी व पब्लिक अकाउंटस् कमिटी या दोन अत्यंत महत्त्वाच्या अशा कमिट्यांमार्फत सभागृह सरकारी कारभारावर करडी नजर ठेवतें. मात्र त्यांचे अहवालच फक्त लोकांपुढे येतात. या समित्यांचें कामकाज अत्यंत गुप्त ठेवलें जातें आणि बातमीदारांना जरी तें कळलें तरी त्याचा उपयोग त्यांना बातमींत करतां येत नाही आणि एखाद्यानें कमिट्यांच्या कामाची वाच्यता करण्याचा प्रयत्न केला तर त्यावर सभापति आवश्यक ती कारवाई करूं शकतात. ( वेळप्रसंगीं अशा बातमीदाराला प्रवेश नाकारण्याचा अधिकारहि सभापतींना आहे. )

सभागृहाचें लक्ष एखाद्या ज्वलन्त समस्येकडे वेधण्याचा एकमेव मार्ग म्हणजे 'काम तहकुबी सूचना' आणणें होय. अर्थात् सभापतींनी संमति दिल्याशिवाय अशी सूचना सभागृहांत येऊंच शकत नाही. या खास तरतुदीचा उपयोग गेल्या चार वर्षांत अनेकदा झाला, परंतु अद्याप अशा सूचनांचा उपयोग—विदर्भांतील शाळा बंद पडण्याची परिस्थिति निर्माण झाली आहे—अशा प्रकारच्या राजकारणांतील प्रश्नांसाठी झाल्याचें आढळत नाही. अशा प्रश्नांवर अर्धा—एक तास चर्चा घडवून आणण्यांत विरोधी पक्ष निश्चित प्रयत्नशील असतो. या चर्चेमध्ये त्या प्रश्नांशी संबंधित अशा गोष्टींचा बराच ऊहापोह होतो आणि त्यामुळे अनेकदा सरकारलाहि जागरूक राहावें लागतें. कित्येकदा सभागृहांत खडाजंगी उडते, आवेशांत प्रतिपक्षावर आरोप प्रत्यारोप केले जातात आणि तो दिवस उलटून गेला की, त्या सर्वांवर पडदा पडतो ! प्रत्यक्ष हालअपेष्टा, संकटें किंवा अडचणी नागरिकांनाच भोगाव्या लागतात. त्यासमयीं सभागृहांतील विरोधी पक्ष हा आपल्या बाजूचा आहे, अशी भावना निर्माण करण्याचा एक डाव म्हणूनहि उपरोक्त तरतुदीचा उपयोग केला जातो, परंतु जेव्हा खुद्द सभागृह अशा बाबींचा विचार करतें, तेव्हा दोन्ही बाजूंनी सहानुभूतीचाच दृष्टिकोन ठेवतात, असा अनुभव नवें महाराष्ट्र-राज्य निर्माण झाल्यापासून अधिक प्रमाणांत येऊं लागला आहे. समाजांतील लहानांत लहान घटकांच्या सुखदु:खांचाहि साकल्यानें विचार करणारी, त्यांच्या हितरक्षणासाठी कायदे करणारी अशी संस्था म्हणजे विधानसभा याविषयी कोणी आता साशंक नाही. अर्थात् ती भांडवलदारांच्या दडपणाखालीच अद्याप वावरते आहे, असाहि आरोप कधी साधार, तर कधी निराधारपणें केला जातो. जोंपर्यंत लोक आपले आर्थिक व्यवहार आपले आपणच चालवीत नाहीत ( म्हणजे सहकारी जीवनाचा स्वीकार पूर्णतया करीत नाहीत ) तोंपर्यंत हा आक्षेप थोड्याफार प्रमाणांत करतां येईल. अखेरीस एवढें मात्र खरें की, सत्तारूढ पक्षाला राज्य चालविण्यांत मदत करणें हेंच विधानसभेचें मुख्य कार्य होय ! आजच्या काळांत राज्यकर्त्या पक्षाला समाजांतील सर्व आर्थिक घटकांच्या सहकार्यानेंच राज्य चालवावें लागतें ही उघड दिसणारी गोष्ट आहे. आता अलीकडेच लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या योजना आखण्यांत सरकार गुंतलें आहे. जिल्हा-कौन्सीलची स्थापना व्यापक अशा अधिकार-क्षेत्रावर झाली तर विधानसभेवरील 'स्थानिक' स्वरूपाच्या प्रश्नांचा, समस्यांचा आणि विचारांचा बोजा कमी होईल आणि राष्ट्रीय विकासाच्या संदर्भांत प्रांतिक स्वरूपाचीं निरनिराळ्या क्षेत्रांतील लांब पल्ल्याचीं धोरणें निश्चित करण्याचें कार्य अधिक यशस्वी रीतीनें विधानसभेकडून होऊं शकेल अशी निदान आशा तरी करतां येईल.

❋ ❋ ❋

## आऽऽऽकंठ भोजन

एकदा पिलंभट जेवून घरीं निघाले होते. वाटेंत त्यांना चिकटंभट भेटले. तेहि जेवून घरीं चालले होते, पिलंभटांनी विचारलं, "काय चिकटंभट, आज बेत कुणीकडे होता ?"

यावर चिकटंभटांनी कांहींहि न बोलतां सरदार रास्त्यांच्या वाड्याकडे बोट दाखविलें. त्यावर पिलंभटांनी पुन्हा विचारलं, "मग जेवायला काय केलं होतं ?"

एक क्षणभर चिकटंभट विचारांत पडले, पण लगेच त्यांनी घशांत बोट घालून श्रीखंड काढून दाखविलें ! आकंठ भोजन ! लगेच काढलेलं श्रीखंड पुन्हा जागच्या जागीं ठेवून चिकटंभट चालूं लागले !



त्यानं मला एकदम आपल्यापुढं उभी केली न् म्हटलं, " आमच्या लोकांतला ग्योळ बग. " आणि—



# कोंडा कोकल्या

डॉ. सरोजिनी बाबर

भल्या पहाटेचा कोंबडा कोकलला तशी मी उठलें. अंगावरची वाकळ काढून टाकली. डोईचं टोपडं सोडून टाकलं. अंगावरचं परकर–पोलकं नीट केलं. आणिक विहिरीवरचं चाक बोल्तंय् तर कोणीं बरं मोट धरली असेल याचा कानोसा घेत कान दिला. तेवढयांत कोंडा कोकल्याचा साद कानावर आला—

सारंगाला ऽ ऽ ऽ गवळ्याला ऽ ऽ ऽ

चित्तार पाडयाला ऽ ऽ ऽ बोलावो ऽ ऽ ऽ

आणिक त्या पाठोपाठ मोटेची कुईकुई न् थारोळ्यांत पडणाऱ्या पाण्याचा धबधबापग मीं ऐकला. म्हणून मी चटकिनी उठलें. माळीचा आडणा काढला. दार उघडलं. बाहेर आलें. दार ओढून घेतलं न् मळ्यांतल्या विहिरीवर तोंड धुवावं म्हणून पळत निघालें; तर कोंडा कोकल्या पुन्हा आपला बैलावनं गीत गातेला—

सरदारा पाखराला ऽ ऽ ऽ थैमाला वो ऽ ऽ ऽ

वजीरा सुंदराला ऽ ऽ ऽ सागराला घेवाव वो ऽ ऽ ऽ

म्हणून मीं लांबूनच दहीवर पडलेलं गवत तुडवीत जात त्याला हाळी दिली, " ये ऽ ऽ ऽ कोंडा मामा हं ऽ ऽ ऽ " मला त्याच्याबरोबर बेंदूल खेळायचे होते. पण तो आपल्याच नादांत. त्याला माझा साद ऐकायला जसा गेलाच नाहीं. तो आपला मोटेच्या धावेवरून बैलामागून वर–खाली चढत न् उतरत गातेलाच—

गरुडाला पतंगाला ऽ ऽ ऽ माझ्या वडावं वो ऽ ऽ ऽ

फुल्या माज्या चंदराला ऽ ऽ हरणाला वडावं वो ऽ ऽ ऽ

त्या कारणान मीं पळायचा वेग वाढवीत लांबच्या सरळ वाटेन त्याला पुन्हा हाळी दिली, " थांब ये ऽ ऽ कोंडा मामा, कोंडा मामा हं ऽ ऽ ऽ "

आता वरीक त्यान ऐकलं. चटकिनी माझ्याकडे मान वळवीत तो हसला. मला मग बरं वाटलं. मी धावत सुटलें. तशी तो पण कौतुकान बैलांना कुरवाळीत धावेवरची चढण चढून म्हणाला कसा—

सोन्या माज्या हैबतीला वो ऽ ऽ ऽ घेवावं ऽ ऽ ऽ

लाडक्याला मानक्याला घेवावं ऽ ऽ ऽ या ऽ ऽ ऽ

तेवढयांत मोट भरली न् इषारा मिळतांच बैल गळ्यांतील चाळांची खुळखुळ करीत उतरणीला धावले. एव्हाना मीं पण ती जागा गाठली होती. म्हणून घटकाभर बैलांना विश्रांति देत कोंडा मामा–माझ्याजवळ आला. पैरणीच्या खिशांतील चंची त्यान बाहेर काढली. हातावर चुना तंबाखू मळली. ती बुकणी तोंडांत टाकली न् मग मला विचारलं, " कवा आलीस ? "

" बैदूल खेळूं या का ? " त्याच्या प्रश्नाला उत्तर न देतांना मीं माझ्या मनचं बोलून गेलें. त्यामुळ तो हसून म्हणाला, " कवा ? आत्ता ? " तशी मीं ' होय ' म्हणून मान डोलावली. उमेदीन त्याच्याकडे पाहिलं, पण आपल्या बैलांना पाठीवर थोपटीत मोट चालू करून त्यान मला " खुशी का काय ? " म्हटलं न् काम होस्तोंवर थांब म्हटला. त्येला अजून दोन एकर रान पाजायचं होतं.

मला मग गप्प राहणं भाग पडलं, कारण कोंडामामा काम झाल्याशिवाय ऐकणार नव्हता. म्हणून मी तोंड धुवायला धावेपासल्या कुंडाजवळ गेलें. दगडावर दगड उगाळला न् त्यान दात घासले. आणि आता माझे दात करकर वाजवीत कोंडा मामाकडे रबावांत बसणार तर त्यान आपल्या गीताचा साद घालीत हळू-हळू धावेची चढण चढायला सुरुवात केली—

गवळी गवळाला, गवळ्या बाळाला वडाव ऽ ऽ ऽ
हा ऽ ऽ ऽ
फलटन गा गांवांत रामाचं देवाळ ऽ ऽ ऽ
महादेव शिंगणापूर ऽ ऽ खालीं बळीचं देवाळ ऽ ऽ ऽ
हा ऽ ऽ ऽ ऽ
तिथं नंदादीपाला तेल जळं जी ऽ ऽ ऽ
हो ऽ ऽ ऽ आर पाखऱ्या हं ऽ ऽ ऽ
माळ्याच्या मळ्यामंदी दोनी बैल नक्षाची ऽ ऽ ऽ
जोडी माजी गरुड पक्षाची ऽ ऽ ऽ
हो ऽ ऽ ऽ हो ऽ ऽ ऽ ऽ
पाटान पाणी जातं ऽ उसासंगट एरंडाला ऽ ऽ ऽ
—भिंग लावीन पार्वतीच्या परकूराला ऽ ऽ ऽ
हो ऽ ऽ ऽ हा ऽ ऽ ऽ

माझं नांव गीतांत आल्याकारणान मी हरकून दुम्म झालें. हसून कोंडामामाकडे पाहिलं. तोपण हसला. आणिक मग पंढरपुराला जाऊन मला भिंगाचा परकर आणायची गोष्ट करीत त्यान खोपींतली चिलीम आण म्हणून मला पळत जाऊन यायची खूण केली. म्हणून मग नवा भिंगाचा परकर मिळणार या नादांत मी धूम पळत सुटलें, पण खोपींत जायचीं ती थेट मळ्यांतल्या घरांत आलें. आज्जीकडून दही-भाकरी घेतली. पोटभर न्हारी केली. सोपा लोटून काढला. धारेची कासांडी घासून दिली. घरांत आलेल्या पावण्याला चिलीम ओढण्यासाठी चुलींतला विस्तव दिला आणिक मग कोंडामामाची चिलीम आणायला त्याच्या खोपीकडे धावलें.

एव्हाना दिवस उगवला होता. खुराड्यांतल्या कोंबड्या परड्यांत पसरल्या होत्या. गांवांतली गिरणी ' कुद्दप्...कुद्दप्... ' करीत साद घालूं लागली होती आणि मळ्यांतील भाजी खुडायला मामी बटा बांधून निघाली होती. म्हणून मग कोंडामामा रागे भरील या भीतीने मीं छपराच्या खामनीवर ठेवलेली त्याची चिलीम अन् काड्याची पेटी घेऊन पळत मोटेच्या धावेवर आलें.

मला आलेली बघून कोंडामामान मोट सोडली. बैलांच्यापुढ कडबा सोडून टाकला न् मला विचारलं, " एकलीच न्हारी करून आलीस न् मला ? " आता मी काय बोलूं ? नुसती हसलें. चिलीम त्याच्या हातांत दिली. काड्याची पेटीपण दिली. मग तो एका दगडावर बसत म्हटला कसा, " पार्वती, पंढरीला येतीस काय ? "

हें ऐकून मला एकदम बरं वाटलं. मी चटकन् ' हो ' म्हणालें. त्यामुळे कोंडामामाहि थोडा सुखावला. चिलीम ओढीत बसला. मुंडाशांत त्यान काड्याची पेटी खोवली आणिक उजव्या बाजूच्या खिशांतील दोन बैदूल काढून देत म्हणाला, " आता पोरीच्या जातीला नग ह्या ख्योळ. " म्हणून मीं बैदूल घ्यायला पुढ केलेला हात माग घेतला. नवल ऐकावं त्याप्रमाण भुवया वर चढवीत त्याच्याकडे बघूं लागलें. तो असं कां म्हणाला होता हेंच मला कळेना. म्हणून मी आपली त्याच्याकडे बघतच राहिलें. तशी मग एक बारकासा दगड उचलून कुठे तरी भिरकावीत न् चिलमीचा झुरका मारीत कोंडामामा पुटपुटला, " तुजी आईच नग म्हनूतीया. पन् तूं खेळ बैदूल, बगूं मग. "

त्यामुळ मला एकदम बरं वाटलं. त्या नादांत मी विहिरीवरच्या पलीकडल्या काठावरील उंच झाडावर लोंबणारं चिमणीचं कोटं काढून घ्यावें म्हणून भराभरा निघालें. कोंडामामान विचारलं तरी तशीच पुढ सटकलें. डोंगरजाईचे झुबके तोडून खात तशीच काट्याकुट्यांतून वाट काढीत पुढ निघालें. तशी कोंडामामा ओरडला, " पडशीलबिडशील की ये ऽ ऽ पार्वती ऽ ऽ ऽ माग येतीस का न्हाय गुमान ! "

आता मात्र पुढ जायची माझी मात्रा नव्हती. कोंडामामा आमच्या मामाच्या घरचा गडी होता. तरी मालकासारखा वागायचा. त्याच्यापुढ कुणी उलटं बोलायची सोय नव्हती. आम्हीं पोरासोरानी तर त्याचं ऐकलंच पाहिजे एवढा त्याचा दरारा होता ! आणि मुख्य म्हणजे मामांना तें पटत होतं, म्हणून मी त्याच्या बोलण्यासरशी माघारी वळलें. आणखी " एरा पाव, दोरा चिटी, मेरी मिठी, चीरी घोडे..." असली भाषा करीत विटीदांडू खेळायची गोष्ट काढावी ह्या नादांत भराभरा पुढचा अडचणीचा भारा माग सारूं लागलें.

तितक्यांत माझा पाय निसटला न् आता मी विहिरींत पडणार तर कोंडामामान वाऱ्यासारखी माझ्यावर झडप घातली. भीतीन दडपलेला माझा जीव मग एकदम किंचितसा हुषारींत आला न् मीं उगचच भोकाड पसरलं ! जशी काय मी विहिरींत पडलेंच ही भावना ! !

# टायफॉईडचा प्रतिबंध

डॉ. लीला गोखले

'मुदतीचा ताप' या नांवानेही ओळखला जाणारा हा रोग पाण्याची टंचाई असली तर फार लवकर फैलावतो. या रोगाचे जंतू असतात. ते १०० अंश सेंटिग्रेड या उष्णतामानांत मरतात. त्यामुळे उकळलेलें पाणी, उकळलेलें दूध, व ताजें शिजवलेलें अन्न घेणाऱ्यांना हा रोग सहसा होत नाहीं. हा रोग फैलावण्यांत माश्यांचा वाटाही बराच मोठा असतो. माश्यांचे पंख, विष्टा, व वमन रोगजंतूंचा प्रसार करतात. तेव्हा रोग होऊं न देण्याकरता आरोग्याचे साधे नियम पाळले, म्हणजे सहसा रोग होणार नाही.

पुण्यासारख्या ठिकाणीं, म्हणजे जेथे सध्या पाण्याचीं टंचाई आहे, माशांची वाढ होण्याचा संभव जास्त आहे, आणि मदत केंद्रांतून व इतर ठिकाणींहि गर्दी फार आहे, तेथे या रोगाच्या साथीचा संभव फारच आहे. आणि ती होऊं न देण्याचा उत्तम उपाय म्हणजे रोगप्रतिबंधक लस टोंचून घेणें. या लसीची महिन्याच्या अंतरानें दोन इंजेक्शन्स घेतलीं म्हणजे २ वर्षे त्याचा परिणाम रहातो. कांहीं लोक असे असतात, की ज्यांना स्वतःला हा रोग होत नाही, पण त्यांच्या मल-मूत्रांत रोगजंतू असतात. त्यांनी जर जरूर तितकी स्वच्छता बाळगली नाही, आणि ते जर इतरांना अन्न-पाणी वगैरे वाढत असले, तर त्यांच्या हातचें खाणारांनाही हा रोग होतो.

अशा लोकांना 'रोगवाहक' म्हणतां येईल. या कारणामुळे तर खानावळींत व मदत केंद्रांत जेवणारांनी रोगप्रतिबंधक लस अवश्य टोंचून घेतली पाहिजे. तोंडाने गोळ्या घेऊनही रोगप्रतिबंध होतो कां, असा प्रश्न अनेकजण विचारतात. त्याला उत्तर 'नाही' हेंच आहे. इंजेक्शन्स घेणें हाच खात्रीचा उपाय आहे.

### रोगाचें वर्णन व लक्षणें

टायफॉईडच्या तापाची मुदत सर्वसाधारपणें ४ आठवडे असते. रोगजंतूंचा शरिरांत प्रवेश झाल्यापासून ७ ते २१ दिवसांत रोगाचीं लक्षणें दिसूं लागतात. जंतूंचा मुक्काम लहान आंतड्यांत

---

( पान २० वरून )

कोंडामामाला माझं हें रडणं खपलं नाही. त्यान मला उचलून घेऊन मोटेच्या धावेवर नेत उभी केली. स्वतः जाऊन मला पाहिजे होतं तें चिमणीचं कोटं काढून आणून दिलं आणखी म्हणाला, " आता जरा घरांत जा. काम करूं दे आमानी. "

त्यामुळं माझं आणखीनच बिघडलं. मी चक्क " नाही जाणार जा ! " असं बोललें. कोंडामामाला तें खपलं नाही. त्यान रागान माझ्यावर डोळे वटारीत हात उगारला. मग मीपण थोडा जोर धरीत बोललें, " थोडें खेळ की मग तूं ! " आणखी पळत जाऊन त्याच्या कमरेला मिठी मारली. आता बरीक त्याला एकदम बरं वाटलं. त्याच्या पदरीं पोरबाळ नव्हतं. तो गहिवरला. त्यान मला पोटाशी धरली.

आणखी मग त्यान काय विचार केला कुणाला दखल. त्यान मला एकदम आपल्यापुढ उभी केली न् म्हटलं, " आमच्या कोकनांतला ख्योळ बग. " आणि लागला की अवचितच गीत गात नाचायला ! मी ' आ ' वासून बघतच राहिलें. वाऱ्यागत त्याचं अंग चपळाईन हालत होतं न् तोंड भराभर बोलत होतं—

गण गौरीचा बाळ मयेचा । आला झरारा रे ।
रंगणीं नाचत आज रे । करूं या आरती मंगलमूर्ति ।
पूजूंया गणराज रे । स्वार होउनी मूषकावरती ।
येऊनी राखी लाज रे । चौदा विद्येचा रिद्धीसिद्धीचा ।
दाता तूं महाराज रे । रंगणीं नाचत आज रे ।
भक्त तारूनी दुष्ट मारूनी । लावा कीर्तीचा ध्वज रे ।
ब्रह्मकन्या सरस्वति संगे घेऊनी । आज पुरवी काज रे ।
तुझ्या नामाचा ध्वज कीर्तीचा । गाजे अखंड आज रे ।
रंगणीं नाचत आज रे

कोंडामामा कोकण्या माणूस. त्याची ही चपळाई बघून मी थक्क झालें. त्याच्या ह्या नाच-गाण्यापुढ बैदुलचा खेळ मला भारी फिका वाटला. म्हणून मी कोंडामामापुढं त्या खेळाचं नांव न काढतांना तो खाली बसला तशी त्याच्या शेजारी जाऊन बसलें. आणखी काटक्षीन पायाखालची जमीन खुरडीत मला हा खेळ शिकव म्हणून त्याच्यापुढ हट्ट धरला ! तशी तो एवढ्या मोठ्यान हसला की, दावणीच्या बैलांनी तर डिरकाळी फोडलीच, पण मळेकऱ्यांनाहि " आर काय काडी ! लई हासतूयास ? " म्हणून हाळी देत विचारणा केली ...

* * *

असतो. तेथे ते वाढतात व रक्तांतून सर्व शरीरभर पसरतात. मलमूत्रांतून ते शरीराच्या बाहेर टाकले जातात. तीन आठवड्यांनंतर त्यांचा जोर हळू हळू कमी होतो. चवथ्या आठवड्याच्या शेवटी ते आपोआपच नाश पावतात आणि रोग बरा होतो. कधी कधी सर्व जतू नाश पावत नाहीत. थोडे जे उरतात त्यांची एका आठवड्यांत परत वाढ होते व रोगाचीं लक्षणें परत दिसूं लागतात. त्यालाच आपण रोग उलटला असें म्हणतों, परंतु त्याचा जोर पहिल्याइतका बहुतेक नसतो.

जंतूंचा मुक्काम लहान आंतड्यांत असतो, हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळे लहान आंतड्याला सूज येते. नंतर त्याला व्रण पडूं लागतात. व्रणांतून पू व कुजलेला आंतड्याचा भाग बाहेर पडतो व मग ते व्रण हळू हळू बरे होतात. रक्तांतून मेंदू, मूत्रपिंडें प्लीहा, फुप्फुसें वगैरे ठिकाणीं जंतू जातात व तेथेही सूज येते. कधी कधी ते हाडांत व रक्तवाहिन्यांत ( पायांतील नीलांत ) राहतात.

रोगाचीं प्रत्यक्ष लक्षणें दिसूं लागण्याच्या आधी एक आठवडा रोग्याला जेवण न जाणें, पोट फुगणें गुणगुणा फुटणें वगैरे लक्षणें होतात. नतर ताप येऊं लागतो. तापाची चढती कमान असते. म्हणजे रोज सायंकाळीं तो आदल्या दिवसापेक्षा जास्त असतो; दुसऱ्या दिवशीं सकाळीं १/२ अंश फॅ. ने कमी होतो. परंतु सायंकाळीं आणखीच जास्त चढतो. डोकें दुखत असतें. तोंडाला अरुचि असते. जीभ मध्ये पांढरी व कडांना आणि टोकाला लाल असते. पोट थोडें फुगतें व कधी कधी जुलाब होऊं लागतात. ताप वाढत असतांना वातहि होतो. छातींत खोकला होतो. लक्षींतहि आल्युमिन् जातें. प्लीहा वाढते व नुसत्या स्पर्शानेहि दुखते. सर्वसाधारणपणें दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यांत रोगाचा जोर फार असतो व तेव्हाच आतड्यांतील व्रण खोल होऊन आतड्याला भोक पडणें, व्रणांतून रक्तास्राव होणें, वगैरे जीवघेणी उपाधी होण्याचा संभव असतो. तिसऱ्या आठवड्याच्या शेवटी ताप हळू हळू कमी होऊन चवथ्यांत तो सकाळीं नसतो. संध्याकाळीं चढतो व कमी होत होत पुरता थांबतो.

## शुश्रुषा आणि पथ्यपाण्याची काळजी

वरील सर्व विवेचनावरून हा रोग झालेल्याची काय व किती काळजी घ्यायला हवी, हें सहज समजेल. रोग मुख्यत्वेंकरून आतड्याचा असल्यामुळे आहारांतील पथ्याला फार महत्व असतें. सहज पचणारा व शक्ति कायम ठेवणारा असा आहार पाहिजे. अशा वेळीं साहजिकच दूध डोळ्यापुढे येतें, परंतु फार दुधामुळे पोट फुगणें व जुलाब होणें सुरू होतें. म्हणून ताजें अदमोरें ताक चांगलें. सरबत चांगलें. साबुदाण्याची व तवकीलाची लापशीहि चांगली. मऊ भात व मुगाच्या डाळीचें वरण अगर डाळ-तांदुळाची बीनफोडणीची व बीनमसाल्याची खिचडीहि चालेल. पालेभाज्या वर्ज्य. दुध्याभोपळा सर्वांत चांगला. इतर भाज्यांचें नुसतें पाणी द्यावें. ब्रेड भाजून द्यावी. संत्र्या-मुसुंब्याचा व सफरचंदाचा रस काढून द्यावा. डाळिंबाचा रसहि चांगला. चहा, कॉफी, कोकोहि द्यावी. मांसाहाऱ्यांनी मांसाकं अगर कच्चें अंडें घ्यावें.

रोग्याला निजवून ठेवावयास हवें. परंतु शय्याव्रण होऊं नयेत म्हणून त्याला कूस बदलावयास लावावी. मलमूत्रविसर्जन बिछान्यांतच निजून करावें. यांतच रोगजंतू बाहेर पडत असल्यामुळे शुश्रुषा करणारांनी त्याची फार काळजी घेतली पाहिजे. त्यांत फिनेल टाकून वीस मिनिटें ठेवून मगच भांडें साफ करावें. त्यावर माशा बसूं देऊं नयेत व हात स्वच्छ धुवून डेटॉलच्या पाण्यांत बुडवावेत. रोग्याचें अंग दररोज पुसून पाठीला दिवसांतून दोनदा स्पिरिट व पावडर लावावी. या रोगांत पथ्य व शुश्रुषा यांना फार महत्व असतें. म्हणून अशा रोग्यांना रुग्णालयांत हलविणें रोग्याच्या व इतरांच्या दृष्टीनेहि अतिशय इष्ट असतें.

हल्ली निघालेल्या नव्या-नव्या औषधांमुळे टायफॉईडची पूर्वीं इतकी भीति राहिली नाही. क्लोरोमायसेटिन या औषधाने टायफॉईडचे जंतू मरतात. त्यामुळे तें घेतल्याने रोगांची मुदत कमी होते व इतर उपाधी कमी होतात.

परंतु त्यामुळेच गाफिल राहण्याकडे प्रवृत्ति होऊन रोग उलटतो व त्याचा दोष क्लोरोमायसेटिनच्या माथीं मारला जातो. तेव्हा डॉक्टरी सल्ल्यानुसार व्यवस्थित औषध घ्यावें म्हणजेच त्याचा पुरेपूर फायदा मिळेल.


* * *


स्मर्यताम् राष्ट्रदेवो भव त्वर्यताम्
राष्ट्ररक्षणार्थम् .......... बलसंवर्धनम
बलसंवर्धनार्थम्.......मिष्टान्नसेवनम्
सर्वोत्कृष्टमिष्टान्नार्थं सत्वरं द्रष्टव्याः
दूरवाणी] शर्मा स्वीट मार्ट [ ७२३२
दत्तमन्दिरसमीपे पुणें२.

आराम प्रवासासाठी आपली सेवा करण्याची
आम्हास संधि द्या. प्रवासी-साहित्य
विकत घेण्यापूर्वी आमच्या दुकानास
एकवेळ भेट द्या.
दिनशा आणि कंपनी
केंद्र ☆ लक्ष्मी रोड, कुंटे चौक, पुणें २
शाखा ☆ पॅरमाउंट टॉकीजजवळ पुणें २
दूरध्वनि ] [ ७५८६

# एका गांवची स्वातंत्र्य कालांतील वाटचाल ....

श्री. ग. माजगांवकर एम्. ए.



फैजपूर कॉंग्रेस
१९३६
टिळकनगराचें
प्रवेशद्वार

"हीं ध्येयें आमच्यासमोर असलीं तरी डोळ्यांसमोर दिसणारी परिस्थिति आणि हरघडी आमच्यापुढे येणाऱ्या अडचणी ह्यांना डावलून चालावयाचें नाही. लक्षावधि लोकांची उपासमार आणि बेकारी असें या परिस्थितीचें वर्णन करतां येईल. तिच्या तावडींत मध्यमवर्गसुद्धा सापडलेला आहे. ही भीषण परिस्थिति वणव्यासारखी फैलावत चाललेली दिसते. अनेक दुःखदायक विरोधांनी हें जग भरलेलें आहे. पण हिंदुस्थानांत आश्चर्यमूढ करून सोडणारे जे विरोध आढळतात तसे इतरत्र सापडणार नाहीत. साम्राज्यशाही सत्तेच्या व्यक्त चिन्हांप्रमाणे हीन प्रवृत्तीच्या द्योतक अशा कलेने नटलेली नवी दिल्ली पहा ! तिच्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च झाला आहे. पण तेथून चार-दोन मैलांच्या आंत हिन्दुस्थानांतील उपाशी शेतकऱ्यांच्या चंद्रमोळी झोपडया उभ्या असलेल्या दिसतील. त्यांच्याच चार-सहा आण्यांच्या मिळकतींतून हे महाल उभारले जातात आणि गलेलठ्ठ पगार दिले जातात......"

पंडितजी, १९३६ सालीं फैजपुरला कॉंग्रेस-अधिवेशन भरलें असतां आपण अध्यक्षपदाच्या आपल्या भाषणांतून वरील विचार व्यक्त केलेले आहेत.

त्या अधिवेशनाला आज ठीक पंचवीस वर्षें लोटलीं. त्यांतील चौदा वर्षें आपण नवभारताचे भाग्यविधाते पंतप्रधान आहांत.

त्या फैजपूर गांवांतच या प्रदीर्घ कालावधींत आपल्याला प्रिय असणारीं ध्येयें किती प्रमाणांत साध्य झालीं हें पाहण्यासाठी ही नम्र वाटचाल अंगीकारली आहे.

आपला ध्येयवाद यशस्वी होण्यासाठी आम्हीं काय करणें अवश्य आहे त्याचा शोध घेणें हाच या वाटचालीमागील हेतु आहे.

भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन आज तेरा वर्षांचा कालावधि लोटला. मिळालेलें स्वातंत्र्य बळकट करण्यासाठी; जनतेचें दारिद्र्य व अज्ञान नष्ट करण्यासाठी; आपल्या औद्योगिक व सामाजिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी या तेरा वर्षांच्या काळा-वधींत दोन पंचवार्षिक योजना पूर्ण करण्यांत आल्या आणि तिसरी अकरा हजार कोटींची महत्त्वाकांक्षी योजना अंमलबजावणीसाठी जवळजवळ सिद्ध झालेली आहे, परंतु ज्या जनतेसाठी या योजना मुळांत अस्तित्वांत आल्या ती जनताच या योजनांच्या कार्य-वाहीशी अपेक्षित प्रमाणांत सहकार्य देत नाही असा आजवरचा अनुभव आहे. अनेक सरकारी व निमसरकारी तज्ञ समित्यांनी केलेल्या पाहणींतून ही गोष्ट निदर्शनास येऊन चुकलेली आहे कीं, योज-नांना जनतेचें सहकार्य न मिळाल्यानें त्यांच्या यशस्वितेतहि मोठ्या उणीवा राहून गेल्या आहेत. या उणीवांकडे आपण दुर्लक्ष केलें आणि जनतेचें औदासीन्य गृहीतच धरण्याची वृत्ति धारण केली, तर आपलें स्वातंत्र्य बळकट करण्याचा आपला मूळचा संकल्प सिद्धीस जाणार कसा !

लोकांच्या या औदासीन्याचा सर्वांनीच सहानुभूतीने शोध घेतला पाहिजे. कारण हें औदासीन्य दूर होऊन बहुसंख्य जनता कार्यप्रवण होणें, उठाउठी व वेगाने तिने आपल्या विकासासाठी निर्माण झालेल्या सर्व योजनांशी सहकार्य करण्यास तयार होणें हीच आमच्या स्वातंत्र्यरक्षणाची व संवर्धनाची एकमेव हमी आहे. असें सहकार्य करण्यास ही आमची जनता आज कां उत्सुक नाही हें जाणून घेण्यासाठीच एका लहानशा गांवाची ही वाटचाल आपण जवळून पाहत आहोंत. येथे जें दिसेल तें स्वीकारण्याची आपली सर्वांचीच तयारी आहे, कारण उणीवा दूर करून पुढे जाण्यासाठी आपण काळाशी बांधलेले आहोंत.

## फैजपूर—आमचें पंढरपूर

या गांवाचें नांव आहे फैजपूर. आपला स्वातंत्र्याचा लढा खेड्यापाड्यापर्यंत पोहोचावा या उद्देशाने येथे आजपासून बरोबर पंचवीस वर्षांपूर्वी कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें होतें. १९३६ साली भरलेल्या कांग्रेस अधिवेशना-मुळे या गांवाचें नांव त्याकाळीं महाराष्ट्रांतच नव्हे तर साऱ्या भारतांतहि सर्वतोमुखी झालें होतें. डिसेंबर १९६० मध्ये आपले महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री नामदार बाळासाहेब देसाई खानदेशांतील या भागांत दौऱ्यावर आले असतां फैजपूर चा उल्लेख ‘ आमचें पंढरपूर ’ या शब्दांत त्यांनी केला होता. यावरून अद्यापहि ऐतिहासिकदृष्ट्या या गांवाचें महात्म्य किती आहे याची सहज कल्पना येते. या पंढरपुरांतच स्वातंत्र्याचा प्रकाश किती दूरवर व खालवर फैलावला आहे, गेल्या तेरा वर्षांतील आमचें विकास-कार्य येथील बहुसंख्य जनतेपर्यंत किती प्रमाणांत पोहोचलें आहे, हें पाहणें सर्वदृष्टीनेच मोठें उद्बोधक ठरेल. कारण विकासकार्याचे प्रत्यक्ष लाभ आमच्या बहुजनसमाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत पोहोचण्यावर जनतेचें सहकार्य व जागृति या गोष्टी अवलंबून आहेत.

## परिस्थितीचे तीन कालखंड

फैजपूरच्या तेरा हजार लोकवस्तींतील जवळ-जवळ दोन-तृतीयांश वस्ती शेतकरी समा-जाची आहे. या शेतकरी समाजांतहि २०।२५ एकर जमीन धारण करणारे मोठे जमीन-मालक शेकडा एक या प्रमाणांतहि नाहीत. जवळजवळ सर्व शेतकरीसमाज २।४ एकर जमिनीचा मालक, कूळ किंवा शेतमजूर या सदरांत मोडेल असा आहे. या सर्वसामान्य शेतकरीवर्गाच्या परिस्थितीचे गेल्या ३०।४० वर्षांत एकूण तीन कालखंड पडतात. पहिला कालखंड १९३६ पूर्वीचा. कांग्रेसअधिवेशना-पूर्वीचा हा काळ. फैजपूर तेव्हा समृद्ध होतें. खानदेशच्या या भागांत कापसाची लागवड भरपूर प्रमाणांत त्यावेळीं होत असे. फैजपूर हें या भागांतील यावल, भुसावळ तालुक्यांतील मध्यवर्ति ठिकाण असल्याने येथे कापसाच्या खरेदी-विक्रीचा व्यापार फार मोठ्या प्रमाणांत त्यावेळीं चालू असे. खुद्द फैजपुरांत त्यावेळीं ७ जिनींग व ४ प्रेसिंग असे एकूण ११ कापूस-कारखाने होते व या कारखान्यांत सुमारे हजार-अकराशे माणूस कामाला राहूं शकत होतें. व्यापार आणि लहान कारखानदारी यामुळे निर्माण झालेल्या सुबत्तेंत शेतकरीवर्गहि आपापल्या कुवतीप्रमाणे सामील झालेला होता. आजच्या परिभाषेत बोलायचें म्हणजे शेत-मालक, शेतमजूर किंवा कूळ या तिघांनाहि ही परिस्थिति आपापल्यापरीने अनुकूल होती. याचें मुख्य कारण म्हणजे या सर्वांना बारा महिने पुरेल असा भरपूर उद्योग या काळांत उपलब्ध होता. फैजपुरांत ज्या कांही सुधारणा आज दिसत आहेत त्या या ३६ पूर्वीच्या कालखंडांतच पार पडलेल्या आहेत. येथे शाळा स्थापन झाली १९१७ मध्ये. गांवचा मुख्य रस्ता तयार झाला पहिल्या महायुद्धाच्या आसपास. त्यावेळीं गांवचें क्षेत्र-होतें सव्वा चौरस मैल. आज तीस चाळीस वर्षांत या क्षेत्रफळांत एका फुटाचीहि वाढ झालेली नाही. गांवांतील सडकांची आजची लांबी सुमारे चार मैल आहे. यांपैकी बहुतेक सर्व रस्ते जुन्या काळीं तयार झालेले आहेत. गांवांतील देवस्थानांच्या संख्येंत वाढ नाही. प्राथमिक शाळेच्या उभारणींत सुधारणा नाहीत. जें स्वरूप त्या सुबत्तेच्या काळांत फैजपुरने एकदा धारण केलं तें आज तीस-चाळीस वर्षांनंतरहि तसेंच कायम आहे.

## केळी-वाहतुकीचा धंदा

योगायोगाने कांग्रेस अधिवेशनाच्या आस-पासच फैजपूर जागतिक शेतीमंदीच्या लाटेंत सापडलें आणि फैजपुरांतील कापूसकारखाने व कापसाच्या बाजारपेठा हळूहळू बंद पडत गेल्या. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला म्हणजे १९३९ च्या सुमारास यांपैकी फैज-पुरांत काहींहि शिल्लक राहिलेलें नव्हतें, परंतु येथील निवडक शेतकरी कापसाकडून केळीच्या उत्पादनाकडे वळले होते. त्यामुळे केळ्यांच्या वाहतुकीचा एक नवाच धंदा येथील लहान शेतकऱ्याला—तो कूळ असो की जमीनमालक असो— या काळांत उपलब्ध झाला होता. दोन-तीन एकरवाला शेतकरीहि आपली स्वतःची बैलजोडी व गाडी राखून होता. अर्थात फैजपुरच्या आसपासच्या यावल, भुसावळ, सावदा, रावेर या भागांत केळ्यांची लागवड जमिनीच्या व हवापाण्याच्या अनुकूलते-मुळें जेवढ्या प्रचंड प्रमाणांत होऊ शकली त्या मानाने फैजपुरांतील लागवड फारच थोडी

होती. त्यामुळे ओघानेच येथील गरीब शेतकऱ्याची प्राप्तीहि मर्यादितच राहिली. बैलगाडीचें वरकड रोख उत्पन्न व सहा–आठ महिने पुरेल एवढें शेतचें धान्य एवढया पुंजीवर येथील बहुसंख्य शेतकरी आपली गुजराण बऱ्यापैकी करूं शकत होता एवढाच या कालावधीचा फैजपूरपुरता तरी अर्थ आहे.

### स्वातंत्र्योत्तर काळ

स्वातंत्र्यानंतरच्या काळांत हीहि स्थिति पालटली. या तिसऱ्या कालखंडांत दोन प्रमुख घटनांनी फैजपुरांतील शेतकरीजीवनावर परिणाम घडवले. एक म्हणजे वाहतुकीसाठी ट्रक्स वापरांत येऊं लागल्या. रस्त्यांवरून केळींच्या घडांनी भरलेल्या ट्रक्स धावूं लागल्या तशा बैलगाड्या मागे पडत गेल्या व येथील लहान शेतमालकाला किंवा कुळाला मिळणारें वरकड रोख उत्पन्न बुडालें. या बुडालेल्या वरकड उत्पन्नाची भरपाई नंतर कशानेहि होऊं शकली नाही. हें एक नुकसान आणि यापुढे लहान शेतकऱ्याला बैलजोडी ठेवणें परवडूं शकणार नसल्याने शेतकामाच्या व्यवस्थेंत अडचणी उत्पन्न होणार होत्या हें दुसरें नुकसान. या दोन आघातांमुळे येथील शेतकरीवर्ग बसत चालला असतांनाच स्वातंत्र्यकालांतील कूळकायदा अस्तित्वांत आला आणि त्यामुळे येथील शेतीची पूर्व व्यवस्था आणि पूर्वसंबंध यांत फारच मूलगामी बदल घडून आले.

### कायद्याचें पुरोगामित्व

कायद्याचें मोठेंपण त्यांत कोणतीं सामाजिक न्यायाचीं किंवा तात्त्विक श्रेष्ठतेचीं तत्त्वें ग्रथित झालेलीं आहेत यावरूनच केवळ ठरवावयाचें नसतें. हीं तत्त्वें प्रतिपादन करण्याचें किंवा त्यासाठी प्राणपणाने झगडण्याचें कार्य समाजांतील द्रष्टे पुरुष करीतच असतात. या द्रष्ट्यांचीं स्वप्नें साकार करण्याचें कार्य तेवढें राजसत्ता व तिचें प्रमुख हत्यार जें कायदे त्यांनी साधावयाचें असतें. हें व्यावहारिक यश जर कायदे करून पदरांत पडत नसेल, तर केवळ एखाद्या कायद्यांत उच्च तत्त्वांचा उद्घोष केला आहे एवढ्यावरून तो कायदा समर्थनीय ठरूं शकत नाही. कूळकायद्याला हाच सर्वसाधारण नियम प्रथम लावला पाहिजे. 'कसेल त्याची जमीन' हें तत्त्व उत्तमच. कसणाऱ्याच्या हातांत जमीन देण्यामागील हेतु असा की, समाजांतील उत्पादनसामर्थ्य त्यामुळे प्रचंड प्रमाणांत वाढावें. मेहनत करणाऱ्याच्या हातांत पुरेशी सत्ता व पुरेशीं साधनें मिळालीं तर तो अधिक जोमाने मेहनत करील व त्यामुळे सामाजिक धनांतहि मोठ्या प्रमाणांत वाढ होईल, हें एक साधें गणित आहे. कूळकायद्याने शेतीच्या क्षेत्रांत हें साधलें असेल तर तो समर्थनीयच ठरेल. फैजपुरांतील शेतकरीवर्ग या कायद्यामुळे जोमाने शेतीउद्योगाला लागला असेल, त्याची परिस्थिति कांही अंशानेहि थोडीफार सुधारली असेल, येथील ऐतखाऊ वर्गाची समाजजीवनावरील पकड कांही प्रमाणांत तरी ढिली झाली असेल तर हा कायदा पुरोगामी व सामाजिक सुधारणेचें पाऊल पुढे टाकणारा जरूर ठरावा, परंतु असें कांही फैजपुरांत घडलें का !


## पांढरे डाग

अनुभवप्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसें व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रु. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

**वैद्य बी. आर. बोरकर**
आयुर्वेद भवन ( कि. )
मु. पो. मंगळूरपीर जि. अकोला,
( महाराष्ट्र )


### कूळकायदा येण्यापूर्वी

कूळकायद्यापूर्वी परिस्थिति अशी होती– बहुतेक शेतकरी स्वतःच्या मालकीची १।२ एकर व सहज बोलतां बोलतां परस्परांच्या विश्वासावर खंडाने मिळणारी २।४ एकर जमीन घेऊन आपली गुजराण चालवीत होता. या ५।६ एकर जमिनीच्या मशागतीसाठी त्याला बैलजोडी परवडूं शकत होती. गडीमाणसांना तो थोडेंफार काम पुरवूं शकत होता; एखादें दुभतेंहि एवढया पसाऱ्यावर तो सहज गोठ्यांत बांधूं शकत होता. बैलगाड्यांचें वाहतुकीचें रोकड उत्पन्न बुडालें तरी या परिस्थितींत शेतकरी जीवनांतून अगदीच कांही उठला नव्हता. त्याला शेतीचा नित्य व्यवसाय सांभाळतां येत होता व त्याव र त्याची बऱ्यापैकी गुजराणहि चालू होती.

### गरीब अधिक गरीब झाले

कूळकायद्यामुळे घडून आलेल्या बदलांचें थोडक्यांत स्वरूप असें :— ( १ ) कूळकायद्याच्या परिणामांतून मोठा जमिनदारवर्ग मुक्त राहिला. ( अ ) मोठ्या जमिनीच्या मालकांना कायद्याच्या आगमनाची कल्पना अगोदरच आली असल्याने त्यांनी आपल्या जमिनी कायदा अस्तित्वांत येण्यापूर्वीच सोडवून घेतल्या होत्या. ( ब ) मोठ्या जमिनी 'कूळ' या नात्याने कसणाऱ्यांना या कायद्याने चांगलाच आधार दिला. नाममात्र खंडाने या कुळांकडे मोठमोठ्या जमिनी कसणुकीसाठी राहिल्या किंवा जेथे खरेदीचे व्यवहार झाले तेथे ते कुळाच्या अत्यंत फायद्याचेच ठरले. ( २ ) परंतु फैजपूरपुरतें बोलायचें तर अशा मोठ्या जमीनमालक किंवा कुळांचें प्रमाण येथे कमीच. बहुसंख्य शेतकरीवर्ग २।४ एकर जमिनीचा, गरीब मालक किंवा कूळ. या सर्व गरीब शेतकरीवर्गाची अवस्था कूळकायद्यामुळे फारच विपरीत झाली. जमिनीबाबत तंट्यांची संख्या विकोपास गेली व यांतून निष्पन्न होणाऱ्या कोर्टकचेऱ्यांपायी कूळ आणि मालक या उभयतांचाहि पैसा श्रम व वेळ यांची अमाप नासाडी झाली. या गरीब शेतकरीवर्गाने मग तो कूळ असो की मालक असो आपल्या घरांतील गाडगीं-मडकीं मोडून हे तंटे लढविले आणि वकील, सरकारी नोकर इत्यादि मध्यस्थवर्गाचीं घरें आयत्या प्राप्तीने भरण्यास मदत केली. ( ३ ) या गरीब शेतकऱ्याच्या घरांतून लक्ष्मी गेली; पण ती पुन्हा येण्याची कांही वाट होती का ? ( अ ) जमिनी 'तंट्यांत' पडल्यामुळे मालकाला कुळाकडून खंड मिळणें जवळजवळ बंदच पडलें. यामुळे मालक कंगाल झाले. ( ब ) कुळाला वेळप्रसंगी उपयोगी पडणाऱ्या मालकाऐवजी सरकारची मदत मिळेल, तर तीहि नाही. कारण कुळाच्या ताब्यांत जमीन असणार एकूण दोन किंवा तीन एकर. नियमाप्रमाणे या कुळाला क्रेडिट को. ऑ. सोसायटीकडून कर्ज मंजूर होणार एकरी वीस रुपये या प्रमाणांत एकूण साठ रुपये. शेअरखरेदी, किरकोळ चहा-पाणी यांत आर्धाचे दहा रुपये तरी खर्च होतात.

राहिलेल्या पन्नास रुपयांत हें कूळ जमिनीची मशागत ती काय करणार आणि त्यामुळे त्याची उत्पादनशक्ति वाढून राष्ट्रीय उत्पन्नांत भर ती काय पडणार ! फैजपुरांतील क्रेडिट को. ऑ. सोसायटीचा अनुभव तरी असाच आहे की, निम्म्याच्या वर कर्जे घरांतील अडीअडचणी निवरण्यासाठीच शेतकरी खर्च करीत असतात. नव्हे, परिस्थिति तसें करण्यास त्यांना भाग पाडत असते. गरीब कूळ आणि गरीब मालक या दोघांनाहि अधिक गरीब करून सोडणारा हा कूळकायदा कोणत्या अर्थानें पुरोगामी समजायचा याचा निर्णय आता जाणकारांनीच घ्यावा. फैजपूरचें चित्र याबाबत मात्र निराशाजनकच आहे.

* * *

## दुसरा घटक विणकर

बहुसंख्य गरीब शेतकरी वर्गाची स्थिति फैजपुरांत स्वातंत्र्योत्तर काळांत याप्रमाणे खालावलेली आहे. लोकसंख्येंत या शेतकरी-वर्गाच्या खालोखाल विणकर समाजाचें प्रमाण अधिक आहे. या धंद्यावर आज फैजपुरांत सुमारे पांचशे कुटुंबें म्हणजे दोन ते अडीच हजार माणसें जगत आहेत. गांवांत आज सुमारे पांचशे माग आहेत. १९२२ पासून येथे 'फैजपूर विणकर को-ऑपरेटिव्ह सोसायटी' स्थापन झालेली असून त्यामार्फत तीनशे माग सध्या चालू आहेत. स्वातंत्र्योत्तर काळांत सहकारी चळवळीला उठाव आणावा या उद्देशानें गांवांत आणखी दोन सोसायट्या स्थापन करण्यांत आल्या. त्यामध्ये शंभरएक माग नोंदले गेले. उरलेले शंभर पूर्ण खाजगीरीत्याच चालविले जात आहेत, परंतु स्वातंत्र्योत्तर काळांत नोंदलेल्या दोन्ही सोसायट्या आज बंदच पडलेल्या असल्यामुळे त्यांतील सर्व माग आज खाजगी स्वरूपांतच चालविले जात आहेत; म्हणजे जुन्या को—ऑपरेटिव्ह सोसायटींत ३०० व खाजगी २०० अशी फैजपुरांतील मागांची आजची खरी विभागणी आहे.

## मालाला खप नाही

खाजगी माग व सोसायटीचे माग यांची संख्या जवळजवळ सारखीच असल्यानें खाजगी क्षेत्रांतील विणकरांची व्यापाऱ्यांमार्फत चालू असणारी स्पर्धा सोसायटींतील विणकरांना फारच महागांत पडते. व्यापाऱ्याकडून खाजगी विणकराला नेहमीच कमी मजुरी मिळते; तरीहि तो व्यापाऱ्यांचेंच दार गांठतो, कारण अनेक धाग्यांनी तो जुन्या काळापासून व्यापाऱ्यांशी गुंतलेला असतो. अडीअडचणींच्या वेळीं व्यापाऱ्यानें विणकराला शेपन्नास रुपये कर्ज दिलेलें असतें; तें कर्ज फिटण्यापूर्वीच व्यापारी अधूनमधून पैशाची रोख मदत करीतच असतो. याची भरपाई व्यापारी भाव कमी धरून करून घेतो. विणकराला या सवलती को. ऑपरेटिव्ह सोसायटीकडून मिळूं शकत नाहीत. सोसायटींतून एकदा कर्ज उचललें की, तें फिटेपर्यंत नवीन मदत नाही. नियमांचा हा कडकपणा कायद्याच्या दृष्टीनें योग्य असला तरी विणकरांच्या चालू परिस्थितींत त्यांना जाचक वाटणारा व न परवडणारा असल्यानें त्यांचे पाय आपोआप खाजगी व्यापाऱ्याकडे वळतात. खाजगी व्यापाऱ्यांची सर्व खरेदी या मार्गानें चालू असल्यानें सोसायटींतील मागांवर तयार होणाऱ्या मालाला गिऱ्हाईक नाही. माल पडून राहिला की, सोसायटीजवळ खेळतें भांडवल नाही. खेळतें भांडवल नाही म्हणजे कच्चा माल विकत घेतांना अडचणी. या अडचणी सरकार दूर करीत नाही. कारण कायद्याप्रमाणे खेळत्या भांडवलापोटीं कर्ज वगैरे देतां येत नाही. म्हणून मालविक्री करून पैसा उभा करण्यासाठी सोसायटीला झटावें लागतें. आज खुद्द चेअरमन व इतर पदाधिकारी मालविक्रीसाठी गांवोगांव दौरे काढून या अडचणींतून कसाबसा मार्ग काढीत आहेत ! १९२२ पासून स्थापन झालेल्या जुन्या व अनुभवी सोसायटीची ही अवस्था तर स्वातंत्र्योत्तर काळांत नव्यानेच स्थापन झालेल्या दोन सोसायट्या बंदच पडाव्यात यांत नवल काय !

## विकासाला वाव नाही

सरकार रिबेट देतें तें फार अपुरें आहे. माल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याला रिबेट घेऊनहि सोसायटीचा नग खाजगी विणकराच्या नगापेक्षा प्रत्येकी आठ-बारा आण्यांनी महागच पडतो. त्यामुळे जोंपर्यंत खाजगी माग चालू आहेत आणि खाजगी विणकर थोडा कमी भाव घेऊनहि व्यापाऱ्यालाच जोंपर्यंत आपला माल विकीत आहेत तोंपर्यंत रिबेटमुळे सोसायटीची परिस्थिति सुधारण्याची शक्यता फार कमी आहे. फैजपुरांतील मागांवर मुख्यतः खणाळी होतात. एका खणाळ्याची किंमत सरासरीं चौदा रुपये होते. या चौदा रुपयांत सूत व कच्चा माल याचीच किंमत अकरा रुपये जाते.

याचा अर्थ विणकराला होणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठ्यांत कांही मूलभूत सुधारणा करून देणें हाच त्याची परिस्थिति सुधारण्याचा एकमेव मार्ग आहे असा सरळ होतो. आज हा पुरवठा मुंबईतील सूत-गिरण्या, सुताचे व्यापारी व दलाल यांच्या मनमुराद नफेबाजीवर अवलंबून आहे. कच्च्या मालाचा पुरवठा आणि पक्क्या मालाची विक्री या दोन्ही तोंडांकडून सोसायटीची कुचंबणा होत असते. या दोन्ही तोंडांवर नफेबाजीची पकड अगदी घट्ट बसली आहे. असें असतां आपल्या सहकारी क्षेत्रानें स्वतंत्र विकास साधावा, सहकारी अर्थ-व्यवस्था भांडवलशाही व्यवस्थेचा एक पर्याय म्हणून येथे उभी राहावी ही अपेक्षा पूर्ण होणें शक्य तरी आहे काय ? सहकारी सोसायटीचा फैजपूरपुरता प्रभाव वर्णन करायचा म्हणजे एवढेंच म्हणतां येईल की, सोसायटींतील विणकरांवर मजुरी-बाबत अन्याय केला जात नाही. यापेक्षा विणकर-समाजाच्या स्थैर्यावर किंवा विकासावर सोसायटीच्या अस्तित्वाचा प्रभाव जवळजवळ नाही म्हटला तरी चालेल.

## मासिक उत्पन्न चाळीस रु.

पण समजा नगामागे विणकरांना सोसायटींतून मिळणारी तीन रुपये मजुरी मिळाली ! एक खणाळें तयार व्हायला सरासरी दोन दिवस लागतात. विणकराबरोबरच अधूनमधून त्याचीं बायकामुलेंहि या कामांत गुंतलेलीं असतात हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे. या विणकर-कुटुंबाच्या श्रमांतून महिन्याकांठीं जास्तीत जास्त १५ खणाळीं तयार होऊं शकतात. या पंधरा खणाळ्यांची मजुरी झाली रुपये पंचेचाळीस केवळ. हें झालें विणकर—कुटुंबाचें मासिक उत्पन्न. एवढेंहि त्याच्या पदरांत केव्हाच पडत नसतें. कारण खणाळीं मागावरून काढणें, तीं सोसायटींत

# लेवा बांधवांना विनंती

फैजपूर येथें कॉंग्रेसचें अधिवेशन भरविणें हें लेवासमाजाला किती घातुक आहे, हे लेवासमाजांतील प्रत्येक विचारी मनुष्याला माहित आहे. असें समाजविघातक कार्य श्री. धनजी नाना चौधरी व त्यांच्या भोंवतालचें ३।४ तीनचार इसम यांनीं समाजाची मुळींच इच्छा नाहीं तरी जाणून बुजून हट्टानें व बेपरवाईनें करण्याचें ठरविलें आहे. या कार्यांत लेवा समाजाची व इतरांची सहानुभुती मिळविण्याकरितां फैजपूर येथें कॉंग्रेसचे अधिवेशन भरविण्याचें बाबतींत लेवा समाजाची पूर्ण मदत आहे, असें हे लोक बेजबाबदारपणें जिकडे तिकडे खोटेंचे प्रसिद्ध करीत आहेत. या त्यांच्या प्रसिद्धी करण्यामुळें सर्वांचा गैरसमज होण्याचा फार संभव आहे; ह्मणून आम्ही मुद्दाम प्रसिद्ध करित आहोंत कीं, लेवा समाज व विशेषतः लेवा समाजांतील कोणीही सुशिक्षित व समंजस मनुष्य फैजपूर येथें कॉंग्रेस भरवावी या मताचा नाहीं. फैजपूर येथें कॉंग्रेस भरविण्याकरितां कोणी आपल्या जमिनी दिल्या असतील तर त्यांनीं अत्यंत अविचार केला असें ह्मणावें लागेल. तरी त्यांनी व इतरांनीं समाजाच्या हिताच्या दृष्टीनें नीट धोरण ठेवावें, व श्री. धनजी नाना चौधरी यांनीं अंगिकारलेल्या समाजविघातक कार्याला कोणतीही मदत करूं नये; अशी आमची सर्वांना आग्रहाची विनंती आहे. ता. २५-७-१९३६

आपले नम्र.

के. के. पाटील चेअरमन म्यु. जळगांव
एम. पी. चिरमाडे, जळगांव
आर. एल. पाटील म्यु. स्कूल बोर्डाचे चेअरमन. जळगांव
डी. एन. भोळे, म्यु. मेंबर ,,
एन. बी. चौधरी ,,
के. एस. पाटील ,,
जी. जी. पाटील प्रोपायटर खानदेश आयुर्वेदिक फार्मसी जळगांव
तुळशीराम शंकर महाजन ,,
डॉ. आर. बी. पाटील ,,
एस. वी. चौधरी मॅ. सहजानंद प्रेस ,,
व्ही. सी. नेहेते संपादक बातमीदार ,,
डॅा. व्ही. एन. पाटील एम. एल. सी. ,,
एस. के. राणे, बी. ए. एल एल. बी प्रेसिडेंट तो लो. बो. यावल
डि. लो. बो. व स्कू. बो. मेंबर ,,
एल. डी. पाटील बी. ए. एल एल. बी. प्रेसिडेंट तो लो. बो. जळगांव
एच. एस. पाटील बी. ए. एल एल. बी. वकील, जळगांव
वी. डी. इंगळे पेन्शनर सुपरवायझर डि. स्कू. बो. पू. खा.
व्ही. के. भालेराव बी. ए. एल एल. बी. वकील जळगांव
एन. एस. पाटील मॅ. शिवाजी प्रेस ,,
टी. जी. गाजरे प्रो. शिवाजी प्रेस ,,
एम. आर. चौधरी सुपरिंटेंडेंट फ. ह. लेवा बोर्डिंग जळगांव
नामदेव माधव नेमाडे प्रोप्रायटर श्रीकृष्ण प्रेस जळगांव
एन. एस. महाजन मॅ. श्रीकृष्ण ,, ,,
नारायण पांडू पाटील म्यु. मेंबर ,,
जी. डी. खडके, जळगांव

विठू तानाजी चौधरी, नशिराबाद
ह. भ. प. डिगंबर चावदस पाटील चिनावल
इच्छाराम आसाराम पो. पाटील ,,
गणू महादू कोल्हे, जळगांव
डी. एस भिरूड बी. ए. एल एल. बी. वकील जळगांव
के. एन. महाजन म्यु. मेंबर, यावल
एन. ए. चौधरी मुलकी पाटील भालोद
राजाराम श्रावण महाजन, असोदें
तुकाराम चांगो चौधरी
धर्मा यादव अत्तरदे, जळगांव
सोनू उखर्डू काळे ,,
श्रीधर बोंदरू खडके म्यु मेंबर जळगांव
आनंदा फकिरा महाजन विदगांव
एस. भेर्डू अत्तरदे भादली बु.
विठू गणु पाटील कुटुंबनायक पाडळसें
सोनू कानजी महाजन म्यु. मेंबर भुसावल
नामदेव नथू फेगडे बामणोद
संपत ओंकार भंगाळे ,,
हिरामण लखु सराफ वकील यावल
बी. ए. एल्. एल्. बी. फैजपूर.
मल्हारू धोंडू महाजन फैजपूर
तुकाराम धोंडू महाजन डोंगरकठोरें
रावसाहेब बी. डी पाटील प्रे. म्यु. सावदा
रावसाहेब पी. आय्. पाटील प्रे. तो. लो. बो. रावेर
श्रीमंत विष्णू हरी पाटील डि. लो. बो. मेंबर सावदा
भागवत खुशाल पाटील सावदा
डी. व्ही. पाटील सावदा
आर्. व्ही. पाटील सावदा
भागवत नारायण पाटील सावदा
ओंकार परशराम महाजन बिरोदें
देवचंद बुधो चौधरी कठोरें
गणपत दगडू चौधरी व्हा. प्रे. म्यु. फैजपूर

शिवराम डिवू महाजन हिंगोणें
श्रीपत धना चौधरी किनगांव
महादू नंदा चौधरी पाडळसे,
जैराम नारायण पाटील,,
दशरथ रामचंद्र महाजन हिंगोणे
महादू बापू पाटील ,,
पुरुषोत्तम लहानू बढे सावदा
धना तोताराम भंगाळे सावदा
रामकृष्ण दत्तात्रय चौधरी सावदा
मनसाराम नारायण चौधरी फैजपूर
तुकाराम लक्ष्मण चौधरी फैजपूर
गणेश रामजी
एल्. डी. भारंबे फैजपूर
गिरधर नाटू महाजन फैजपूर
तोताराम बाबु महाजन प्रेसिडेंट म्यु. फैजपूर
वामन धोंडू महाजन म्यु. मेंबर फैजपूर
घनःशाम सांडू चौधरी सावदा
मोहन दारकू चौधरी फैजपूर
ओंकार आत्माराम चौधरी फैजपूर
सोनजी बनाशी
जैराम सदु चौधरी फैजपूर
यादव मिठाराम चौधरी फैजपूर
पी. एस्. पाटील वकील भुसावळ
व्ही. ई. सरोदे वकील भुसावळ
आर. एस पाटील वकील,,
हरी सुपडू चौधरी न्हावीकर
निंबा टाकू महाजन,,
वळीराम बापू वाघुळदे फैजपूर
मल्हारू एको सरोदे ,,
गोविंदा लहानू चौधरी खिरोदे
सोनु तुकाराम पाटील कुटुंबनायक पाडळसे
डी. एम. राणे वकील यावल
डी. टी. चौधरी ,, भुसावल
बी. डी. राणे व्हा. प्रे. भुसावल म्यु. बरो

लेवा प्रि. प्रेस जळगांव

नेऊन देणें, पुन्हा माग चालू करणें यांत वेळ जातो. शिवाय लग्नसराई, आजारपण यांतहि दिवस मोडतात. त्यामुळे महिन्याकांठी १५ खणाळीं हें प्रमाण फक्त कागदावरच राहतें, प्रत्यक्षांत सरासरी तेरा खणाळींच तयार होतात. म्हणजे मासिक उत्पन्न रुपये चाळीसच्या आंतच पडतें. व्यापाऱ्यांना माल विकणाऱ्या किंवा व्यापाऱ्यांच्या मागावर काम करणाऱ्या विणकरांचें उत्पन्न एवढेंहि असत नाही.

या पस्तीस-चाळीस रुपयांत विणकर आपला संसार आजच्या महागाईच्या काळांत कसा चालवीत असेल याची कल्पना कोणासहि सहज येऊं शकेल.

❈ ❈ ❈

## ' बहुजन-समाज ' कोण ?

फैजपूरच्या खऱ्या बहुजनसमाजाचें जीवन-दर्शन हें असें आहे. तेरा हजार लोकसंख्ये-पैकी जवळजवळ आठ-नऊ हजार लोक या अवस्थेंत जीवन कंठीत आहेत. गरीब शेत-कऱ्याचें उत्पन्न वर्षाला दोन-तीनशे रुपयांपेक्षा जास्त नाही आणि विणकराच्या पदरांत तीस-चाळीस रुपयांपेक्षा महिन्याकांठी अधिक मजुरी नाही. गेल्या तेरा वर्षांत दोन पंच-वार्षिक योजना पार पडल्या, परंतु फैजपुरां-तील या बहुसंख्य जनतेपर्यंत या योजनांचा एकहि पाट वाहत आला नाही. जनतेच्या विकासाशाठी सुरू करण्यांत आलेल्या योजनां-पासून जनता मात्र दूरच राहिली. वास्तविक याच गोरगरीब जनतेच्या पाठिंब्यावर १९३६ साली काँग्रेसचें अधिवेशन यशस्वी होऊं शकलें होतें. परकीय ब्रिटिश सरकारचा रोष व छळ असूनहि आपल्या दोन दोन, चार-चार एकर जमिनींचे तुकडे अधिवेशनाच्या मंडपा साठी देण्यास हींच गोरगरीब माणसें त्यावेळीं पुढे सरसावलीं होतीं. त्यांच्या त्यागांतून आणि देशभक्तींतून फळास आलेल्या स्वातंत्र्याचीं फळें यांच्याच पदरांत पडूं नयेत हा केवढा विस्मयजनक प्रकार आहे !

याहीपेक्षा विपरीत प्रकार असा की, १९३६ सालीं जी अल्पसंख्य व प्रतिगामी मंडळी केवळ आपल्या संकुचित स्वार्थापोटीं काँग्रेसच्या त्या वेळच्या ऐतिहासिक अधि-वेशनास विरोध करण्यास धजावली होती तीच मंडळी स्वातंत्र्योत्तर काळांत येथे प्रबल सत्ताधारी बनून सामाजिक व आर्थिक विका-साला अडथळा उत्पन्न करीत आहेत. फैजपूर नगरपालिका त्या काळीं या प्रतिगामी वर्गा-च्याच ताब्यांत होती. शेजारील सावदा गांवांत याच वर्गाचें प्राबल्य होतें. काँग्रेस अधि-वेशनाला व बहुजनसमाजापर्यंत पोहोचणाऱ्या स्वातंत्र्यलढ्याला या प्रतिगाम्यांचा एवढा विरोध की, खुद्द पंडित नेहरूंची अध्यक्षीय मिरवणूक त्यावेळीं सावदा गांवांतून येऊं शकली नव्हती; सावदा गांवाच्या बाहेरून निराळा नवीन मार्ग तयार करून मिरवणूक अधिवेशनाच्या जागेपर्यंत आणावी लागली होती. शेवटीं शेवटी तर शुद्ध जातीय भाव-नांना चेतवून या प्रतिगामी वर्गाने काँग्रेस-विरुद्ध लोकमत कलुषित करण्याचा प्रयत्न केला होता. केवढीं मातबर माणसें या विरोधी वर्गांत सामील होतीं याची कल्पना त्यावेळीं प्रसिद्ध झालेल्या पत्रकांवरून सहज येईल. नमुन्यादाखल एका पत्रकाचा शेजारच्या पानावरील ठसाच ( Block ) पहा.

दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर काळांत हाच सर्व वर्ग काँग्रेसमध्ये सत्ताधारी झाला आणि जनते-पर्यंत आवाज उठविण्याची काँग्रेसची पूर्वीची शक्ति क्षीण झाली. १९३६ सालीं आर्थिक व जातीय सत्ता ज्यांच्या हातांत पूर्ण केंद्रित झाली होती तो हा प्रतिगामी गट व परकीय ब्रिटिश सत्ता या उभयतांच्या संघटित विरोधावर मात करून काँग्रेस अधिवेशन यशस्वी झालें तें काँग्रेसच्या त्यावेळच्या पुरो-गामी व क्रांतिकारक स्वरूपामुळेच; विरोध-कांनी फैजपूरचें ' फजितपूर ' करण्याचा डाव मांडला होता, परंतु फैजपूरमधील हीच गोर-गरीब जनता काँग्रेसमागे निश्चयाने उभी राहिली म्हणून फैजपूरचें ' फजितपूर ' होण्याऐवजी ' फत्तेपूर ' झालें. स्वातंत्र्योत्तर काळांत वास्तविक हीच जनता काँग्रेसच्या सेनेंत दिसावयास हवी होती होती, परंतु प्रकार उलटाच झाला. त्यावेळचे कट्टर प्रतिगामी विरोधक आज ' बहुजनसमाज ' या नांवाने, जातीय भावनांचा आधार घेऊन आर्थिक व राजकीय सत्तेचीं सर्व सुखें मन-मुराद उपभोगीत आहेत आणि स्वातंत्र्या-साठी कष्टलेली गोरगरीब बहुसंख्य जनता मात्र स्वातंत्र्याच्या फलितांपासून, गेल्या तेरा वर्षांतील विकासकार्याच्या लाभांपासून वंचित राहिलेली आहे.

## सहकारी संस्थांचा अनुभव

ग्रामीण क्षेत्रासाठी आपण गेल्या तेरा वर्षांत केलेल्या सर्व पुरोगामी कायद्यांचा व सुधारणांचा लाभ या संकुचित वृत्तीच्या अल्पसंख्य गटालाच प्राधान्याने होत गेला आहे. त्यामुळे बहुसंख्य जनता आपल्या आवाहनांपासून दूर राहावी, तिने आपल्या कार्यक्रमांना सहकार्य देऊं नये हें स्वाभाविकच आहे. श्रम जनतेचे आणि फळ निवडक ऐतखाऊ गटाचें हें व्यस्त प्रमाण सत्ता-धाऱ्यांच्या ध्यानांत आलें नाही तरी तें जनतेला मनोमन जाणवल्याशिवाय कसें राहील ! कूळकायदा आला तरी हा गट त्यांतून कसा सफाईने निसटला हें मागे सांगित-लेंच आहे. निसटला इतकेंच नव्हे, तर ' कूळ ' या नात्याने अनेक जमिनी कायदेशीररीत्या गिळंकृत करून या वर्गाने खेड्यापाड्यांत आपलें आसन पूर्ण बळकट करून ठेवलें. ज्या गोरगरीब शेतकऱ्यांसाठी हा कायदा अस्ति-त्वांत आला तो मात्र अधिकच कंगाल बनून उघड्यावर पडला. स्वातंत्र्योत्तर काळांत आपण सहकारी सोसायट्यांचा विस्तार केला; परंतु या विस्ताराचा लाभ तरी कोण घेऊं शकत आहे ? जेवढी ज़मीन जास्त तेवढें सोसायटीकडून कर्ज जास्त; जिरायतदारा-पेक्षा बागायतदाराला कर्ज अधिक. आता जास्त जमीन धारण करणारा बागायतदार शेतकरी आपल्याकडे कोण व त्याचें समाजांतील एकूण प्रमाण किती ? फैजपुरांत जमिनीच्या खातेदारांची एकूण संख्या सुमारे सहाशेच्या घरांत आहे. को-ऑपरेटिव्ह सोसायटीची सभासदसंख्या मात्र फक्त १४३ आहे. केवळ एकचतुर्थांश शेत-कऱ्यांनाच सहकारी सोसायटीच्या सेवाकर्माचा लाभ घेतां येण्याजोगी परिस्थिति आहे. या १४३ शेतकऱ्यांपैकीहि आज प्रत्यक्ष कर्जदार शेतकऱ्यांची संख्या केवळ ७४ एवढीच आहे ! यावर्षी वांटलेलें एकूण चाळीस हजार रुपयांचें कर्ज व कर्जदार शेतकऱ्यांची ७४ ही संख्या यांचें अधिक विश्लेषण केलें तर केवळ धनिक शेतकरीच या सोसायटीचा फायदा कसा घेऊं शकतो हें सहज सिद्ध होईल. उत्तर प्रदेशांतील कांही खेड्यांच्या समाजशास्त्रीय पाहणीचा एक अहवाल सागर विद्यापीठाचे प्राध्यापक एस. सी. दुबे यांनी " India's changing villages " या नांवाने १९५८

सालांत प्रसिद्ध केलेला आहे. त्यांतील सहकारी सोसायट्यांबद्दलचा पुढचा निष्कर्ष पाहण्याजोगा आहे. प्रा. दुबे लिहितात —

"Notwithstanding the increase in the number of members and share capital, the co-operatives are still far from becoming a regular and vital part of the village people's life. A considerable section of the agriculturists views them as an official outside organization, as something alien to the village and not quite dependable. Their membership is confined largely to persons of higher status and upper income groups, and positions of responsibility in them are occupied mostly by village politicians. (P. 66)

" सहकारी संस्थांच्या शेअर भांडवलांत व सभासदसंख्येत वाढ झाली असली तरी या संस्था आपल्या जीवनाचा एक अत्यावश्यक भाग आहेत या दृष्टीने ग्रामीण जनता त्यांचेकडे पाहत नाही. ही एक बाहेरची सरकारी यंत्रणा खेड्यांत आली आहे अशा परक्या दृष्टीने बराच मोठा शेतकरीवर्ग या संस्थांकडे पाहत असतो व त्यामुळे या संस्थांवर फारसें विसंबून राहण्याकडे त्याची प्रवृत्ति नसते. या संस्थांच्या सभासदांत गांवांतील वरिष्ठ व श्रीमंत शेतकरीवर्गीतील लोकांचाच भरणा विशेष असतो व अधिकाराच्या जागा बहुधा गांवांतील राजकारणी पुढाऱ्यांकडेच गेलेल्या असतात. " (पृ. ६६) उत्तर प्रदेशांतील खेड्यांच्या पाहणीचे हे निष्कर्ष आपल्याकडील परिस्थितीलाहि तंतोतंत लागू पडतात हें येथवरच्या विवेचनावरून कोणाच्याहि ध्यानांत येईल.

## विकास-योजनेचा अनुभव

फैजपुरला विकासयोजना लागू नाही. परंतु विकासयोजनांचा अनुभवहि सहकारी संस्थांपेक्षा फारसा वेगळा नाही. प्रा. दुबे यांचा यासंबंधीचा अभिप्रायहि पाहण्यासारखा आहे. वरील पुस्तकांतच एके ठिकाणीं ते लिहितात-

"Although the ideal of the Community Development Project was to work for the many-sided development of the entire community. From the foregoing account of its work in two villages it is clear that its significant and best organized activities were confined to the field of agricultural extension and consiquently the group of agriculturists benefited the most from them. A closer analysis of the agricultural extension work itself reveals that nearly 70- percent of its benefits went to the elite group and to the more affluent and influential agriculturists. The gains to pocrer agriculturists were considerably smaller. Being suspicious of government officials they did not seek help from the project as often. As this group had little influence in the village and outside, and was in no position to offer any material help in the furtherance of project objectives, the officials largely ignored it. For the economical development of this group, as well as for that of artisans and agricultural labourers, no programmes were initiated by the project." (P. 83)

" ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास साधावा या उद्देशाने विकासयोजना अस्तित्वांत आल्या. परंतु दोन खेड्यांतील या योजनेच्या पाहणीवरून असें दिसून आलें की, योजनेपैकी फक्त शेतीविकासाचा कार्यक्रमच बऱ्याच अंशीं सफल झाला होता. परंतु शेती-विकास-योजनांचा फायदा घेणाऱ्या शेतकरी समाजाचें अधिक निरीक्षण केल्यावर ही गोष्ट ध्यानांत आली की, योजनेच्या फायद्यांपैकी जवळजवळ सत्तर टक्के फायदे खेड्यांतील वरिष्ठ व श्रीमंत शेतकरी वर्गाच्याच वांट्यास आलेले होते. गरीब शेतकऱ्याला या योजनांपासून म्हणावा असा लाभ मुळीच झालेला नव्हता. सरकारी अधिकाऱ्यांविषयी गरीब शेतकरीवर्गाच्या मनांत संशयाची भावना असल्याने विकास योजनाधिकाऱ्यांकडे मदत मागण्यासाठी या वर्गातील माणसें सहसा जात नसत आणि या माणसांचें सामाजिक स्थान फारच खालचें असल्याने व त्यांचेकडून योजनेच्या परिपूर्तीसाठी कोणतेंच द्रव्य-साहाय्य मिळण्याजोगें नसल्याने विकास-योजनाधिकारीहि या वर्गाकडे दुर्लक्ष करीत असत. लहान शेतकरी, कारागिरवर्ग, शेतमजूर या समाजाच्या आर्थिक विकासासाठी विकासयोजनेतर्फे कसलीहि सोय करण्यांत आलेली नव्हती. " (पृष्ठ ८३.)

## प्रवृत्तिधर्माचे मार्ग

हा तपशील अद्यापहि बराच वाढवितां येईल. अनेक सरकारी अहवाल, एस्टिमेटस् कमिट्यांचे रिपोर्टस्, तज्ज्ञांचे अभिप्राय यांतून ही गोष्ट आता सर्वांच्यापुढे येऊन चुकलेली आहे, परंतु जनतेचें सहकार्य न मिळण्याचें हेंच प्रमुख कारण आहे ही गोष्ट मात्र व्हावी तेवढी स्पष्ट झालेली नाही. आपल्या योजनांची आखणी समाजवादी धर्तीची असेलहि, पण प्रत्यक्ष फायदे जर अल्पसंख्य गटालाच मिळतात असा अनुभव असेल तर बहुसंख्य जनता योजनेच्या यशासाठी झटून सहकार्य करील ही अपेक्षा बाळगणेंच चुकीचें आहे. जनतेची ही निवृत्ति अगदी स्वाभाविक आहे आणि तिला प्रवृत्तिपर वळण कसें द्यावें हाच एकमेव विचार यापुढे आपण सर्वांनी केला पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळांत प्रतिगामी व अल्पसंख्य गटाच्या हातांत राजकीय व आर्थिक सत्तेचें केन्द्रीकरण कसें होत गेलें याची 'रडकथा' म्हणूनच यापुढें न वाढवितां आपल्याला जनतेच्या प्रवृत्तिधर्माचे कांही मार्गहि येथे शोधले पाहिजेत. विश्लेषण अखेरीस कृतीसाठीच करावयाचें असतें. कृतीसंबंधाने कांहीच बोध होत नसेल, तर विश्लेषणाचे श्रम करून तरी काय उपयोग !

## विरोधी पक्षांची जबाबदारी

जनतेला जाग आणण्याची खरी गुरुकिल्ली आज विरोधी राजकीय पक्षांच्या हातांत आहे, परंतु आपल्याकडील राजकीय पक्षांना याची असावी तशी जाणीव नाही. सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाभोवती प्रतिगामी धनिकांचें कडें आवळलें गेल्यामुळे त्यांचा आवाज दीनदुःखितांच्या खालच्या थरापर्यंत पोहोचण्याची शक्यता कमीच, परंतु विरोधी पक्षांनी या उपेक्षितांच्या व पददलितांच्या संघटना उभ्या केल्या नाहीत तर या पक्षांचें समाजजीवनांत प्रयोजनच काय असा प्रश्न उद्भवतो. वेगळा झेंडा उभा केला की, विरोधी पक्ष तयार होतो ही कल्पना बालिश आहे; तसेंच प्रचलित सरकारच्या

टेलिग्रॅम : सेंकोबॅंक

टेलिफोन : २४८३

दौलत संपन्न आणि यशवन्त महाराष्ट्राच्या
निर्मितीसाठी गेलीं त्रेचाळीस वर्षे आपल्या
कार्यक्षेत्रांत निष्ठेने सेवासहकार्य करीत
असलेली सुवर्ण–महोत्सवाच्या मार्गावरील
आघाडीची सहकारी बॅंक—

★

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅंक लि.

लक्ष्मी रस्ता पुणें २.

★ ★ ★

★ भाग भांडवल ४५ लाखांचे वर

★ खेळतें भांडवल ६। कोटींचे वर

★ ठेवी ३। कोटींचे वर

बॅंकेच्या १९ शाखा, ७ उपशाखा व ३ पे ऑफीसेस् आहेत.

कार्यकारी संचालक
वा. ग. आळतेकर,
बी. कॉम.

अध्यक्ष
शिवाजीराव काळे,
एम. एल्., ए.

पान ३२ वरून

ध्येयधोरणांवर सतत टीकास्त्र सोडण्यामुळे विरोधी पक्ष बलवान होतो ही समजूतहि भ्रामक आहे. प्रचलित समाजव्यवस्थेतील अन्याय कोणते हें ओळखून, ज्यांना न्याय मिळत नाही अशा दलित समाजाच्या संघटना उभ्या करून कधीं संघर्षाने तर कधी सहकार्यानें न्यायासाठीं सतत झगडत राहणें हें विरोधी पक्षाचें खरें ब्रीद आहे. आपल्याकडे हें ब्रीद जागविण्यासाठीं एवढा प्रचंड वाव असतांना आपले विरोधी पक्ष दिवसेंदिवस अधिकच दुबळे होत चालले आहेत याचेंहि कारण हेंच की, विरोधाचा पाया त्यांनी शास्त्रशुद्धरीत्या जनमानसांत खोलवर घातलेला नाही. कांही तत्त्वज्ञानाच्या पुस्तकी पातळीवरून विरोध करीत असतात तर कांही सत्ताधाऱ्यांच्या आसनाभोवती घुटमळत राहून विरोधाचें तुणतुणें वाजत ठेवण्यांत गर्क असतात. जनतेच्या चालू परिस्थितीशी संपर्क असा कोणाचाच नसतो. लोकजीवनाशी व ठिकठिकाणच्या भौगोलिक–आर्थिक परिस्थितीशी अधिक समरस होऊन विरोधी पक्षांनी ठायीठायी आपल्या लोकसंघटना उभ्या केल्या आणि सशर्त सहकार्याच्या किंवा प्रतिसहकारितेच्या तत्त्वानुरूप सत्ताधारी पक्षाशी संबंध ठेवले तर आजचें औदासीन्याचे ढग दूर होण्यास फारसा अवधि लागणार नाही.

## डोळस सहकार अवश्य

फैजपुरांतच या दृष्टीने काम करण्यास आज भरपूर वाव आहे. येथील विणकर समाज, शेतमजूर, गरीब जमीनमालक किंवा कुळें यांच्या संघटना तयार करून त्यामार्फत या समाजघटकांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न होणें जरूर आहे. पंचवार्षिक योजना किंवा इतर कायदेकानु यामुळे प्राप्त होणाऱ्या हक्कांची या समाजाला जाणीव देणे, जे जे लाभ घेतां येतील ते ते घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणें हें काम जबाबदार विरोधी राजकीय पक्षाने करावयास हवें. या सहकार्यामुळे जनता सरकारी पक्षाच्या आहारी जाईल ही भीति व्यर्थ आहे. प्रत्यक्ष काम करीत असलेला पक्ष टाकून पैशाचें वांटप करणाऱ्या पक्षाला मतें देण्याइतकी जनता केव्हाहि खुळी नसते. आज तसा पक्षच डोळ्यासमोर नसल्यानें जनता हवालदील होऊन कोणाच्याहि पेटींत मतें टाकीत असते. त्यांत जनतेचा दोष नसून राजकीय क्षेत्रांत निर्माण झालेली आजची पोकळीच याला जबाबदार आहे. योजनेच्या व कायदेकानूंच्या कार्यवाहीशी अशा पद्धतीने डोळस सहकार्य केल्याशिवाय त्यांच्यांतील नेमक्या उणीवाहि ध्यानांत येणें कठिण आहे. सहकार्य करीत असतांना कायदेशीर तरतुदी जेथे अपूर्ण वाटतील तेथे कायद्यांत सुधारणा घडवून आणण्याचे बाहेरचे लोकशाहीप्रणीत मार्ग खुले आहेतच. अशा परिस्थितींत संघर्षाचा किंवा झगडण्याचा प्रसंग जरी उद्‌भवला तरी त्यामुळे विरोधी पक्षाचें सामर्थ्य कमी होण्याऐवजी उलट वाढीस लागलेलेंच आपणास दिसून येईल. लोकजागृतीतहि अशा संघर्षांमुळे निश्चित भरच पडेल आज विरोधी पक्षांतर्फे लोकमत जिंकण्यासाठी होणारे झगडे हे अनेकदा शुद्ध राजकीय 'स्टंट' स असतात. वास्तवाशी संबंध सुटला की, 'स्टंट्स' सुचूं लागतात व त्याने ना पक्षाचें बळ वाढत ना लोकांचें औदासीन्य दूर होते. परिस्थितीच्या अपरिहार्यतेतून निष्पन्न होणारा झगडाच समाजाचें पाऊल पुढे नेणारा ठरतो. त्यासाठीं परिस्थितीचें योग्य आकलन असणें जरूर आहे. या सम्यक् आकलनासाठीच योग्य त्या प्रमाणांत चालू सरकार, सरकारतर्फे सुरु असणाऱ्या भिन्नभिन्न योजना यांच्याशी डोळस सहकारीसंबंध असणें अगत्याचें आहे.

## नित्यकार्याचा अभाव

फैजपुरांत हें कार्य आज कोणताहि पक्ष पद्धतशीरपणें करीत नाही. समाजवादी पक्षातर्फे गेल्या वर्षांत चालू परिस्थितीच्या विवरणासाठी दोन जाहीरसभा आयोजित करण्यांत आल्या. एक बांबु कामगार सोसायटी या पक्षातर्फे स्थापन झालेली आहे. एक दवाखानाहि या पक्षाची मंडळी चालवीत असतात, परंतु नित्य राजकीय कार्याचें भांडवल पक्षाजवळ नाहीं. जनसंघाची चौकशी करतां असें समजलें की, रा. स्व. संघाची शाखा येथे चालू नसल्याने जनसंघाचें कार्य सुरू करण्यास वरिष्ठांची अनुमतीच मिळाली नाही. कम्युनिस्ट पक्षासंबंधीहि कांही वार्ता समजली नाही. केन्द्रीय आदेशांची वाट पाहण्याची वृत्ति ठेवली तर फैजपुरांतच काय, कोठेहि राजकीय पक्षांची वाढच होणार नाही. स्थानिक पातळीवर स्थानिक प्रश्न हातीं घेऊन कार्यकर्त्यांने पक्षाच्या व्यापक तात्त्विक बैठकीच्या भूमिकेवरून त्यांची सोडवणूक करण्यासाठी नित्य झटलें पाहिजे. गेल्या कांही महिन्यांतच फैजपुरच्या पंचक्रोशींत निर्माण झालेले हें दोन-तीन प्रश्न पाहा; पक्षकार्याला येथे किती वाव आहे याची यावरूनच सहज कल्पना येऊं शकेल.

## पंचक्रोशींतील तीन प्रश्न

(१) फैजपुरांत आजपर्यंत स्वतंत्र ऊर्दू हायस्कूल नव्हतें. येथल्या माध्यामिक शाळेंतच ऊर्दू शिक्षक नेमून ऊर्दू भाषिक मुसलमानांची सोय केली जात होती. नुकतेंच येथे स्वतंत्र ऊर्दू हायस्कूल निघालें व सर्व मुसलमान मुलें या हायस्कुलांत दाखल झाली. या घटनेची योग्य ती दखल कोणींहि घेतली नाही. 'इतकीं वर्षे स्वतंत्र हायस्कुलची गरज भासली नाही, मग आताच ती कां निर्माण व्हावी? हायस्कुलसाठी लागणारा पैसा कोठून येतो? उद्या म्युनिसिपालिटीकडेच मदत मागितली जाणार नाही कशावरून? ती स्वतंत्र हायस्कूल्स काढण्याची प्रवृत्ति सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेस हानिकारक नाही का?' इत्यादि अनेकविध प्रश्न या एका घटनेंतून निर्माण होतात आणि राजकीय प्रश्नांनी याविषयी निश्चित भूमिका घेऊन वेळींच योग्य ती कृतीहि करणें अवश्य असतें. परंतु या प्रश्नांकडे कोणाचें लक्षहि गेल्यासारखें दिसलें नाही.

(२) नुकतीच खानदेशांत केळीच्या पावडरीचा कारखाना निघण्याची शक्यता निर्माण झाली. फैजपूरची पूर्वपरंपरा ध्यानांत घेतां कोणत्यातरी स्वरूपांत येथे पुन्हा छोटी कारखानदारी सुरू झाल्याशिवाय येथील जनतेची भरभराट होणार नाही हें उघड आहे. केळीच्या पावडरीच्या कारखान्याला सरकारच उत्तेजन देत आहे ही वार्ता कानीं येतांच तो फैजपूरलाच निघावा असे प्रयत्न कां होऊं नयेत? आज तो जळगांवला निघणार आहे. वास्तविक भौगोलिक व आर्थिकदृष्ट्या तो फैजपूरलाच प्रथम निघणें जनतेच्या दृष्टीने फायदेशीर आहे. यासाठी अवश्य ती आकडेवार माहिती पक्षाच्या कचेरींत हजर असावयास हवी. शिष्टमंडळें, निवेदनें या मार्गांचा अवलंब व्हावयास हवा होता, परंतु फैजपुरांतून

# भारत आणि पाकिस्तान

भारतीय स्वातंत्र्याबरोबरच दि. १४ ऑगस्ट १९४७ या दिवशीं पाकिस्तानची निर्मिति झाली. गेल्या तेरा वर्षात भारत–पाकिस्तान यांचे संबंध सुधारण्याऐवजी दिवसेंदिवस ते अधिकच बिघडत चालले आहेत असें वृत्तपत्रीय वार्तांवरून कोणाच्याहि ध्यानांत येईल. उभयतांच्या संबंधांत वितुष्ट आणणारे आमचे ढोबळ प्रश्न कोणते व त्यांची रूपरेषा काय? याबाबत सर्वांना उपयुक्त ठरणारी ही माहिती—

## निर्वासितांचा प्रश्न—

१९४७ मध्ये पश्चिम पाकिस्तानांत (पंजाब) हिंदूंची संख्या शेकडा ४२·९ व पूर्व पाकिस्तानांत (बंगाल) शेकडा ४५·३ या प्रमाणांत होती. फाळणीनंतर पाकिस्तानांतून हिंदूंची हकालपट्टी सुरू झाली व हे सर्व लोक हिंदुस्थानांत निर्वासित म्हणून येऊन दाखल झाले. १९५६ अखेरपर्यंत प. पाकिस्तानांतून भारतांत ४७ लाख व ४० हजार निर्वासित आले; पूर्व पाकिस्तानांतून १९५९ पर्यन्त निर्वासितांचे लोंढे येत होते व त्यांची त्यावेळेस संख्या ४१ लाख १७ हजार इतकी झाली होती. पाकिस्तानांतून आजवर एकूण ८८ लाख व ५७ हजार निर्वासित भारतांत आले.

नुकसानभरपाई व पुनर्वसन या प्रीत्यर्थ भारत सरकारने या निर्वासित हिंदूंसाठी आजपर्यन्त ४७१ कोटी ७१ लक्ष रुपये खर्च केले आहेत.

## कालव्याच्या पाण्याचा प्रश्न—

राजस्थानांतील कालवे आणि भाक्रा नान्गल या योजना भारत सरकारने सुरू केल्यामुळे पाकिस्तानचा पाणीपुरवठा कमी झाला. या पाकिस्तानच्या तक्रारींतून भारत–पाकिस्तान यांच्या दरम्यान कालव्याच्या पाण्याबाबतच तंटा सुरू झाला. १९–९–१९६० या दिवशीं पं. नेहरू, अध्यक्ष आयूबखान आणि जागतिक बँकेचे उपाध्यक्ष श्री. इलिफ् या त्रिवर्गाने 'इंडस् वॉटर ट्रिटी' या या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या करारावर स्वाक्षऱ्या केल्यामुळे हा वाद मिटलेला आहे. या कराराच्या तरतुदी—(१) १० वर्षांनन्तर रॅावी, बियास आणि सतलज या नद्यांचें पाणी भारतास अबाधितपणें वापरतां येईल. (२) सिंधु, झेलम् आणि चिनाब या तीन्ही नद्यांचें पाणी पाकिस्तानास हा करार अस्तित्वांत आल्यापासूनच अबाधितपणें वापरतां येणार आहे. मात्र या नद्यांवर हिंदुस्तानास जलविद्युत् योजना

---

### फैजपूर...

ही बाजू मांडण्यासाठी कोणीहि पुढे सरसावल्याचें ऐकिवांत नाही. असे पर्याय सरकारसमोर प्रत्यक्ष हजर करण्याची जबाबदारी विरोधी पक्षाचीच आहे. असे पर्याय पुढे आलेच नाहीत तर सरकारला हजर असणाऱ्या दडपणांना बळी पडण्याखेरीज गत्यंतरच उरत नाही ही गोष्टीहि आपण ध्यानांत घेतली पाहिजे.

### समतोलाचा अभाव

फैजपुरला कॉलेज निघालें. एका दृष्टीने ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे, परंतु ज्या ओढगस्तीनें व घिसाडघाईनें हें कॉलेज निघत आहे ती प्रवृत्ति अंतिमदृष्ट्या समाजाला घातकच आहे. फैजपुरमधील शाळेला आज चाळीस वर्षें उलटून गेलीं, परंतु शाळेला स्वतःची इमारत नाही; चार ठिकाणी भाड्याच्या जागा घेऊन शाळा भरवावी लागत आहे. प्राथमिक शाळांची स्थिति याहूनहि शोचनीय आहे. ओल् असणाऱ्या जमिनीवर मुलें बसत आहेत; अंधाऱ्या खोल्यांतून वर्ग चालू आहेत. एका टोकाला शिक्षणाची ही दुर्दशा तर दुसऱ्या टोकाला कॉलेज सुरू करण्याची उतावळ, हा काय समतोल विकासाचा आदर्श आहे? मुख्य मंत्री श्री. चव्हाण कॉलेजचें उद्घाटन करावयास आले असतां त्यांना ही परिस्थिति कोणीं समजावून दिली नाही. कोणींहि त्यांना 'प्राथमिक शाळा पहायला चला' असें सांगितलें असतें तर त्यांनी निश्चित नकार दिला नसता. या निमित्ताने विकासांतील विषमता त्यांच्या नजरेसमोर आणतां आली असती, लोकांनाहि आपल्या प्रयत्नांतील विसंगति उमगली असती व सर्वांचाच नियोजनविषयक दृष्टिकोन सुधारण्यास मदत झाली असती, पण यांपैकी कांहीहि फैजपुरांत घडल्याचें ऐकिवांत नाही.

सत्ताधारी कॉंग्रेसपक्ष आत्मसंतुष्ट आणि विरोधी राजकीय प्रश्न अल्पसंतुष्ट, ही आहे चालू परिस्थितींतील खरी कोंडी. या दोन्हीहि आघाड्या निवडणुका आल्या की,जाग्या होतात आणि पुन्हा दीर्घकाळ सर्वत्र सामसूम असतें. लोकशक्तीच्या नित्य उपासनेचें महत्त्व कोणीहि ध्यानांत घेत नाही. या उपासनेला प्रारंभ केल्याशिवाय जनशक्ति जागृत होईल हें संभवनीय नाही. ही उपासना कुणी काशीविश्वेश्वराच्या महाद्वारांत घंटानादाच्या साहाय्याने करावी, तर कुणीं फैजपुरासारख्या लहानशा गांवांतील एखाद्या राऊळांत एकांताने करावी. खरें सामर्थ्य उपासकांत आहे. असे उपासक गांवोगांव निर्माण होण्याची आज गरज आहे. या उपासकांमागे पैशाचें, पक्षांचें, स्थानाचें पाठबळ असो वा नसो तो जेथे आपलें कार्य सुरू करील तेथे या सर्व गोष्टी उपस्थित होतील. निर्झरांनी आपले प्रवाह स्वच्छंद खळखळत ठेवावेत; त्यांना नदीचें दर्शन घेतां येईल. नद्यांची महानदी आणि महानद्यांचा महासागर निर्माण करण्याचें कार्य निसर्ग करीतच आहे. त्याची चिंता कशाला?

सुरू करतां येतील. ( ३ ) रावी, बियास आणि सतलज या नद्यांचें पाणी १० वर्षांनन्तर भारताकडे जाणार असल्याने या दहा वर्षांच्या कालावधींत पाकिस्तान ही तूट भरून काढण्यासाठी कांही बांधकामें पूर्ण करील. या बांधकामापोटीं भारताने सुमारे ८२ कोटी रुपयांची रक्कम पाकिस्तानास द्यावयाची आहे.

ही रक्कम १० हप्त्यांत द्यावयाची असून भारताने आपला ८ कोटा २७ लक्ष ४६ हजार ६६६ रुपयांचा पहिला हप्ता नुकताच भरला आहे.

## भारत–पाकिस्तान–सीमा–प्रश्न—

* आसाम आणि बंगालमधील उभय देशांच्या सीमेवरील नद्यांच्या प्रवाहांत होणारे हंगामी बदल आणि पाकिस्तान सरकारचें भारत विद्वेषी धोरण या दोन कारणांमुळें रॅडक्लिफ अवॉर्डानुसार ठरलेल्या उभय देशांच्या सीमांबाबत नेहमीं वितुष्टाचे प्रसंग उद्‌भवतात.

* निकोबालच्या सीमा-अतिक्रमणाबाबत भारततर्फे एक कडक निषेधखलिता पाकिस्तानला पाठविण्यांत आला. ( ९–५–५५. )

* भारतीय सैनिकांनी कच्छ प्रदेशांतील छाड बेटावरून पाकिस्तानी सैनिकांना घालवून दिलें ( २६–२–५६. )

* फाजिलखाँजवळ पाकिस्तानने केलेल्या गोळीबारांत ७ भारतीय पोलिस ठार झाले. ( ९–७–५८. )

* भारतीय विमानदलाचें 'कॅनबेरा' हें विमान नेहमींचें उड्डाण करीत असतां पाकिस्तानने गोळ्या घालून पाडलें ( १०–४–५९. )

* जवळ जवळ १४ महिने पाकिस्तानकडे असलेला आसामांतील तुकेरग्राम हा प्रदेश पाकिस्तानकडून भारताच्या ताब्यांत आला. ( १६–११–५९. )

* सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून बेरुबारीचा प्रदेश पाकिस्तानला येण्याबाबतचें विधेयक राज्यसभेंत मान्य करण्यांत आलें. ( १४–३–६०. )

## काश्मीरचा प्रश्न—

चीन, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या देशांच्या सीमा काश्मीरजवळ भारताशी निगडीत झालेल्या आहेत. रशियाची सरहद्द काश्मीरपासून अवघ्या २० मैलांवर आहे ( पाकिस्तान ). झाल्यामुळें काश्मीरचा प्रश्न राष्ट्रीय व आन्तरराष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

जम्मू–काश्मीरच्या पश्चिम भागांत १९४७ सालीं पाकिस्तानी टोळीवाल्यांनी आक्रमण केलें. काश्मीरचे प्रजाजन आणि भारतीय सेना यांनी या आक्रमणाचा संयुक्त प्रतिकार केला. तरीहि काश्मीरचा एकतृतियांशापेक्षा अधिक प्रदेश आज पाकिस्तानच्या ताब्यांत आहे.

संपूर्ण जम्मू–काश्मीरची लोकसंख्या १९५१ च्या शिरगणती-प्रमाणे ४४ लक्ष १० हजार एवढी होती. १९६१ च्या शिरगणती-प्रमाणे पाकिस्तानव्याप्त काश्मीरचा मुलुख सोडतां उरलेल्या जम्मू–काश्मीरची लोकसंख्या ३५ लाख ८३ हजार ५४५ एवढी आहे.

भारताने पाकिस्तानी आक्रमणाचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे नेला. संयुक्त राष्ट्रसंघ आणि सुरक्षा समिति यांच्या मध्यस्थीने एक तात्पुरती युद्धबंदी रेषा भारत–पाकिस्तान यांच्या सैन्य–दलांच्या दरम्यान ठरविण्यांत आली. ही रेषा भारताच्या उत्तरेकडच्या अखेरच्या सीमाबिंदुपर्यंत आखली गेली नसून सिंधु नदीच्या एका उपनदीजवळ वाटेंतच ती अर्धवट सोडण्यांत आलेली आहे.

पाकिस्तानने आपल्या फौजा काश्मीरमधून काढून घेतल्या तर काश्मीरच्या सामिलीकरणाचा प्रश्न सार्वमताने सोडवावा ही भारताची भूमिका सप्टेंबर १९५७ पर्यंत कायम होती. त्यानंतर पाकिस्तानने सैन्य काढून घेतल्याखेरीज कसल्याहि तऱ्हेचीं आश्वासनें देण्यास किंवा वाटाघाटी करण्यास आपली तयारी नसल्याचें भारताने जाहीर करून टाकलें आहे. ही भारताची भूमिका आजतागायत कायम आहे.

काश्मीर हा भारताचाच एक घटक आहे असें विधान श्री. ख्रुश्चेव्ह यांनी आपल्या श्रीनगर येथील भाषणांत केलें.( १०-१२-५५)

भारत–पाकिस्तानच्या काश्मीर-प्रश्नाबाबत अमेरिका हस्तक्षेप करणार नाही असें अमेरिकेचे उपाध्यक्ष श्री. रिचर्ड निक्सन यांनी कराची-विमानतळावर जाहीर केलें. ( ९–७–५६ )

काश्मीर हा भारताचा घटक आहे या भारताच्या भूमिकेस चीनचे पंतप्रधान श्री. चौ–एन्–लाय यांनी खाटमांडूंतील वार्ताहरांना दिलेल्या मुलाखतींत पाठिंबा व्यक्त केला. ( २९–१–५७ )

पाकिस्तानव्याप्त काश्मीरांत पाकिस्तानने 'मंगला धरण' बांधण्यास प्रारंभ केल्याबद्दल भारताने संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीकडे आपला निषेध नोंदविला.

पाकिस्तानव्याप्त काश्मीरांतून १९४७ नंतर भारताकडे एकूण १ लक्ष ३५ हजार निर्वासित आले. यापैकी ८५ हजार निर्वासित काश्मीरांत व ४८००० निर्वासित भारतांतील इतर राज्यांत स्थायिक झाले आहेत.

या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी भारत सरकारने एकूण १ कोटी ८४ लक्ष रुपये खर्च केलेले आहेत.




आधुनिक, घाटदार व मजबूत अशा
सर्वप्रकारच्या तांब्यापितळेच्या
**भांड्यांचे व्यापारी**
**खोपडे ब्रदर्स**
३३ शुक्रवार, रामेश्वर चौक, पुणें २
**आधुनिक प्रकारचे स्टोव्ह मिळण्याचें ठिकाण**
**एकवेळ केंद्रास अवश्य भेट द्या.**




**बुद्धिबळ खेळाडूंच्या शास्त्रशुद्ध शिक्षणासाठी**
**या पुढें क्रमशः सुरू होत असलेलें**
**' माणूस ' चें एक वैशिष्ट्यपूर्ण सदर**

ले. :—**श्रीकृष्ण साखळकर**, मुंबई

( लेखांक पहिला )

**बुद्धिबळाचा डाव मूळचा पौर्वात्य, पण आज तो ज्या** प्रकाराने खेळला जातो तो लक्षांत घेतां त्यानें पाश्चात्य पेहेराव चढवला आहे असें म्हणावें लागतें. मीं ' पेहेराव ' हा शब्द वापरला, कारण मूळ डाव व सध्या खेळला जाणारा डाव यांत जे फेरफार झालेले आहेत ते खेळाच्या अनुषंगाने सहजगत्या सोईचे म्हणून करण्यांत आलेले आहेत. मोहऱ्यांची गति, शक्ति व फिरण्याची कक्षा ( पट ) पूर्वी होती तशीच राहिली आहे, पण पाश्चात्य डाव हा आज सर्व जगांत खेळला जात असल्यामुळे व जागतिक स्पर्धांसाठी तीच पद्धत वापरली जात असल्याकारणाने त्याच डावाची माहिती करून घेणें फायदेशीर होईल.

बुद्धिबळाचा डाव लिहिण्याच्या वेगवेगळ्या पद्धति आहेत. त्यांत दोन महत्त्वाच्या, एक म्हणजे शाब्दिक व दुसरी आकड्यांची. शाब्दिक पद्धत हीच पुस्तकें लिहितांना उपयोगांत आणली जात असल्यामुळे मी तीच पद्धत वाचकांना खेळाचा परिचय करून देतांना वापरणार आहे.

### नव्या व जुन्या डावांतील फरक

बुद्धिबळाच्या डावाची नोंद करायला लागल्या दिवसापासून बुद्धिबळाचें एक शास्त्र बनलें आहे. शेकडो डाव कसे खेळले गेले, कोण कां जिंकले वा हरले याचा ऊहापोह होऊन खेळाच्या बैठकीचीं कांही तत्त्वें प्रतिपादन करण्यांत आलीं. तीं तत्त्वें पुन्हा वापरण्यांत आणलीं गेलीं. कांही फोल ठरलीं तर कांही उपयोगी ठरलीं. हीं तत्त्वें या ना त्या रूपांत आजच्याहि खेळांत आहेत. पण धडाक्याचा तडफदार खेळ खेळण्याकडे जगश्रेष्ठ खेळाडूंचा अलीकडे कल असल्याने तीं तत्त्वें पंचवीस वर्षांपूर्वीच्या डावांत ज्या प्रकर्षाने तळपत होतीं, तशीं आता चटकन् हुडकून काढतां येत नाहीत. खेळाच्या धुमश्चक्रींत प्रत्येक डाव हा कांही वेगळ्याच तत्त्वावर खेळला जातो असा भास आजचे डाव निर्माण करतात. मात्र हें खरें नव्हे, हें मी ज्यावेळीं डावांचें विवेचन करण्यास घेईन, त्यावेळीं आपल्याला कळून येईलच. आजच्या डावांत तडफ जरूर आहे. कल्पना शक्तिचाहि वापर दांडगा दिसतो. प्रतिपक्षावर मात करण्यासाठीं इरेला पेटून वेळप्रसंगीं धोका पत्करला जातो तरीसुद्धा नव्या धोरणामुळें जुन्या तत्त्वांनीहि एक वेगळें स्वरूप प्राप्त झालें आहे. एवढेंच !

### सामने कसे खेळले जातात

बुद्धिबळाचा डाव शिकायला घेण्यापूर्वी आज जगांत त्यांचे सामने कोण व कसे खेळतात व बुद्धिबळाचा जागतिक अजिंक्यपदासाठी सामना कसा खेळला जातो याची माहिती असणें श्रेयस्कर आहे. बुद्धिबळाची एक जागतिक संस्था आहे. ( The world Chess Federation ) ही संस्था निरनिराळ्या देशांच्या संस्थांची प्रतिनिधि म्हणून बनलेली आहे. आपल्या भारताची बुद्धिबळ संस्था ( The All India Chess Federation ) ही ह्या जागतिक संस्थेची प्रतिनिधि आहे. जागतिक संस्थेने सोईकरतां जगाचे वेगवेगळे विभाग पाडले आहेत. प्रत्येक विभागांत येणाऱ्या देशांचे श्रेष्ठ खेळाडू सामने खेळतात. नंतर सगळ्या विभागांचे जेते सामने खेळतात. त्या सामन्यांतील पहिले सहा विजयी व मागील जागतिक सामन्यांतील पहिले दोन मिळून आठजण जागतिक पदासाठी खेळण्याचा हक्क मिळावा म्हणून सामने खेळतात. या सामन्यांत प्रत्येकजण दुसऱ्याशी चार डाव खेळतो. या सामन्यांचा विजेता जगाच्या अजिंक्यपदीं असलेल्या खेळाडूशीं चोवीस डावांचा सामना खेळतो व त्यांत त्याला बरोबरीपेक्षा अधिक म्हणजे, कमींत कमी साडेबारा गुण मिळवावे लागतात. बुद्धिबळांत गुण मोजण्याची पद्धत अशी आहे कीं, जिंकल्यास एक गुण, बरोबरी झाल्यास अर्धा व हरल्यास शून्य गुण. वर नमूद केलेले सामने खेळण्यास तीन वर्षांचा काळ लागतो, म्हणून जागतिक अजिंक्यपदासाठी दर तीन वर्षांनी खेळ खेळला जातो. शिवाय जागतिकसंस्था दर दोन वर्षांनी सर्व देशांचा एक सांघिक सामना घडवून आणते. प्रत्येक देश आपले चार खेळाडू इतर देशांच्या खेळाडूंबरोबर खेळवितो व अशा तऱ्हेनें खेळून संपल्यावर ज्या देशाचे अधिक गुण होतील तो देश विजयी होतो. गेल्यावर्षी झालेल्या सामन्यांत रशिया पहिला आला व अमेरिका दुसरी आली. हे सामने निरनिराळ्या देशांत खेळले जातात.

### भारतीय बुद्धिबळसंस्था

आता आपण भारतीय बुद्धिबळ संस्थेविषयी थोडी माहिती मिळवूं. ही संस्था चौदा प्रातिनिधिक मंडळांची बनलेली आहे. तीं मंडळें पुढीलप्रमाणे—( १ ) मुंबई ( २ ) सांगली ( ३ ) गुजराथ ( ४ ) हैद्राबाद ( ५ ) पाँडेचरी ( ६ ) केरळ ( ७ ) म्हैसूर ( ८ ) आंध्र ( ९ ) मद्रास (१०) ओरिसा (११) बंगाल (१२) कलकत्ता (१३) राजस्थान (१४) उत्तरप्रदेश. या प्रत्येक मंडळाने आपआपल्या विभागांत सामने घडवावयाचे व पहिले चार खेळाडू भारतीय अजिंक्यपदासाठी खेळावयास पाठवायचे. हे सर्व खेळाडू व मागच्या भारतीय सामन्यांतले पहिले सात खेळाडू हे स्विस पद्धतीवर सामने खेळतात. प्रत्येक खेळाडूला एकंदर चौदा डाव खेळावे लागतात. ज्याचे गुण जास्त तो भारताचें अजिंक्यपद मिळवतो. याच वर्षी हैद्राबादला दि. ३ डिसेंबरापासून भारतीय अजिंक्यपदासाठी सामने होणार आहेत. सध्या भारताचा श्रेष्ठ खेळाडू मद्रासचा मॅनुअल अॅरन हा आहे. आजचा जगज्जेता रशियन खेळाडू मायकेल बॉटविनीक हा आहे.

# मराठी रंगभूमीचा आत्मा निकोप आहे....

दि. के. बेडेकर

अवघ्या तीन-साडेतीन वर्षांत पु. ल. देशपांडे यांच्या या नाटकाने हजारो लोकांना मनमुराद हसविलें. बंदूक खांद्यावर घेतलेले आणि 'हाय कंबख्त, तूने पीहि नही' म्हणून हसणारे काकाजी लोकांना आवडले. विशाल महिलांची ओळख लोकांना पटली. आचार्यांच्या वक्तशीर, तापट आणि आततायी कर्मठपणाची लोकांना गंमत वाटली. गीतेच्या कोवळ्या जीवनाला लागलेली तपस्येची धग आणि तिला शेवटी मिळालेलें वरदान लोकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडलें.

या नाटकाचें यश व लोकप्रियता पाहून माझे एक मित्र बेचैन होतात. गंधर्वांनी रंगविलेली, कीचकाच्या क्रोधाविष्ट भाषणांनी थरारलेली मराठी रंगभूमि त्यांच्या हृदयांत कायमचें घर करून बसली आहे. तळिरामाची आर्यमदिरामंडळांतली बडबड इंदूबिंदूच्या कुरूपतेवरील विनोद त्यांच्या मनाला अजून गुदगुदल्या करतो. ते म्हणतात, 'तुमचीं' हीं अलीकडचीं नाटकें म्हणजे नुसते फार्स आहेत. 'तुमचे' प्रेक्षक अगदी थिल्लर झाले आहेत. 'तुमच्या' नटांना गाणें तर सोडाच पण नीट बोलणेंहि जमत नाही. तुमचें....मीं त्यांना म्हटलें, 'तुमचें' म्हणजे कोणाचें? मराठीच नाटककार, मराठीच नट व मराठीच प्रेक्षक. मग आमचें व तुमचें हा फरक कसा?

पण हा फरक वाटण्याइतकी या जुन्या रसिकांची दृष्टि जुन्यांतच रमणारी व नव्याच्या रंगरूपाकडे डोळेझाक करणारी झाली आहे खरी.

खरें तर असें आहे की, आज नाटककाराचें कर्म सोपें राहिलेलें नाहीं. देशाभिमानाच्या, दुष्ट चालीरीतींविरुद्ध अभिनिवेशाच्या चार गोष्टी सांगून आज नाटक उभें राहत नाही. विनोदाला नुसत्या शाब्दिक कोटया व कसरत किंवा बाह्य रूपाचें विडंबन चालत नाही. माणसाच्या मनांत शिरायचें तर खोल शिरावें लागतें.

### मोठें खाष्ट विडंबन

'तुझें आहे तुजपाशी' मध्ये विडंबन आहे, मोठें खाष्ट विडंबन आहे. आचार्यांचें पहिल्या प्रवेशांत आगमन होतें तेंच मोठ्या विक्षिप्तपणाने. सारें जग शुद्ध करायला निघालेला हा कोपिष्ठ विश्वामित्र काकाजींच्या संथ व बेफिकीर घरांत नुसता धुमाकूळ घालूं लागतो. त्यांच्या व्रतवैकल्यांची चेष्टा करतांना तपशील असा कांही आला आहे की, गांधीभक्त आचार्यांची ती चेष्टा म्हणजे कांही प्रसिद्ध आचार्यांची चेष्टा आहे असा भास प्रेक्षकांना होतो. पण तो भास आहे याची कल्पना त्यांना नाटकाच्या शेवटी होते. स्वतः आचार्य आपल्या शेवटल्या भाषणांत सांगतात की, बुद्ध, खिस्त आणि गांधीजी हीं माणसें दीपस्तंभासारखीं मोठीं होतीं व आपणहि तेवढे आहोंत या अहंकाराने मी दुबळा असून त्यांच्यासारखें वागण्याचा अट्टाहास केला. मी जन्मभर भीतीने पोखरलेला होतों व कर्मठपणाच्या कुबड्या लावून चालत होतों.

आचार्यांची ही शोककहाणी गांधीजींच्या अनुयायांतील कित्येकांची कहाणी आहे, तसेंच मार्क्स, बुद्ध, इतकेंच नव्हे तर यांच्याहून सामान्य अशा प्रेषितांच्या अहंकारी व महत्त्वाकांक्षी अनुचरांची हीच विलापिका आहे. खरें शांत वैराग्य आणि सत्तेच्या लालसेने संचारलेला तामसीपणा यांतला फरक या अनुचरांना कळत नाही. नेमका तोच फरक ढळढळीतपणें डोळ्यांसमोर उभा करण्याचें सामर्थ्य या नाटकांत आहे. अतिरंजितपणाने तो फरक सांगितला आहे, हसवीत सांगितला आहे व यांत बिघडलें तरी काय? काकाजींच्या तोंडून शराब व शिकार यांचें गुणगान झालें आहे तेंहि आचार्यांच्या अहंकारी अशांतपणावर उतारा म्हणूनच. तसा काकाजी हा माणूस आहे—म्हणजे माणसासारखा सुखदुःखांना व संकटांना न डगमगणारा प्राणी आहे. जगाच्या इतिहासांत बुद्ध, ख्रिस्त आणि गांधीजी यांच्यासारखे महान् दीपस्तंभ उभे दिसतात आणि त्यांच्या प्रकाशांत तुफान दर्यावर जहाज लोटणारे निर्भय वृत्तीचे काकाजींसारखे नावाडीहि दिसतात, म्हणून तर मानवजातीचा प्रवास येथवर झाला आहे.

### रविंद्रनाथांच्या 'नन्दिनी'ची आठवण

रविंद्रनाथांनी 'रक्तकरबी' या प्रसिद्ध नाटकांत 'नन्दिनी' नांवाची नायिका रंगविली आहे. एका यक्षनगरीचा राजा स्वतःला एका लोखंडी पिंजऱ्यांत कोंडून घेऊन सत्ता चालवीत असतो. माणसांमधल्या प्रेमाचें, आनंदाचें व दुर्दम्य चैतन्याचें प्रतिक असलेली नन्दिनी त्याला मुक्त करूं पाहते. त्या नन्दिनीची आठवण पु. ल. देशपांडे यांचें नाटक पाहून होते. काकाजी व गीता या दोघांच्या जीवनांत 'रक्तकरबीची' आसक्ति व आनंद आहे. गीतेला या आनंदाच्या स्पर्शाचा लाभ नाटकाच्या शेवटी होतो पण काकाजी प्रथमपासूनच त्या स्पर्शाने शांत आहेत.

आज आपलीं नवीं नाटकें पाहून असें वाटतें की, यांत माणसाच्या कर्तृत्वाबद्दल, आकांक्षांबद्दल खोल विचाराची धडपड आहे विडंबन अतिरंजित असले व समजा इतर दोषहि असतील, पण नुसता थिल्लरपणा नाही. आजचे प्रश्नच गुंतागुंतीचे व तिरकस झाले आहेत त्याला कोणाचा इलाज आहे? पण आहेत ते प्रश्न थोडे गोड थोडे कडू शब्दांत मांडावयाचे हें नाटककाराचें काम आपले नाटककार करीत आहेत का? 'तुझें आहे तुजपाशी' पहा म्हणजे लक्षांत येईल की, मराठी रंगभूमीचा आत्मा तिचा तिच्यापाशी आहे व तो चांगला निकोप आहे.

* * *

# रशियन चित्रपट आघाडीवर कां ?

## पाश्चात्य चित्रपटांची घसरगुंडी

पाश्चात्य चित्रपटांच्या लोकप्रियतेस अलीकडच्या काळांत झपाट्यानें उतरती कळा लागल्याचें दृश्य चहूकडे दिसूं लागलें आहे. ती अवकळा झाडून टाकण्यासाठी लक्षावधि डॉलर्स ओतून तयार केलेले चित्रपट पुढे येत आहेत. तथापि यासारख्या उपायांनी ती अधोगति थांबण्याचें चिन्ह दिसत नाही, चित्रगृहांना टाळीं लागत आहेत आणि प्रेक्षकांची अनुपस्थितीहि वाढत आहे. या ओहोटीचा खरा तडाखा अमेरिका आणि ब्रिटन या देशांना बसला आहे. फ्रान्समध्यें हॉलिवुड चित्रपटांची संख्या आता ३५ टक्क्यांनी घसरली आहे आणि इटलींत तर ५० टक्के कपात झालेली दिसून येते. ग्रेट ब्रिटनमध्यें १९५९ सालाशीं तुलना केली तर उपस्थितीचें प्रमाण १४ टक्क्यांनी खाली आलेलें आहे. जवळ जवळ एक हजार चित्रगृहें बंद पडलीं आहेत. या सर्व हाहाःकाराला कारणीभूत कोण हा प्रश्न खरोखरीच जाणकारांना पडला आहे. टेलिव्हिजन हाच ह्या भीषण नाट्याचा खलनायक होय असें जें सदैव म्हटलें जातें तें बरोबर, की सिनेप्रेक्षकांनाच या चित्रपटांचा वीट आला आहे. यासंबंधी शोधबोध सध्या चालू असला तरी चित्रपटांच्या बाजारपेठेंत निर्माण झालेली ही पोकळी कोणालाच नाकरतां येत नाही. तूर्त एवढें नक्की म्हणतां येईल की, ' हॉलिवुड टाईप ' चित्रपट लोकांच्या मनातून झपाट्यानें उतरत आहेत.

## सोविएत चित्रसृष्टीचें अंतरंग

चित्रपट धंद्यांतील या स्पर्धेमधील नाट्यात्मक योगायोग असा की, हॉलिवुड चित्रपटांशी सामना देण्यास किंवा त्यांची रिकामी पडूं लागलेली जागा भरून काढण्यास, बहुधा सोविएत युनियनमधील चित्रसृष्टि पुढे येणार अशीं लक्षणें दिसत आहेत. सोविएत युनियनमधील चित्रसृष्टीची ही आघाडी लक्षांत घेतां या चित्रसृष्टीचें अंतरंग पाहणें उद्‌बोधक ठरेल. ' मॉसफिल्मस् ' हा युरोपांतील सर्वांत मोठा स्टुडिओ आहे. या स्टुडिओंत वर्षाकांठीं २६ चित्रपट निघतात. आता सोविएत चित्रांना मागणी मोठ्या प्रमाणांत येत असल्याने येत्या कांही वर्षांतच हें वार्षिक उत्पादन दुपटीने वाढण्याचा संभव आहे. त्यादृष्टीने आज सोवियत युनियनमधील लहान मोठ्या २० स्टुडिओंतून जोराची हालचाल चालू असल्याचें दिसून येतें. १९६१ साली त्यामुळे अधिक सोविएत चित्रपट निरनिराळ्या देशांतून प्रकाशित होतील याविषयीं शंकाच नाहीं. या २० स्टुडिओंमधून वर्षाला सुमारे १२० मोठे चित्रपट ( फिचर फिल्मस् ) तयार होतात. दर आठवड्याला साधारणत: ६७० लाखांहून अधिक रशियन जनता हे चित्रपट पाहते. परदेशांत सोविएत चित्रपटांना मिळत असलेल्या मान्यतेमुळे खुद्द देशांतहि आज त्यांची लोकप्रियता वाढत आहे. प्रत्येक खेळामागे होणारी प्रेक्षकांची उपस्थिति आज कमी पडलेली दिसते, पण याचें कारण लोकांचा उत्साह आटला हें नसून सिनेमागृहांची वाढ हेंच होय. देशांत १६००० चित्रपटगृहें असून ८० हजार क्लबज् व फिरते सिनेमा आहेत.

सोविएत चित्रांची निर्मिति उच्च पातळीवरून होत असल्याने विविध स्टुडिओ, सांस्कृतिक खातें आणि वितरण संस्था यांचें बहुमोल सहकार्य सतत होत असतें. प्रत्येक प्रजासत्ताकांत ( रशियांत विविध प्रजासत्ताक राज्यें असून त्या सर्वांचें मिळून सोविएत संघराज्य होतें. ) एक राष्ट्रीय स्टुडिओ त्याच्या सांस्कृतिक खात्याच्या नियंत्रणाखाली चालतो. या स्टुडिओंना निर्मितीचें पूर्ण स्वातंत्र्य असतें. तथापि कथानकाबाबत सांस्कृतिक खात्याने दिलेला सल्ला सहसा दुर्लक्षिला जात नाही. स्टुडिओचा अर्थसंकल्प सांस्कृतिक खातेंच करीत असतें. या बाबतींत वितरण-संघटनेचीहि संमति घेतली जाते. सांस्कृतिक खातें व वितरणसंघ यांनी स्टुडिओच्या रकमेला मान्यता दिल्यानन्तर ती स्टेट बँकेस दिली जाते. साधारणत: ७–८ महिन्यांत एक चित्रपट पूर्णपणें तयार होतो. दिलेल्या मुदतीअगोदर व मान्यता दिल्यापेक्षा कमी पैशांत चित्रपट पूर्ण झाला, तर कामगारांना बोनस वांटण्यांत येतो. स्थानिक मंडळाच्या वतीने चित्रपटांचें नियंत्रण होतें. वितरणसंघटनेला ' विक्री ' तून टक्केवारी दिली जाते. विशेष उल्लेख करण्याची गोष्ट म्हणजे सोविएत चित्रसृष्टींत नफेबाजीला मुळीच स्थान नसतें.

## पद्धतशीर आखणी हें यशाचें गमक

आज सोविएत चित्रसृष्टीचें यश अगदीं भरघोस आहे आणि इतर पाश्चात्य चित्रपटांशी स्पर्धा करीत तिचा वरवर क्रमांक लागत आहे. या आजच्या यशाचें गमक किंवा श्रेय हें त्यामागच्या अत्यंत सूत्रबद्ध आखणीलाच द्यावयास पाहिजे. सोविएत चित्रपट सृष्टींतील अर्थव्यवस्थेची आखणी अशी विशिष्ट प्रकारची असल्याने लाखो डॉलर्सवाल्या चित्रपट-संस्थांनाहि जी आर्थिक चिंता पछाडीत असते, तिचा लवलेशहि या रशियन चित्रसंस्थांना नसतो. एका रशियन चित्रपटाचें उत्पन्न २० लक्ष ते कोटि रुबल ( रशियन नाणें ) पर्यंत असतें. याचा अर्थ असा की, सोविएत चित्रपटांचा धंदा हा हॉलिवुडप्रमाणे परदेशी बाजारपेठांवर अजिबात अवलंबून नसतो. ' क्रेन्स आर फ्लाईंग ' आणि ' डेस्टिनी ऑफ ए मॅन ' या सोविएत चित्रपटांना जगभर मान्यता मिळालेली आहे. एवढेंच काय परंतु या चित्रपटांना खुद्द पाश्चात्य टीकाकारांकडूनहि शाबासकी मिळालेली आहे. या दोन चित्रपटांपैकी ' डेस्टिनी ऑफ ए मॅन ' हा चित्रपट ४ कोटी रशियन लोकांनी पाहिला असून तो ६० हून अधिक देशांत प्रदर्शित झालेला आहे.



# प्रचीति

व. मो. पुरंदरे.

मुघल बादशाह जहांगीर हा मोठा रसिक होता. कलांच्या, कलावंतांच्या आणि जाणकार रसिकांच्या सहवासांत तो रमून जात असे. इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीचा एक अधिकारी सर टॉमस रो याचा मुक्काम याच वेळीं दिल्लींत होता. सर टॉमस रो हा जसा मुत्सद्दी होता, तसाच तो मोठा रसिकहि होता. त्यामुळे त्याची आणि जहांगीरची कुंडली उत्तम जमली! तो जहांगीरच्या दरबारांत नेहमी जात येत असे.

एकदा जहांगीर व टॉमस चित्रकलेसंबंधी बोलत होते. बोलतां बोलतां हिंदुस्थानांतील चित्रकलेचा विषय निघाला, तेव्हा टॉमस रोने एकदम म्हटलें की, हिंदुस्थानांतील चित्रकला अगदीच दरिद्री दर्जाची आहे!

हा त्याचा अभिप्राय ऐकून जहांगीर चमकला. त्याने टॉमसला विचारलें, "मग तुमच्या दृष्टीने उत्कृष्ट चित्रकला कोठील?"

"युरोपांतील! अत्यंत उत्कृष्ट!" टॉमसने कांहीशा अभिमानाने म्हटलें.

"मग मला त्यापैकी कांही उत्कृष्ट चित्रें पाहावयास मिळतील काय?" जहांगीरने विचारलें.

टॉमसने 'हो' म्हटलें व आपल्या जवळचीं निवडक चित्रें त्याने जहांगीरला आणून दिलीं. तीं चित्रें खरोखरच अप्रतिम होतीं. जहांगीरने तीं चित्रें कांही दिवसांपुरतीं टॉमसकडून मागून ठेवून घेतलीं.

कांही दिवसांनंतर जहांगीरने टॉमस रोला बोलावून घेतलें आणि त्याला आपल्या चित्रशाळेत नेलें. तेथे बरींच चित्रें लावलेलीं होतीं. त्याने त्या चित्रांकडे हात करीत टॉमसला म्हटलें—

"या चित्रांतच तुमचीं चित्रें आहेत. तुमचीं चित्रें तुम्ही घेऊन जा!"

तीं चित्रें पाहून टॉमस रो गोंधळला. कारण त्याच्या युरोपीय चित्रांसारखीं अगदी हुबेहूब दुसरीं चित्रें तेथे होतीं! आता यांतील आपलीं चित्रें कोणतीं व इतर कोणतीं, तें कांही टॉमसला ओळखतां येईना! जहांगीरने हिंदुस्थानी चित्रकारांकडून टॉमसच्या चित्रांसारखीं हुबेहूब दुसरीं चित्रें तयार करवून तेथेच एकत्र ठेवलीं होतीं.

आश्चर्याने तोंडांत बोट घालीत टॉमस रो उद्गारला—

"मला कल्पना नव्हती! खरोखर हिंदुस्थानची चित्रकला फार श्रेष्ठ दर्जाची आहे!"




दि. बा. मोकशी

### दहा मे १९४१–पौर्णिमा

दुसऱ्या महायुद्धांत जर्मनीने लंडन शहरावर जे बॉंबहल्ले केले त्या सर्वांत भयाण आणि क्रूर असा हल्ला या रात्रीं केला. या हल्ल्यांत चौदाशे छत्तीस माणसें दगावलीं. अठराशे माणसांना गंभीर जखमा झाल्या. पांच हजार पांचशे घरें जळून खाक झालीं. दुसऱ्या तितक्याच घरांची मोठ्या दुरुस्त्या कराव्या लागतील इतकी मोडतोड झाली. आणि बारा हजार नागरिक बेघर झाले.

दुसऱ्या दिवशीं— अकरा मेला–घेतलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकींत ॲडमिरल इव्हान्सने 'हिंमत धरा' म्हणून आदेश देण्याचा यत्न केला तेव्हा नागरिक संरक्षक दलाचा प्रमुख म्हणाला,— 'आणखी दोन रात्रीं जर हे असे हल्ले आले तर लंडन शहर जाग्यावर रहाणार नाही.'

त्याचं म्हणणं अक्षरशः खरं होतें. त्याच्या विभागांतील दीड लाख लोकांचें पाणी, वीज आणि गॅस या एका रात्रीच्या बॉंबहल्ल्याने तोडलें होतें.

हा असा भयानक हल्ला करण्याचा जर्मनीचा बेत आदल्या रात्रीं झालेल्या एका चहापार्टींत सहज गप्पा मारतांना लहरींत ठरावा हा दैवाचा खळच म्हणावा लागेल. या पार्टीला वीस एक खास मंडळी आलेली होती. हिटलर व त्याची प्रेयसी एव्हा ब्रॉन हीं दोघें यजमान होतीं. रात्रीं दोनपर्यंत चहाकॉफीचे पेले रिकामे होत होते. दोन वाजतां एक अधिकारी सहज म्हणाला की, लंडन शहराला धडा शिकवला पाहिजे. जर्मन शहरावर हल्ला करण्याचा उद्धटपणा ब्रिटिश करीत आहेत ! आणि आपले लुफ्टवाफ स्वस्थ बसते !

खरें पाहिलें असतां हिटलरचें लक्ष या वेळीं इंग्लंडवरून निघून रशियाकडे वळलें होतें. रशियाला धडा शिकवण्याचे त्याचे बेत चालू होते. त्याला इंग्लंडवर जोर खर्च करावा असं वाटत नव्हतं. पण बाजूच्या सर्व अधिका-यांनी लंडनवर मोठा हल्ला करण्याची कल्पना उचलून धरली. एवढेंच नव्हें तर जर्मनीचें आपलें विमानदल ब्रिटिशांना भीतें असा खवचट आरोप एका अधिकाऱ्यानं करतांच हिटलर संतापानं कापूं लागला.

सकाळीं आठला जर्मन विमानदलाच्या प्रमुखाला हिटलरनं फोन केला—'लंडनवर हल्ला करावयाचा आहे. कितीं विमानें पाठवतां येतील ? '

दोन मिनिटांत उत्तर मिळालें, 'मोठाच हल्ला करावयाचा असेल तर तेवीसशे विमानें तयार आहेत.'

पहाटे बेत ठरला आणि आठ वाजून कांही मिनिटांनी हल्ल्याच्या तयारीला सुरुवात झाली.

—१—

लंडन शहराला संध्याकाळीं पांच वाजून दहा मिनिटांपर्यन्त याची कल्पना नव्हती. जर्मन विमानें रात्रीं हल्ला करण्यास आल्यावर त्यांना मार्गदर्शक म्हणून सोडलेले रडॉरचे किरण जेव्हा रॉयल विमानदलाच्या मॉनिटर युनिटनं ऐकले आणि घेतले व कळवले तेव्हा चहुकडे फोन वाजूं लागले आणि हुकूम सुटूं लागले. लंडनवर हल्ला येत आहे. सावध.

तसें वर्षभर लंडन शहर सावध होतें. हिटलरचा मोठा हल्ला केव्हातरी येणार हें सर्वांना ठाऊक होतें. वर्षभर जर्मन बॉंबहल्ल्याची संवयही त्यांना झाली होती. साधारण शनिवार आणि पौर्णिमेची रात्र हे दोन दिवस गोअरिंगच्या विमानदलाने लंडनवर हल्ला करण्यासाठी जणूं राखूनच ठेवलेले वाटूं लागले होते.

शनिवारीं, विशेषतः पौर्णिमेच्या दिवशीं विन्स्टन चर्चिल हा लंडनमध्ये नसे. विमानहल्ल्यांच्या भीतीने नव्हे. तर त्याच्याभोंवतालचे लोक त्याला शहरांत राहूं देत नसत. त्या दिवशीं लंडनपासून कांही मैलावर चर्चिलचा मुक्काम असे. दहा मे हा शनिवार होता, पौर्णिमाहि होती आणि चर्चिल लंडनच्या बाहेर होता. अधिकारावर आल्याबरोबर त्यानं ब्रिटिश जनतेला स्पष्ट सांगितलं होतं की, रक्त, अश्रू, कष्ट आणि घाम याशिवाय मी तुम्हांस कांही देऊं शकेन असं वाटत नाही. या शनिवारीं त्याचं म्हणणं अक्षरशः खरं ठरणार होतं.

पण शनिवारीं सकाळीं दुसऱ्याहि कांही घोषणा लंडनमध्ये भिंतीवरील पत्रकांवर दिसत होत्या. अधाशासारखे खाऊं नका, प्रत्येक शब्द जपून बोला, शत्रूचा हेर तुमच्या मागेच उभा असेल; आसन्यांत तुमची जागा स्त्रियांना द्या, ब्रिटन डरणार नाही.

—२—

असं सर्व वातावरण युद्धमय झालं असलं तरी युद्धाच्या वर्षा दोन वर्षांत नागरिकांच्या जुन्या संवयी व मनोधर्म संपूर्ण बदलणं कठिणच होतं. शनिवारीं सकाळीं सौ. मार्गारेट डॅले ही बाई आपल्या घरांतील फरशी आरशासारखी स्वच्छ करीत बसली होती. अठरा महिन्यांपूर्वी ती एका हॉटेलांत चहा देत होती. आता ती एक शुश्रूषा मोटार हाकीत होती. तिची कमाई त्यामुळं आठवड्यास दोन पौंड इतकी कमी झाली होती.

मार्गारिटा स्टाल्ही ही एक पंचवीस वर्षांची तरुण मुलगी! त्या सकाळीं उठतांच तिला जरा गारठा वाटला. चहा घेत तिनं वर्तमानपत्र चाळलं. आज शनिवार आणि त्यांतून पौर्णिमेची रात्र–हें लक्षांत येतांच तिला आपल्या प्रियकराची आठवण झाली. काय सांगावं! वुइंडसरला अठ्ठेचाळीस तासाची मधून मिळणारी खास सुट्टी आजच मिळेल नि तो येईलही.

या विचारांत उल्हासानं उठून तिनं घरकाम केलं. मग साडेनऊला सायकल घेऊन ती आपल्या नोकरीवर निघाली.

दुपारच्या रेडिओवरील बातम्याहि आशा देणाऱ्या होत्या.—रात्रीचे विमानहल्ले हिटलरला फार महागांत पडत आहेत, मे महिन्यांतील पहिल्या नऊ रात्रींत हल्ला करण्यास आलेल्या जर्मन विमानांपैकी नव्वद विमानें पाडण्यांत आलीं.

एकंदरीत आज रात्रीं मोठा हल्ला येणार आहे हें कुणाच्या मनांत येण्याचं कारण नव्हतं. दुपार होऊं लागतांच, शनिवार असल्यानं सुट्टीचं वातावरण शहरांत पसरूं लागलं होतं. लढाई असो किंवा शांतता असो शनिवार–रविवार हे ब्रिटिश माणूस साजरा करणारच.

त्यामुळेच बहुतेक सर्वजण आपापल्या कौटुंबिक कामाकडेच होते. हल्ल्याच्या भीतीनं लंडनमधील मुलांना युद्ध सुरू होतांच खेड्यापाड्यांतून पांगून ठेवलं होतं. आपल्या चार वर्षांच्या मुलीला भेटायला फिट्झेराल्ड आणि त्याची बायको दोघे दुपारीं निघालीं. तर बेट्रीस हाईन्स, थॉमसबरोबर उद्या होणाऱ्या त्याच्या लग्नाबद्दल बोलत होती. बेट्रीसनं पांढरा स्वच्छ झगा घातला होता. डोक्यावर ताज्या फुलांची हॅट घातली होती. त्या दुपारीं तिच्या डोक्यांत आपल्या विवाहाशिवाय दुसरं कांही नव्हतं. नववधूचा उत्साह, आनंद, भीति ती अनुभवीत होती.

रोझ सिमेन्स ही एक संसारी बाई. आपल्या मुलाचा वाढदिवस साजरा करण्यास तिनं मोठा केक आणला होता. वाढदिवस रविवारीं पण केक मात्र आत्ताच खायला हवा म्हणून मुलगा हट्टाने आक्रोश करीत होता. शेवटी बिचारीला केक मुलाला द्यावा लागला. तिनं सगळ्या रीतीनं समजावूनही मुलानं ऐकलं नाही. वाढदिवसाचा केक आधीं खाणं अशुभ असतं.

– ३ –

सर्व सामान्य नागरिक जरी अशी अधूनमधून लढाई विसरत असले तरी जे प्रत्यक्ष शहररक्षणासाठी नेमलेले लोक होते ते आपलीं कामं चोख करीत होते. संध्याकाळीं साडेचारला एकटं एक विमान इंग्लंडकडे येत आहे हें कळतांच लंडनमधील आठशे नागरिक संरक्षक चौक्यांना तशी सूचना देण्यांत आली.

नागरिक रक्षक वॉर्डन बार्लो आपल्या ठिकाणीं ड्युटीवर होताच. लढाई सुरू झाली तेव्हा त्यानं अकाउंटन्सीचा अभ्यास नुकताच पुरा केला होता. तो सारखा सिगारेटला सिगारेट लावून ओढी. तो रागीटहि होता. पण इतर वॉर्डन जें काम करायला दबकत तिथं तो पहिली उडी घेई. त्याच्याबद्दल कुणाला प्रेम नव्हतं पण आदर होता.

दीड वर्षांच्या युद्धानंतर एका विचित्र अवस्थेंतून तो जात होता. आपल्याला कांहीतरी अपाय होणार या भीतीखाली तो दडपत चालला होता. बॉम्ब हल्ल्यांत चिरडलेलीं कांही प्रेतं पाहिल्यापासून कुठं कांच जरी खळकन् वाजली तरी त्याला घाम फुटत होता. या भीतीवर मात करण्यासाठी दुसरी मोठ्ठी लढाई त्याच्या मनांत हल्ली चालली होती.

स्टेडीयमवर, हॉटेल्समधून नेहमीप्रमाणे त्या संध्याकाळीं गर्दी होती. एकमेकांना रेटीत साठ हजार प्रेक्षक खेळ संपतांच बाहेर पडले. तेथील सामना अनिर्णित राहिला होता. लोक नाराज झाले होते. जुन्या प्रसिद्ध अलेक्झांड्रा हॉटेलांत म्हातारीं माणसें जुन्या आठवणी काढीत होतीं. राजकारणी पुरुष चर्चा करीत होते. कुठे नाच, गाणीं, समारंभ यांचीं बोलणीं चालू होतीं.

—४—

रात्रीच्या बाँबहल्ल्याला तोंड देण्याची खरी तयारी संध्याकाळीं पांच वाजून सतरा मिनिटांनी सुरू झाली. आगा संरक्षक दलाचा प्रमुख मे याला फोन आला.

" मेजर जॅक्सन बोलतोय्, आज रात्रीला लंडनमध्ये एक हजार आगीचे बंब मला तयार ठेवायचे आहेत. "

एक हजार ! मे फोनकडे पहातच राहिला. मग भानावर येऊन त्यानं उत्तर दिलं,—

" दोन मिनिट थांबा ! सांगतों. "

आपल्या वरिष्ठाला फोन करून जास्तींत जास्त साडेसहाशे बंब देतां येतील असं त्यानं जॅक्सनला कळवलं. तसे हजार बंबहि देतां आले असते. पण एकतर येणारा बाँबहल्ला आगीचें बाँबच टाकील हें ठाऊक नव्हतं. शिवाय लंडनबाहेरील गावांसाठीहि कांही बंब ठेवणं आवश्यक होतं.

बाँबहल्ला आलाच तर जास्तींत जास्त वाईट काय होईल याची कल्पना करूनच जॅक्सन बेत आखीत होता. वीस वर्षें तो फायर ब्रिगेडचा प्रमुख होता. त्याच्या हाताखालचे लोक त्याच्या उमद्या स्वभावावर खूष होते. जॅक्सनपुढे आज अनेक प्रश्न विक्राळ रूप घेऊन उभे होते. लंडनच्या शंभर चौरस मैलांत या क्षणीं बावीसशे चौऱ्याहत्तर बंब होते. ही संख्या लहान नव्हती. पण एकोणतीस डिसेंबर आणि सोळा एप्रिल या दिवशीं झालेल्या बाँबहल्ल्यांत ज्या आगी लागल्या त्याला ते अपुरे पडले होते. आज जर हल्ला येणार असला तर आणखी बंब लागणारच. आता संध्याकाळचे साडेपांच वाजले होते. रात्र पडेपर्यंत जादा बंबांची कुमक यायला क्षणहि दवडून चालणार नव्हता.

जॅक्सनच्या कचेरींतील लोक यावेळपर्यंत भराभर कामाला लागले होते. शहराच्या पांच आग संरक्षक विभागांना प्रथम सूचना गेल्या. आजची रात्र कांही ठीक नाही—हुशार रहा ! एवढी सूचना पुरे होती. कांही मिनिटांत लंडनमधील फायर ब्रिगेडचे सर्व लोक आपले निळे डगले आणि शिरस्त्राणें चढवून तयार राहिले.

जॅक्सनच्या या खात्याशिवाय जवळजवळ दुसरं कुणीहि शहरांत 'हुश्शार' राहिलं नव्हतं. संध्याकाळ स्वच्छ होती. मावळतं उन शहरावर रेंगाळत होतं. बाँबहल्ले विसरून सर्व शहर एकोणीसशे एकोणचाळीसच्या मूडमध्ये गेलं होतं.

जॉन आणि डायना कुठंतरी चांगलं हॉटेल गाठून खाना घेण्याचा बेत करीत होतीं. मार्गारिटा स्टाल्ही कामावरून परत आली होती. वुइंडसर रजा काढून येईल ही आशा तिनं सोडली होती. तितक्यांत दाराची घंटा कणकणली. तिनं दार उघडलं. वुइंडसर समोर उभा होता.

तिनं झटपट स्वयंपाक केला. दोघांनी जेवण उरकलं. मग हातांत हात घालून कोचावर बसून दोघे गप्पांत रंगून गेलीं.

हल्ली सर्वांनाच रोज सतरा तास काम पडत होतं. पण जेम्सला त्याचं कांही वाटत नव्हतं. मेणबत्तीच्या कारखान्यांत तो कामाला होता. इंग्लंड जिंकणार याबद्दल त्याला खात्री होती. मुलांना खेड्यांत धाडल्यान मात्र त्याला चुकल्यासारखं वाटत होतं. स्वयंपाकघरांत बायकोला तो नेहमी मदत करी. आज एकटाच पाव भाजीत असतां एकत्र कुटुंबाचं पूर्वींचं चित्र डोळ्यापुढे येऊन तो अतिशय अस्वस्थ झाला होता.

वार्डन बार्लो आपल्या चौकींत होता. मिस् लोएन ही त्याच्या हाताखालच्या लोकांपैकी एक होती. दोघांचें अलीकडे बरेंच सूत जमलें होतें व बाजचे लोक त्यांची गोड थट्टाहि करीत होते. आपल्या हाताखालचे सर्व वॉर्डन-पहारेकरी तत्पर आहेत याचा त्याला फार अभिमान होता. पण आज संध्याकाळीं हें सर्व बार्लोच्या मनांतून गेलं होतं. आपली भीती कशी जिंकावी याचाच तो विचार करीत होता.

दोन वॉर्डन्सना आपल्या हद्दींतले घरन् घर तपासण्यास त्यानं पाठवलं. प्रत्येक घरांत किती माणसं आहेत हें त्याला पाठ होतं. बाँबमुळं आगी लागूं लागल्या की, त्याचा उपयोग होई. घरांतलीं माणसं शनिवारी ट्रीपला जात, तीहि नोंद तो ठेवी. त्यामुळं एखाद्या घरासमोर येतांच आंत किती माणसं आहेत हें तो क्षणांत सांगे. एखाद्या घरांत कोण कुठं झोपतं हेंहि त्यानं सांगितलं असतं.

लंडनच्या उत्तर भागांत हवाई अधिकारी डग्लस हल्ल्याला तोंड देण्याच्या तालिमीस लागला. जर्मन विमानें ज्या मार्गानं येणार असा इषारा मिळाला होता त्या मार्गावर त्यानं कांही पहाणी करणारीं विमानं सोडलीं.

—५—

काळोख पडूं लागला आणि लंडनमधलें वातावरण बदललें. लोकांचीं पावलं तळघरांतील आसऱ्यांकडे वळूं लागलीं. हातांत वळकट्या आणि चहाचे फ्लास्क घेऊन लोक निघाले. पण फक्त सत्तर हजार नागरिक त्या दिवशीं आसऱ्यांत झोपले. हें कांहीं बरं चिन्ह नव्हतं. जर हल्ला आला तर घरांतून फार माणसं काढणं सहाय्यक दलाला अतिशय जिकरीचं होऊन बसे.

रात्रीं अकराला हल्ल्याच्या इषाऱ्याचा पहिला भोंगा झाला. तो आवाज ऐकतांच एमी शॉ ही संसारी बाई इतकी दचकली आणि भेदरून गेली, की हातांतली वस्तू टाकून ती आसऱ्याकडे पळत सुटली. पण काळोखामुळे वाटेंतल्या एका भिंतीवर तिचं डोकं आपटलं. ती जी बशुद्ध पडली ती उठलीच नाही. एकही बाँब न पडतां बाँबहल्ल्यांतला हा पहिला मृत्यू त्या रात्रीं झाला.

पण असं एखादं उदाहरण सोडलं तर सर्वांनीं शांतपणें या भोंग्याचें स्वागत केलें. तसा लहानसा भीतीचा गोळा प्रत्येकाचे पोटांत क्षणभर उठला. तो मानवस्वभावच आहे. पण दुसऱ्या क्षणास चेहरे शांत झाले. कुणी आसऱ्याकडे धावले, कुणी आपलं काम करीत राहिले.

पहिला बाँब अकरा वाजून दोन मिनिटांनी पडला. लॉयन हॉटेल-समोरील खाटकाचं दुकान जळूं लागलं. हॉटेलचा मालक बार्करनं पडत्या बाँबची कर्कश किंकाळी ऐकली. कुणीतरी मोठ्यानं ओरडलं, 'पडा–खालीं पडा!' हातांतले पिण्याचे काचेचे ग्लास लोकांनी दूर फेकलें. आणि जो तो जमिनीवर उपडा झाला. पण बार्करची बायको बहिरी होती. कामाच्या नादांत ती तशीच उभी राहिली. लाऊडस्पीकरवर लावलेली रेकार्ड तशीच वाजत होती–'इंग्लंड रहाणारच रहाणार'

दुसऱ्या क्षणास सगळं हॉटेल उठून कामास लागलं. सर्व गिऱ्हाइकं खाटकाच्या दुकानाकडे धावलीं. कुणी हातपंप उचलला. कुणी बादल्या उचलल्या. एकजण ओरडला, 'मूर्ख! बादलींत पाणी कुठाय्!'

या क्षणीं नदीच्या काठानं साडेआठ मैलावर बाँब पडत होते. बहुतेक सगळे आगलावे बाँब होते. बाँब गटारांत पडत होते, छपरांवर पडत होते. गुदामांवर आणि लाकडाच्या वखारींवर पडत होते. पडतांच ते सुरसुर आवाज करीत निळ्या पांढऱ्या ज्वाला ओकीत जळूं लागत.

—६—

असल्या बाँबना सरावलेले लोकहि चहूकडे पसरत चाललेल्या आगी पाहून हताश झाले. इतक्या प्रचंड प्रमाणावर आजपर्यंत इतके आगलावे बाँब कधीच पडले नव्हते.

एखाद्याच तुरळक नागरिकाला या भयंकर आघाताची आधी भावना आली. सैनिक आर्थर छोट्या रजेवर होता. तो बायकोला म्हणाला, 'हा पौर्णिमेचा हल्ला आहे. पळ' त्यानं सगळया माणसांना आसऱ्यांत पोहोचवलं.

नकळत कांहीजण सावध राहिले. एडवर्ड ग्लेडींगने आपलें ओळखपत्र आठवणीनं खिशांत घातलें नि तो बाहेर पडला. कांही वाईट झालंच तर आपल्या प्रेताची ओळख तरी पटेल! मेजर अॅटकिन्सनने आपले नकली दात काढून ठेवले. बाँब पडलाच तर काय होईल कुणास ठाऊक!

पहाटसारखा उजेड लंडनवर होता, इतकं स्वच्छ चांदणं पडलं होतं. दोन वॉर्डन मेणबत्तीच्या कारखान्यासमोर उभे होते. ही फॅक्टरी पेटली तर एका मोठ्या मेणबत्तीसारखी पेटेल असं त्यांच्या मनांत आलं.

लंडनचा पूर्व भाग आता चांगलाच जळूं लागला होता. कुठे ज्वाला आकाशाशी भिडत होत्या. कुठून तरी प्रकाशझोत आकाशाकडे गेले आणि हल्ला करणाऱ्या जर्मन विमानांवर गोळ्या सुरू झाल्या. बातमीदार रेनॉल्डसने या विमानांची कान बधीर करणारी घरघर ऐकली. तो उद्गारला – आहेत तरी किती विमानं!

लंडनच्या पूर्वभागांत आगी लागल्या. म्हणतां म्हणतां घरं बेचिराख होत होतीं. बोटींचे धक्के, रेल्वेची साईडींग आणि शेडस्, कांही वांचत नव्हतं. आगप्रतिबंध अधिकारी जॉन्सनला कळेना या आगी विझवण्यास एवढे बंब कसे मिळणार?

वाटरलू शेजारच्या फॅक्टरीच्या गच्चीवर इतके बाँब पडले की, सेक्टनला ते कसे विझवावे तें कळेना. बारा माणसं जिथं अपुरीं पडलीं असतीं तिथं फक्त एक वार्डन त्याच्याजवळ होता. पण एकदां पडायचे ते बाँब पडून गेल्यावर उसंत मिळेल हीच आशा त्याला होती. वरिष्ठानं तेवढ्यांत त्याला फोन केला—'झेपताय ना तुला?' सेक्टननं हो म्हटलं. वरिष्ठानं आणखी बातमी दिली की, 'यॉर्करोड व वाटर्लूरोड यांच्या खालचे पाण्याचे नळ फुटले आहेत. बंबांना थेंबभर पाणी मिळण्याची पंचाईत आली आहे.'

—७—

उद्या नवरदेव व्हायला निघालेला थॉमस सिडेन बसमधून येत होता. यक्षकिन्नरांच्या प्रदेशासारखा देखावा त्याला दिसत होता. पांढऱ्या ठिणग्या आकाशांत उडत होत्या. आकाश पेटलं होतं.बोटींच्या धक्क्याच्या विभागांत शेकडो आगी धडधडत होत्या—छे छे! लंडन खलास होणार. मग त्याच्या मनांत आलं–आता बेट्रीसचं नि आपलं लग्न कुठचं!

रात्रीचे साडेअकरा वाजले. बाँब पडायला लागून फक्त अर्धा तास झाला. फायरब्रिग्रेड अधिकारी मे काळजींत पडला होता. इतक्या आगी विझविण्यास बंब कुठून आणायचे! कांही ठिकाणीं माणसं रजेवर होतीं. कांही ठिकाणचे बंब नादुरुस्त होते. लंडनबाहेरच्या बंबवाल्यांना बोलवावें तर मेयरच्या परवानगीवांचून ते हलायला तयार नव्हते. लहानसहान नियमांकडे बोट दाखवून काम खोळंबत होतं. क्षण जात होते.

इंग्लंडमधे सोळाशे आगीचीं स्टेशनें होतीं. पण त्या प्रत्येकाचे पगार आणि पोशाखहि वेगळे होते. हा एक मोठा असंतोष त्या लोकांत होता. सर्वांचे पगार सारखे व्हावे असा कायदा पास झाला होता. पण तो अंमलांत आल्याशिवाय उपयोग नव्हता. त्यामुळं बाहेरचे बंबवाले वाटेल त्या गाढव सबबी सांगून येण्याचें टाळीत होते. एकानं कळवलं आमच्याजवळ बंबच नाहीत. त्याला मेनं त्याच्याजवळ किती बंब आहेत ही माहिती दिली. दुसरा म्हणाला 'बंब आम्हांलाच हवे आहेत'. शेवटी मे चिडला नि ओरडला. तुमच्यापेक्षा आम्ही घोर संकटांत आहोत. आज तुम्ही मदत केलीत तरच आमची मदत तुम्हाला येईल.

—८—

म्युझिअमवर बाँब पडतांच म्युझिअमचा मुख्य बाहेर धावत आला आणि बंबवाल्यांना ओढूं लागला. पण आग इतक्या लौकर भडकली की, बंबांतले फवारे चुळा टाकाव्या तसे वाटूं लागले.

सेव्हॉयच्या छपरावर रेनॉल्डस उभा होता. आगी पहातां पहातां त्याची खात्री झाली, लंडन जळून खाक होणार. दुसऱ्या एका इमारतीवरून कॅप्टन मॉलीसनहि ही भयाण आग पहात होता. तो उद्गारला, गोअरिंगचं डोकं फिरलय आज!

ज्वाळा नि धूर यांच्यामुळं जर्मन वैमानिकांनाहि खालचं दिसेनासं झालं होतं. एका विमानांतल्या वैमानिकास सहकाऱ्यानं विचारलं; आपण कुठे आहोंत? तो म्हणाला 'वॅंडसवर्थवर'. सहकारी कांहींसं हसून म्हणाला, इथेच माझा जन्म झाला. इथं माझे वडील बँकेत होते.

बारा वाजेपर्यंत पंचाहत्तर बंबखान्यांचे परस्परांशी संबंध तुटले. कुठे मदत हवी, कुठे आगी भडकत आहेत हें कळवणं अशक्य झालं. कांही रेल्वे स्टेशनें बाँबने उध्वस्त झाली. एका स्टेशनाच्या छपराच्या काचा उडून अर्ध्या मैलावर पावसासारख्या पडल्या.

लंडन शहर खरं कसं आहे हें पडदा बाजूला करावा तसं दिसूं लागलं. लहान लहान खेडीं एकत्र होऊन बनलेलं हें शहर; टेलिफोन तारा तुटल्यानं रेल्वे उद्ध्वस्त झाल्यानं, वीज गेल्यानं पुन्हा लहान लहान खेड्यांत विभागलं गेलं.

मध्यरात्रीं शहरांतील मुख्य पाण्याचा नळ ठिकठिकाणीं फुटूं लागला. शहरांतून जाणाऱ्या दोन कालव्यांतून आणखी एक नळ संकटकाळासाठी ठेवला होता. तो तर साफ उडाला होता. थेम्स नदीचें पाणी पार खाली गेलें होतें. 'अशा परिस्थितींत क्षणाक्षणाला भडकणाऱ्या या वणव्याला आवरणं शक्तीबाहेरचं होतं.

—९—

मध्यरात्रीनंतरहि शहरांतल्या सर्वच लोकांना हें सर्वांचं संकट आहे ही भावना आली नव्हती. अजून दुसरा भाग जळत होता. आपला नव्हे !

पाऊण वाजतां रिचफिल्ड रस्त्यावर बाँबचा पाऊस पडला. बार्लो जेव्हा तिथं पोहोचला तेव्हा रस्त्याला समरांगणाचं रूप आलं होतं. दोन्ही बाजच्या इमारती धडाधडा जळत होत्या किंवा पडल्या होत्या. जिकडून तिकडून किंचाळ्या आणि रडणं ऐकूं येत होतं

फक्त वीस मिनिटांत सहाय्यक दलें आणि बंबवाले तिथं धाऊन आले.

त्याच भागांतील पॉपलर इस्पितळावर तेव्हाच बाँब पडला. त्या बाँबनें इस्पितळाचे बरोबर दोन तुकडे केले. बाँब छपरांतून थेट तळमजल्यावर आला. वरच्या तक्तपोशीच्या राशीखाली कितीक पेशंट गाडले गेले. तेथल्या एका नर्सने अठरा लोकांना बाहेर काढून आणलं.

इतक्या आगी भराभर लागत होत्या की, त्यांतून कुणावर पाणी मारावयाचं हें बंबवाल्यानाच ठरवावं लागे. इस्पितळांसारख्या इमारतींकडे ते आधी वळत. पण ज्याला त्याला आपलं घर महत्त्वाचं वाटत असल्यानं बंबवाले आले नाहीत की, ते चिडत, रिपोर्ट करूं म्हणून दम देत.

—१०—

अलेक्झांड्रा हॉटेलवर बाँब पडला तेव्हा आंत प्रथम कुणालाच कळलं नाही. फक्त डोक्यावरून डेक्कनक्वीन जावी असा एक आवाज आला. दिवे मोठे होऊन गेले. कुणी बाई किंचाळली–जॉर्ज ! कुठं आहेस तूं ?

मग जो हाहाःकार उडाला तो वर्णन करणं कठीण. दोन मोठाले संगमरवरी खांब काडीसारखे तुटले. वरच्या मजल्यावरचा एक माणूस उतरण्यासाठी जिन्यापाशी आला नि त्याच्या ध्यानांत आलं जिनाच नाही. चुना, धूळ, लाकडाच्या चिरफाळ्या सर्वत्र उडाल्या.

मग सर्वत्र एकदम शांत झालं. आणि त्या शांततेला फोडीत तळघरांतल्या आसऱ्यांतून एक भयाण किंकाळी आली.

अलेक्झांड्राची अवस्था पाहून वार्डन जॅक स्मिथ धावत अधिकाऱ्याकडे आला. कसाबसा श्वास घेत तो म्हणाला, 'अलेक्झांड्रा !'

अधिकारी मिन्स धावत सुटला. अलेक्झांड्रावरची आपत्ती कळून स्ट्रेचर्स, सहाय्यकदल आणि अँब्युलन्स यायला फक्त वीस मिनिटें लागलीं. तोंपर्यंत मीन्सने सगळी जबाबदारी उचलली.

जॅक्सन यावेळीं पहाणी करण्यास बाहेर पडला. आगीचे आणि नाशाचे देखावे पाहून त्याचें मन हबकलेंच. परिस्थिति कल्पनेबाहेर आणीबाणीची होती. लंडनमधील बाराशे सत्तर बंब कामावर होते. ते अगदी अपुरे होते. लंडनबाहेरून आलेले बाराशें बेचाळीस बंब कामावर आणण्याचा त्यानं त्याक्षणीं हुकूम सोडला.

— ११ —

जिल्हाधिकारी कीरेगला आजच्या फायरब्रिगेडमधील दोष खटकत होता. लढाईमुळे फायरब्रिगेडमध्ये जी नवी भरती झाली होती ते सगळे लोक नवखे होते. मूळ ब्रिगेडमधील लोक तावून सुलाखून निघालेले, धैर्यवान असे होते.त्यामुळे एखादा अनुभवी जुना माणूस डोक्यावर असला तरच नवीन माणसांकडून काम होई. त्यांना अनुभव नव्हता. जरा आग दिसली की, त्यांची धांदल उडे. पायानं जी आग विझेल त्यावर पीपभर पाणी ओतीत. संपूर्ण जळलेल्या आगीवर ते पाणी ओतीत राहात. किंवा जी आग विझणं अशक्य त्यावर बोटभर धार सोडीत बसत. जिथे नळ फुटलेले होते तिथे नदीवरून मोटारींतून पाणी आणून आणून पाणी पुरवावें लागत होतें. तोहि एक मोठा खोळंबा होता.

आग विझवतांना केवळ पाण्याचाच प्रश्न नव्हता. घरें सोडून जातांना कितीएकांनीं कुलुपें लावलीं होतीं. घरांतलें सामान हलवण्यासाठी तीं फोडावीं लागत आणि वेळ मोडे. तोपर्यंन्त घरांतलं सामान हलवणं कठिण होऊन बसे,इतकी आग भडके आणि मग वार्डनही भडकत.

घरांवर, आगीवर नजर ठेवण्यास जे पहारे नेमले होते त्यांच्यापैकी कित्येक हजरच नव्हते. सोळा ते साठ वयांतील लोक या कामासाठी नोंदवले होते. पण त्यांच्या नियमांत इतका ढिलेपणा होता की, पंचाहत्तर टक्के लोक त्याचा फायदा घेऊन गैरहजर रहात. त्यामुळे घरांवर जेव्हा आज बाँब पडूं लागले तेव्हा ते ताबडतोब विझवण्याचें काम झालें नाही व आगी वाढल्या.

उलट कांही ठिकाणीं धैर्यहि प्रकट झालें. बलबलँडमधील बच्चांनी जळतीं छपरें हातपंपांनी विझवण्याचा यत्न केला. सेवटी बंबवाल्यांनी त्यांच्या हातून पंप काढून घेतले तेव्हा तीं पोरें आगीपासून दूर गेलीं. कांही आसऱ्यांतील कित्येक लोक आगलावा बाँब पडतांच एकजुटीनं बाहेर येऊन पायानं तुडवून बाँब विझवीत होते. त्यावेळीं ते गातहि होते. रस्त्यांत असा बाँब पडतांच कांही ठिकाणीं दारें उघडून एकमुखानं नागरिक बाहेर येत, बाँब विझवीत नि आंत जात. पण असे जबाबदारीने काम करणाऱ्या एका नागरिकामागे तीन नागरिक आरामांत पहात असत.

प्रत्यक्ष वकींगहॅम राजवाड्याचाहि हा प्रकार झाला. राजेसाहेब तिथं नव्हते. आणि जो पोलीस पहाऱ्यास होता तोहि कुलुपें लावून

बाहेर होता. बंबवाल्यांना आंतहि जातां येईना. शेवटी भिंतीवरून उड्या मारून ते आंत गेले.

जिथे कॉमन्सभा, लॉर्डांची सभा भरते त्या वेस्टमीनिस्टर हॉलला आग लागल्याचें कळतांच अधिकारी धावले. पण आधीच तिथे बंबवाले आले होते व पहारेकरी आंत जाऊं देत नव्हते म्हणून चिडले होते. कारण पार्लमेंटच्या गृहांत शिरण्याचा साध्या नागरिकांना अधिकार नाही असें पहारेकऱ्यांचें म्हणणें होतें. शेवटी योग्य अधिकारी गाठून किल्ल्या मिळवून बंबवाल्यांनी प्रवेश मिळवला. पण वेळ किती गेला!

—१२—

पहाटे दोन वाजतां शेकडो स्त्री–पुरुष–मुलें खलास झालीं होतीं आणि सकाळ होईपर्यंत आणखी शेकडो मरण्याचा संभव होता. जिथे पडलेल्या किंवा आगीच्या घरांत माणसं अडकलीं होतीं अशा दीडशें ठिकाणीं तर मदतीचें काम चालू होतें.

अलेक्झांड्रा हॉटलेच्या इमारतींत अडकलेल्यांना सोडवण्याची सुरुवात झाली होती. प्रथम तेथून जखमी नसलेल्यांना हलवून गर्दी कमी केली. त्यासाठी प्रसंगीं ॲंब्युलन्स गाड्याहि वापरल्या. साधारण जखमी होते त्यांना प्राथमिक उपचारासाठी धाडले.

वरच्या मजल्यांवर लोक अडकले होते. तसेच तळघरांतहि होते. जो भाग उभा होता तो इतका हळवा झाला होता की, चुकून मोक्याची वीट निघतांच भींती कोसळल्या असत्या.

वॉर्डन अधिकारी मील होता. आंत कोण कोण आहे हें त्यास ठाऊक नव्हतं. हॉटेल मालकाची ती चूक होती आणि नव्हतीहि. त्याचे रजिस्टर बुक पडझडीखाली गेलं होतं.

मीलनं पद्धतशीर सुरुवात केली. बाहेर एक टेबल टाकून तेथून सर्व हुकूम देण्याची जागा केली. स्टेजवरून आंतील एकेकाला आणूं लागतांच त्यानं प्रत्येकाचं नांव नि पत्ता घेण्यास आरंभ केला.

आल्बर्ट मॅरोटा हा एक स्टंट फील्म मधील नायक होता.त्याचा व्यवसाय आता उपयोगास आला. सहा सहकारी घेऊन त्यानं कामाला आरंभहि केला होता. मीलनं त्याला सर्व तऱ्हेनं मदत दिली.

वरच्या मजल्यावरचे लोक दोऱ्यांवरून खाली उतरवण्यास सुरवात झाली. जिने नव्हतेच. म्हणून काम फार धोक्याचं झालं होतं. त्याहिपेक्षा तळघरांतलं काम फार बिकट होतं. तेथे पडलेल्या पडझडींतून खोल असे कण्हण्याचे आवाज येत होते. मॅरोटा नि त्याचे मित्र यांनी फावड्यांनी नि हातांनी विटा, माती, चुना उपसण्यास आरंभ केला. मधूनच ते थांबत नि अडकलेलीं माणसं कुठं कण्हत आहेत याचा मागोसा घेत.

हॉटेलच्या मागच्या बाजूला वरच्या मजल्यावर पोलिस कॉन्स्टेबल ओक्स याच वेळीं नऊ इंच रुंदीच्या नि बारा फूट लांबीच्या फळीवर सर्कस करीत चालत होता. मजला पडला होता. पांच माणसं तक्तपोशीच्या उरलेल्या लहान भागावर उभी होतीं. त्या भागावर फळीचं एक टोक होतं. हें सगळंच कुटुंब केवळ नशिबानं वाचलं होतं. फळीच्याखाली पार तळमजल्यापर्यंत पंचेचाळीस फूट खोल दरीच झाली होती.

ओक्सने एकेकाला उचलून आणण्यास सुरुवात केली. नऊ इंच फळीवर तोल घेत तो येत असतां क्षणाक्षणाला खाली पडेल असं वाटत होतं. पांच माणसांत दोन बायका होत्या. एकीला तो उचलूं लागला तेव्हा तिचा पोषाख जरा बाजूला झाला. ती किंचाळूं लागतांच दुसऱ्या बाईनं बजावलं, आपण जीव घेऊन बाहेर येत आहोंत हेंच जास्त समज !

मुलं-बायका सर्व थरथर कापत असतां ओक्सने पलीकडे आणलीं. शेवटी त्यांचा बाप राहिला. त्याच्या हातांत एक बॅग होती. ती सोडून तो येईना. बॅग घेऊन फळीवरून जाणं कठिण होतं. शेवटी ओक्सनं बॅगसाठी परत जाण्याचं वचन दिलं. या माणसाच्या हट्टानं ओक्स संतापला होता. त्याला तो वाटेल तें बोलला.

सर्व सुरक्षित आल्यावर बॅगवाल्या पुरुषानं ओक्सचें नांव–नंबर विचारला. जरा चिडूनच त्यानं म्हटलं—माझं नांव काय करायचं तुम्हाला ! बरं घ्या ! मी शिव्या दिल्या एवढंच ना ! करा रिपोर्ट.

ओक्सची खात्री होती की, आपण दिलेल्या शिव्याबद्दल तो तक्रार करणार. भानगड आली !

पण या सर्वांचा शेवट पुढे गोड झाला. या कुटुंबाला वांचवण्यांत दाखवलेल्या धैर्यामुळेच ओक्सला बहुमानाचें जॉर्ज मेडल मिळालें. त्यासाठीच त्यानं ओक्सचं नांव–नंबर टिपून घेतला होता.

—१३—

वार्डन बार्लोची अपघाताची भीति एका प्रसंगानं विरघळली. तो आणि ॲनी हील दोघे रपेट करीत असतां ज्यूंच्या सिनेगॉग देवळावर त्यानं आग पाहिली. दोघें तिकडे पळतच सुटलीं. सिनेगॉगमधील गॅस बंद करायचा राहिला होता आणि तो पेट घेत होता. सिनेगॉगमध्ये असणाऱ्यांची संपूर्ण नोंद बार्लोजवळ होती. आंत चौदा लोक होते.

रस्त्याच्या टोकाला एक बाई वेडी होऊन हसत होती. बार्लोने ॲनीला तिला प्रथम इस्पितळांत नेण्यास सांगितलें. या वेळीं एक विकृत माणूस दहांना विकृत करतो हें त्याला ठाऊक होतं.

सिनेगॉगच्या तळघरांतल्या माणसांना आगीचं कळतांच ती गर्दी करून बाहेर येत चेंगरूं लागली. तेवढ्यांत त्यांतला निग्रो उभा राहून म्हणाला, 'वेड्यांनो! मी घाबरलोंय् का बघा!' त्याच्या या वाक्यानं इतरांचा थरकाप शांत झाला. निग्रो गाऊं लागला. झुंबड थांबली.

तळघरांतून बाहेर येणारा जिना पडझडीनं तुंबला होता. डोक्यावरची टीनची हॅट काढून बार्लो घमेल्यासारखी माती उपसूं लागला. कांही वेळानं माणूस जाईल एवढं भोकसं तिथं पडलं.

बार्लोनं आंत पाहिलं. एक बाईहि आंत होती. वरच्या आगीच्या उष्णतेनं तळघरांत भट्टीच होऊं लागली होती. श्वास घेण्यासाठी आंतील लोक धडपडत होते. बार्लोनं प्रथम तीन पुरुषांना बाहेर काढलं. मग तो स्वतः बाईला काढण्यास आंत गेला. तो आंत शिरतांच बाई घाबरून मागे होऊं लागली. तिला धरण्यास समजावीत बार्लो पुढे झाला नि ती बेशुद्ध पडली.

तिला हातावर घेऊन तो परत फिरला. तळघराला मागे एक जिना होता तिकडे तो वळला. तेवढ्यांत वरचा अर्धा भाग त्याच्यावर कोसळला. मणमण ओझं खांद्यावर पडलेलं त्याला जाणवलं. बाईला त्यानं आणखी घट्ट पकडून ठेवलं.

बार्लोच्या अंगावर खांब पडले तें एका वार्डनने पाहिलें. तो धावतच मदत आणायला गेला. बार्लोच्या मैत्रिणीला तें कळतांच ती बेशुद्ध पडली.

—१४—

**या** रात्रीचा विमानहल्ला इतका दारुण होता की, तो कधी थांबेल असें कुणालाच वाटेना. एकामागून एक रेल्वेस्टेशनं निकामीं झालीं. जमिनीखालची एकवीस मैल रेल्वे उध्वस्त झाली. सहा टेलिफोन एक्स्चेंजिस् उधळून गेले. वीज बंद पडली. जगांतली गॅसची सर्वांत मोठी कंपनी अक्षरशः आकाशांत फेकली गेली. हजारो रस्ते इमारती पडून अडले गेले.

पण जसजसा विमानहल्ल्याचा जोर वाढत होता तसतसा लंडनच्या नागरिकांचा चेवही वाढत होता. या सर्व मोडींतून कांहीतरी वांचवायचेंच हा ज्याचा त्याचा निश्चय दिसला. आग लागलेल्या हॉटेलच्या एका मालकानं लोण्याचा भलामोठा गोळा रस्त्यावर आणून ठेवला. अंगावर पोषाखहि नसलेला एक माणूस दोन हॅंगर्स घेऊन बाहेर पडला.

कांहींनी या प्रसंगाच्या आठवणी गोळा केल्या. एका माणसानं बॉंबवरील अक्षरं एका दगडावर उमटलीं होतीं तो दगड काढण्याचा यत्न केला. बागेच्या भितींवर पॅरेशूट लोंबत होते त्याचे हिरवे रेशीमच एक मुलगी कापून घेत होती.

इस्पितळांत दुसऱ्याचे जीव वांचवण्याची पराकाष्ठा चालली होती. रक्त देण्याचं काम तीस-तीस सतत चालू होतं. बॅटरीच्या उजेडावर सर्जन्स ऑपरेशन करीत होते.

दोननंतर पुढे कांही चांगल्या बातम्या आल्या. जर्मनांचीं दहा बॉंबर विमानें पाडलीं, सहा नादुरुस्त केलीं. पन्नास विमानें हल्ल्यास तोंड देण्यास वर उडत होतीं.

याच सुमारास रैसर नांवाचा एक जर्मन वैमानिक विमान बिघडून ससेक्स भागांत उतरला. तेथून त्यानं लंडनचा भयाण देखावा पाहातांच त्याला कांहीसा पश्चात्ताप झाला–अरे रे ! मींच या आगी लावल्या !

रैसरची पाठ दुखावली होती. अंधारांत तो पडला होता. जेव्हा पोलीस आले तेव्हा त्याला भीति वाटली. पोलिसांनी त्याला उचलून तंबूत आणला, पण कुणी शब्द उच्चारला नाही. रैसर आणखी अस्वस्थ झाला. तंबूतूनहि लंडनची आग त्याला दिसत होती. हे लोक काय करणार मला ?. लंडन बेचिराख करणाऱ्या अनेकांत मीहि होतों.

पण एकदम एका पोलिसानं त्याला सिगारेट दिली. त्यानं पेटवली व तुटक आभार मानले. दुसऱ्या शिपायानं आत जाऊन ब्लॅंकेट आणून दिली.

मग तिथे सिगारेट ओढीत बसले. कांही वेळानं एक लॉरी आली नि पुन्हा शब्द न बोलतां शिपायानं त्याला लॉरींत ठेवला नि लॉरी चालू झाली.

जोंपर्यंत हल्ल्याचा जोर होता तोंपर्यन्त ब्रिटिश नागरिक संतापला नाही. व्देष किंवा तिटकारा या क्षुद्र भावनांपलीकडे त्या प्रसंगांत लोक गेले होते. हा जो कोप त्यांच्यावर पाखडला गेला होता त्याला जणू जर्मनांचा उपायहि नव्हता. मनुष्यस्वभावाचा हा दोष होता.

आघात होत होते पण तिकडे लक्षच नव्हतं कुणाच. आपल्या दंतवैद्याचा दवाखाना जळतांना पाहून एकाच्या मनांत एवढंच आलं, बरं झालं ! उद्या दातांसाठी जायला नको.

—१५—

**आ**पण किती केलं तरी उपयोग नाही हें बंबवाल्यांना कळूनहि ते काम करीत होते. जो तो काम करीत होता. एखादा बंब, पाणी, किंवा आणखी कांही वेळेवर आलं नाही तर कुणी आता कुरकुरत नव्हतं; फक्त उद्योग चालू होता.

शंभर चौरस मैलांत आगीमागून आग आवाक्याबाहेर चालली होती. बंबवाल्यांना फक्त आग न पसरवण्याचं काम राहिलं होतं. या सर्व धुमाळींत माणसांतलं वीर्य जागं होतं. आपला जीव धोक्यांत घालून कित्येक काम करीत होते.

तसं पाहिलं तर मरण कुणालाच नको होतं. पण एखाद्याला बॉंबची झळ लागली नसेल तर त्याला मात्र हळहळ वाटत होती. बेफिकीरपणें लोक फुटपाथवरून मुद्दाम फिरत आणि जवळ बॉंब पडला म्हणजेच त्यांचं समाधान होई.

मार्गारिटा स्टीव्हा ज्या भागांत होती तिथ बॉंब पडतील असं तिलाहि वाटत नव्हतं. वुइंडसर नि ती गप्पा मारीत असतां, वुइंडसरनं रात्रीं सायकल मारीत त्या धुमाकुळींत जावं हें तिला पसंत नव्हतं. आत्याला आवडलं नसतं हें ठाऊक असूनहि वुइंडसरला तिनं तिथं झोपायला सांगितलं. लग्न व्हावयाच्या आधी असं एका घरांत झोपणं अप्रशस्त होतं. पण प्रसंगच तसा होता. तिनं आपली खोली त्याला दिली नि आपण आत्याच्या खोलींत झोपली.

वुइंडसरने न बोलतां मार्गारिटाच्या खोलींत जाऊन अंग पलंगावर फेकलं. तो इतका थकलेला होता की, दुसऱ्या क्षणीं त्याला झोप लागली.

पडल्या पडल्या मार्गारिटाच्या मनांत मात्र विचारांचं काहूर होतं. सहामहिने त्यांचं प्रेमप्रकरण चालू होतं. चुटपुटत्या भेटी होत होत्या. आतं पत्रं येत जात होतीं. पण किती दिवस हें चालायचं ! किती दुष्ट आहे ही लढाई ! संध्याकाळीं ज्या गप्पा झाल्या त्यांत त्यांनी ठरवलं होतं, की कांही होवो, पुढच्या रजेंत लग्न उरकून घ्यायचंच. तें आठवून मार्गारिटाला तेवढंच समाधान वाटलं.

खोलींत गुडूप अंधार होता. आणि एकाएकीं कसलाहि आवाज न होता सगळं घर तळापासून छपरापर्यंत हललं. मार्गारिटा एकदम उभी राहिली. जमीन थरथरली. बिछान्याला मोठा धक्का बसला. मार्गारिटानं अंधळेपणानं टेबल ओढलं नि त्याखाली ती शिरली अन् शिरली तो छप्पर खाली आलं. ती चहुबाजूनं पुरली गेली.

आश्चर्य हें की, ती यत्किंचितहि घाबरली नाही. प्रथम तिनं हळंच डोकं हलवण्याचा यत्न केला. पण तें हलेना तेव्हा तिला कांहीसा धक्काच बसला. तिनं मग बोटं हलवण्याचा यत्न केला तोहि फसला. अंधारांत कांही दिसत नव्हतं. पण अंगावर दाही दिशानं वजन पडतंय हें तिला जाणवत होतं. हवा कोरडी आणि कोंदट होत चालली होती. त्या परिस्थितींतहि तिला केव्हातरी वाचलेलेलं आठवलं की, जास्त धडपडीनं जास्त प्राणवायू खर्च होतो. ती तशीच निश्चल पडून राहिली.

जरा वेळानं तिनं दोन-तीन हाका मारल्या. पण तिचा आवाज तिलाच परत ऐकूं आला. मग तिच्या मनांत आलं की, कदाचित् वुइंडसर कांहीतरी करून स्वत:ची सुटका करील व आपल्याला सोडवायला येईल. पण कदाचित् या विटाखाली तो बेशुद्धहि झाला असेल.

मार्गारिटा ही पोरकी पोर होती. लहानपणापासून ती मावशीकडे आणि मग आत्याकडे वाढली. दुसऱ्याच्या मनाप्रमाणे वागण्याची आयुष्यभर संवय झाल्याने यावेळीहि ती आपल्यावद्दल विचार न करता दुसऱ्यांवद्दलच हळहळत होती. आपण कांही फार वेळ जगणार नाही हें ठरवून वुइंडसरवद्दलच तिचं मन खाऊं लागलं. त्याला आपण थांबवून घेतला नसतां तर तो या आपत्तींत सांपडला नसता.

—१६—

**त्या** रात्रीं भीतीनं वेगवेगळं रूप घेतलं होतं. आपल्या मोटारींतून नवऱ्यासह जात असतां डॅलीबाईला भयानं फेफरं येण्याची वेळ आली होती. तिची भीति एवढीच की, बॉंबनं पाडलेल्या खड्ड्यांत मोटार पडली तर काय होईल ? मार्गारिटासारखा प्रसंग तिच्यावर आला असतां तर पहिली वीट अंगावर पडतांच तिनं भयानं प्राण सोडला असता.

या भयाण प्रसंगांत कांहीचीं डोकीं ताळ्यावर राहिलीं तर काहीचीं साफ विथरलीं. जिथं बसडेपो होता तिथं आगीनं कल्लोळ केला होता. दोन बॉंब पडून चाळीस घरं पडलीं होतीं, सतरा माणमं मेलीं होतीं. सत्तर माणसं जखमी झालीं होतीं. रहाणारे लोक रस्त्यावर उघड्या पायानं धावत होते. रस्त्यांवर मोटारीच्या काचांचा खच होता. पाय कापत होते आणि वितळलेला गरम रंग वहात होता. पाय भाजत होते. पण पर्वा नव्हती. वस गॅरेजखाली ऐंशी हजार गॅलन पेट्रोलचा साठा होता. त्याचा भडका उडाला तर काय होईल हेंच सर्वांच्या भयाचं कारण होतं.

डॅलीची मोटार तिथं आल्यावर तर तिचे हातपाय कापू लागले. आणि आपल्या घावरटपणाच्या लाजेनंहि तिला मेल्यासारखं झालं. भीति लपवण्याचा तिनं आटोकाट प्रयत्न चालवला.

तेवढ्यांत एक माणूस पेटत्या गॅरेजमधून धडपडत वाहेर आला नि तिच्या मोटारीपासून कांही हातावर बेशुद्ध पडला. डॅली मोटारींतून धावत उतरली आणि त्याला उचलण्याचा तिने प्रयत्न केला. तो डोक्यापासून पायापर्यंत थरथर कापत होता. मानसिक धक्क्याचा तो परिणाम होता. पण डॅलीला वाटलं, त्याच्या मेंदूत एकादी काच घुसली असेल. मदतीसाठी ती इकडे तिकडे पाहूं लागली. तिला मनांत मात्र वाटत होतं हा माणूस मरणार. पण कोणतीहि स्त्री पुरुषाला मरणाच्या दाराशी टाकून जाणार नाही. डॅलीनं त्याचं डोकं मांडीवर घेतलं. मग लहान मुलाप्रमाणें ती त्याला मांडीनं झोके देत थोपटू लागली. जणू कांही ही लढाई-तिचं मागचं आयुष्य या क्षणासाठीच राहिलं होतं.

तेवढ्यांत पुन्हा विमानहल्ला आला. डोक्यावर विमानं वाजूं लागलीं. पुन्हा डॅली भयानं थरथरूं लागली पण या वेळस तिचं भय स्वत:चंच केवळ नव्हतं. त्या माणसाचं डोकं कुशींत घेऊन तिनं आपलं शरीर त्याच्यावर धरलं आणि ती करुणा भाकूं लागली—'देवा आणखी बॉम्ब पडूं देऊं नको !—' मधूनच लहान मुलीला म्हणावं तशी ती त्या माणसाला सांगू लागली—'अरे ! ही आपलीच विमानं आहेत ! भिऊं नको ! '

मग तिनं त्याच्या तोंडाकडे पाहिलं. त्या तोंडावर आश्चर्य आणि समाधान दिसत होतं. जणू खूप झोप घेऊन पाळण्यांतलं मूल जागं झालं होतं नि नवलानं जगाकडे पहात होतं.

—१७—

**श**त्रूचीं शेवटचीं विमानें वरून जाऊं लागलीं तेव्हा सर्व लंडनभर विचित्र शांतता पसरली. मरणांतून सुटका नाही हें कळून स्थितप्रज्ञपणें जणू सारे निश्चल बसले होते. कुठे थट्टाहि होत होत्या—'काय रे ! मृत्युपत्र केलंस की, नाही ?—

' उद्याचा सूर्य आपण बघत नाही. '

सगळीकडे विरक्तीचं वातावरण होतं. पहाटे साडेचारला एका दारूच्या दुकानावर पाटी लागली—' जगाल तर बीर प्याल '

आपलं घर खाक झालेलं पाहून एकजण तळघराच्या आसऱ्यांत येऊन बायकोला सांगूं लागला;

" घराची राख झाली "

बायको म्हणाली,

" मस्करी करूं नका "

खरंच जळलं घर "

बायकोनं पाठ फिरविली नि डोळं मिटत म्हणाली;

" भलत्या वेळीं तुम्हाला थट्टा सुचतात. मला झोपूं द्या "

यावेळीं त्या नवऱ्याला बायकोचा जो राग आला असेल तो कुणाला कधी आला नसेल.

अशा बायकांप्रमाणेच बिचाऱ्या अर्भकांनाहि दु:ख नव्हतं तीन वर्षांचं एक बालक सर्व बॉंबहल्ल्यांत पाळण्यांत शांत झोपलं होतं.

विटा आणि वासे यांखाली मार्गारिटा पुरली गेली होती. तिला फक्त वीस मिनिटांत मदत आली. पण ही वीस मिनिटें मार्गारिटाला वीस तास वाटले. वीस मिनिटांत आपली सुटका झाली हें तिला नंतर पटेना.

दडपलेल्या अंधारांत बाहेरचं सगळं जग मार्गारेटच्या दृष्टीनं संपलं होतं. एक अपूर्व शांतता. आंतबाहेर भरली होती

तेवढ्यांत खोकण्याचे आवाज येऊं लागले. मार्गारिटानं जोराची किंकाळी फोडली. कोणीतरी विचारलं,

" कुठं आहेस तूं ? "

मार्गारिटा ओरडली,—

" इथं ! —"

माणसांचे आवाज हळूहळू जवळ येऊं लागले. तिचं डोकं नि खांदे मोकळे झाले. एका माणसाचा पुढं केलेला हात तिनं घट्ट धरला नि आवेगानं म्हणाली,

" मला सोडूं नका ! "

युगं वाटतील असे क्षण गेले. तिच्या शरिरावरचं एकेक ओझं निघूं लागलं. इतका वेळ धरलेला धीर खचूं लागला. तेवढ्यांत तिच्या उघड्या पायाकडे पाहून एकजण म्हणाला,—

" काय सुंदर पाय आहे ! "

आपल्या सौंदर्याच्या या कौतुकानंच पुढील अर्धा तास तिचं डोकं ताळ्यावर राहिलं. तिला बाहेर काढीपर्यन्त अर्धा तास लागला. मग एका रगांत गुंडाळून त्यांनी तिला मोटारकडे नेलं.

जगांत तिचं कांही म्हणून राहिलं नव्हतं, आणि आपल्याला नेण्या-साठी सुंदर टूरिंग पाहून ती म्हणाली— " माझ्यासाठी खास गाडी ? "

एकानं सांगितलं,—

" अॅम्बुलन्स मोकळ्या नाहीत. "

मोटार सुरू झाली आणि पन्नास पावलावर पंक्चर झाली. तिला हसावं की, रडावं हें कळेना.

इस्पितळांत येतांच तिला एकदम् वुइंडसरहि आंत अडकलाय् हें आठवलं. कुणी तरी तिला सांगितलं की, शोध चालू आहे.

—१८—

याप्रसंगीं कल्पना नव्हती अशीं माणसं धीट झालीं आणि जीं धीट होतीं त्यांनी वीरकर्में करून दाखवलीं. - फील्डच्या मेणबत्तीच्या कारखान्यावर बाँब पडला तेव्हा सगळी इमारत मेणबत्तीसारखी जळूं लागली. थोड्याच वेळांत दुसरा बाँब पडून इमारतीचा एक भागहि कोसळला. तळघरांत, तीस बायकामुलं अडकलीं.

तोंडाशी फॅक्टरीच्या लॉरीज् उभ्या होत्या. पडक्या इमारतींतून वितळलेलं मेण उकळत, सळसळत खाली पडत होतं. पण वार्डन सेक्टन त्यामधून घुसला नि तळघरांतील माणसांची हाताला हात धरून साखळी धरून बाहेर घेऊन आला.

या वेळेला एक चमत्कारच घडला. बाहेर यत्किंचित्‌हि वारा नसतां तळघराच्या तोंडाशी जळणाऱ्या मेणाच्या ज्वाळा बाजूला फाकल्या आणि सर्वांना बाहेर येण्यास वाट मिळाली.

पहाटे हवा अधिक थंड झाली आणि धुरानं भरलेली हवा नाकाला चांगली झोंबूं लागली. लोक झोकांडे खात, अतिश्रमानं गळूनहि कामें करीत होते. कितीएक तर उभ्यानंच खात होतें नि झोप घेत होते. कितीकानी अंगावरचा कामावरचा पोषाख कांही दिवसांत उतरला नव्हता. हा ताण पडल्यानं अधून मधून चिडखोरपणा येत चालला होता. कुणीतरी लहानशा कारणापायी उसळतांना दिसे.

> 'लंडन ती मृत्युंजयनगरी' या अनुवादाच्या लेखकाचें नांव चूकून **दि. बा. मोकशी** असें छापलें गेलें आहे. तें **दि. बा. मोकाशी** असें वाचावें.

थकव्यानं उभं राहणंहि कांहीना कठिण झालं. वार्डन हॅरी झोपेनं नि थकव्यानं इतका खलास झाला की, समोरच्या एका जळक्या खोक्यावरच पडला. त्याच्या दोस्तांनी त्याला बाहेर ओढलं.

कित्येकांना दहा मे हा दिवस अपशकुनी वाटला. त्यांच्या आयु-ष्यांतील दहा मेला नेहमी कांही तरी अशुभ घडलं होतं.

बार्लो इतका थकला होता की, 'झोप जगाचं राज्य' असं कुणी विचारलं असतं तर त्यानं झोपच घेतली असती. आपण आपली भीति जिंकली हें तर त्याला कळलंच नाही. पण आपली सहकारीण स्लोएन हिचीहि आठवण त्याला आली नाही.

घरांत एक माणूस असेपर्यंत वार्डनचें कर्तव्य संपत नाही—हा त्याचा खाक्या असल्यानं, पुन्हा पुन्हा तो आगींत परतत होता नि उरलं सुरलं माणूस धुरांतून ज्वाळांतून बाहेर आणीत होता. अलेक्झांड्रा हॉटेलचं काम आटपल्यावर तो ज्यूंच्या मंदिराकडे वळला. तेथे चार वेळां तो भर आगींत घुसला. पाचव्यांदा दैव उलटलं आणि तळघराची तक्त-पोशी त्याच्या अंगावर कोसळली.

बार्लो पुरला गेला ही बातमी सर्व वार्डन लोकांत पसरली. कोस-ळलेलं तळघर उपसण्यास सुरवात झाली. पण त्याची बार्लोला दाद नव्हती. त्यानं आपल्या हॅटनं विटा-गदळ बाजूला केलं. आंत अडकलेल्या एका माणसाला घेऊन तळघराच्या उलट बाजूनं तो वर आला.

रस्त्यावर येतांच त्यानं पाहिलं तर ज्यूमंदिराशेजारची इमारतहि जळते आहे. तिच्या तळघरांत चौदा माणसं आहेत. हें आठवून तो तिकडे धावला.

इकडे बार्लोला शोधणाऱ्यांची खात्री झाली की, बार्लो जळून गेला. स्लोएनला ही बातमी कळतांच ती दुःखानं वेडीच झाली. कॉटवर निजून अश्रू ढाळीत असतां कुणीतरी चहा आणून ठेवला.

तेवढ्यांत दार उघडलं. स्लोएन डोळे ताणून ताणून पाहूं लागली. खोलींत सर्वत्र स्तब्ध झालें. बार्लोची नजर चहाकडे गेली. तो पुढे येत म्हणाला,—

" चहा घेऊं का मी तो ? "

कुणीच बोललं नाही तेव्हा चमकून त्यानं विचारलं,—" काय झालंय् काय सर्वांना ! "

मग स्लोएन रडूं लागली- हुंदक्यांतच ती म्हणाली,—

" आम्हाला भलतंच वाटलं "—

—१९—

पहाटें पांच सदतीसला शेवटचा बाँब पडला आणि पांच वावनला ' धोका संपला 'चा भोंगा वाजला. पहिला बाँब रात्रीं अकरा वाजून दोन मिनिटांनी पडला होता.

सकाळचे सहा वाजले. जॉन सीमनचा मुलगा केकची आठवण येऊन रडूं लागला. काल त्यानं अर्धाच केक खाल्ला होता. आणि अर्धा घरा-बरोबर जळून गेला होता. पण सीमन मुलाच्या अंगावर ओरडला नाही. त्यानं त्याला रडूं दिलं. जणूं हरपलेल्या जगासाठीच तो रडत होता.

अश्रू येण्याला आतां एवढं तेवढं कारण पुरत होतं. पिंगट रंगाचा धूर सर्व लंडन शहरावर पसरला होता. घरांच्या पडझडीवर आगी जळतच होत्या. आकाश जवळजवळ झाकलं होतं नि सूर्य तांबडालाल दिसत होता. हवा गरम होती आणि गंधक, रबर गॅस यांच्या वासानं कुंद झाली होती. एक सिनेमा पोस्टर उभं होतं त्यावर सिनेमाचं नांव होतं–" अशी एक रात्र गेली."

घरवाल्या केरसुण्या घेऊन दारावाहेरच्या काचा आणि तुकडे बाजूला सारीत होत्या. जणू केरसुणीनंच त्या जर्मन हल्याला तोंड देत होत्या. रस्त्यावरून जाणाऱ्यांचे कपडे नि तोंडें काळीं झालेलीं होतीं. जणू सर्वजण कोळशाच्या खाणींतून आलीं होतीं. आतापर्यंत कावूंत ठेवलेलीं मनं आतां केव्हाहि उसळतील असं त्या चेहऱ्यावरून वाटत होतं.

पडदा सोडावा तशी शांतता कांही भागांत होती. भोवतालच्या प्रदेशांत जळलेले कपटें आकाशांत फिरत होते. उरलेल्या छपरावर आणि पुलावर कबुतरं डोळे मिचकावीत स्तब्ध बसलीं होतीं. गरीब, श्रीमंत, प्रसिद्ध, अप्रसिद्ध सारे नष्ट झालेल्यासाठी रडत होते.

स्टाल्ही अजून रडत नव्हती. ओठ दाबुन ती अश्रू मागे सारीत होती. तिच्या एका शाळामैत्रिणीनं येऊन तिला स्वच्छ रुमाल दिला. जरा वेळ दोघी बोलल्या मग एकदम स्टाल्हीनं विचारलं,

"वुइंडसर गेला ना ?"

मैत्रिणीनं मान हलवली. स्टाल्ही म्हणाली,

'मला वाटलंच'

आणि मुकी बसली.

मैत्रीण गेली नि स्टाल्हीची बहिण आली. तिनं बरोबर जिम नॉर्मनला आणलं होतं. हा तिच्या भावाचा मित्र. हा नेहमी तिच्या आत्याच्या घरीं येत असे. स्टाल्ही नि तो कित्येक वेळां टेनिस खेळलीं होतीं. चर्चलाहि गेलीं होतीं. तो जवळजवळ घरचाच वाटत आला होता. पण त्याला आज पहातांच तिला विशेष बरं वाटलं.

त्यानं तिची सायकल घराच्या पडझडींतून काढून आणली होती. बोलतां बोलतां स्टाल्हीनं घर पडलं म्हणून आत्या रागवेल अशी भीति व्यक्त केली. पण नार्मननं तिला निश्चिंत व्हावयाला सांगितलं. आत्यानं लावलेलीं फुलझाडं वांचली तर बघणार आहे असंहि तो म्हणाला. एकंदरींत त्याच्या मोकळ्या आणि शांत वागण्यानं तिला इतकं बरं वाटलं की, तिला रडूंच यायला लागलं.

## —२०—

जिकडे तिकडे माणसं आपणच आपल्या मृतांना पुरीत होतीं नि दुःखाशी सामना देत होतीं. चर्चिल कॉमन्ससभेची जळकी इमारत पहात होता आणि पहातां पहातां त्याच्या डोळ्यांतून अश्रू गळूं लागले. जरा वेळानं त्यानं लढवय्या-सारखी मान उंच केली, चिरूट पेटवला नि शरीरसंरक्षकाला म्हणाला,–"मी तरी माणूसच आहें नाही ?" दुसऱ्या मिनिटाला तो तेथून बाहेर आला. तोंडांतला चिरूट त्यावेळीं रागावल्या-सारखा दिसत होता आणि चेहरा म्हणत होता–यांतून आम्ही बाहेर येणारच.!

या सर्व हलकल्लोळांत अनुचित प्रकार झाले नाहीतच असें नाही. ग्रेसचर्च रस्त्यावरील एका तयार कपड्यांच्या दुकानांत फुटक्या शो-केसच्या काचांतून आंत जाऊन लोकांनीं हाताला लागतील ते कपडे चोरले. कांही ठिकाणीं चोरट्यांनी बंबवाल्यांच्या पाण्याच्या नळ्यांची पितळी टोपणें लुटलीं, उपनगरांतून बॉंबहल्ले थांबतांच सणासारखे पोषाख घालून स्त्री पुरुष मुलें हजारोंनी लंडन पहायला आलीं. त्यांनी हाटेलांतील पदार्थ संपवले, चहाचीं उपहारगृहें रिकामी केलीं, आणि बस व ट्रामना रांगा लावल्या. एका पोलिसाची मोटार थांबवून चार स्टंट पोरांनी विचारलं,—

" सगळ्यांत गम्मत कुठं पहायला मिळेल ? " चार मिनिटं त्या पोलिसांनी हव्या त्या शब्दांत त्या पोरांना झाडलं तेव्हा त्यांचा राग शांत झाला.

असे कांही प्रकार झाले तरी कामें अधिक जोरांत चालू होतीं. समाजांत नेहमीच त्यागी माणसं थोडीं. पण जनतेची जर त्यांना सक्रिय सहानुभूति असेल तर रसातळाला चाललेला समाजहि वर येतो. केवळ चांगलं असून भागत नाही तर चांगलीं कामं करावीं लागतात. म्हणजे वाईट वागणाऱ्यांचा प्रभाव कमी होतो हा अनुभव येथेहि आला.

आगी विझविण्याचें, पडलेल्या घरांच्या राशी हलवण्याचें आणि रस्ते चालू करण्याचें काम चालूच होतें. प्रथम काम नंतर बाकीचं हें वाक्य लाखोंच्या तोंडीं होतं. देशाला ज्याचा अभिमान असतो अशा ऐतिहासिक वस्तू–चित्रें–इमारती खाक होऊन गेल्या होत्या. पण जणू आपण नवा इतिहास घडवणार या ईर्षेनं लोक वागत होते. सगळेच या वृत्तीचे नसतील. पण जे कांही होते त्यांनी खरोखरच इतिहास घडवला आणि या काळांत ज्यांनी चोऱ्या केल्या, भ्याले, स्वस्थ बसले त्यांनीं स्वतःलाच लाज आणली.

## —२१—

बॉंबहल्ला चालू असतां जनतेची कसोटी लागली त्याहूनहि हल्ला संपल्यावर अधिक कसोटी लागणार होती. आजचा हल्ला संपला, उद्या कशावरून येणार नाही ? मेजर जॅक्सनपुढ हा विक्राळ प्रश्न होता. बाहेरून हजार बंबवाले थकलेल्या बंबवाल्यांची जागा घेण्यास हवे होते आणि पांचशे तरी पंप लंडनच्या लगत पाहिजे होते. पुन्हा हल्ला आला तर बाहेरून येणाऱ्या बंबवाल्यांवर केवढी जबाबदारी होती ! आणि त्यांना तर लंडनमधील एक रस्ता ठाऊक नव्हता. शेकडो आगी अजून धगधगत होत्या. रात्रीं या आगी म्हणजे बॉंब टाकणाऱ्या विमानांना चांगल्या वाटाड्याच होणार होत्या.


खरं म्हणजे जर्मन विमानदल पुन्हा कांही काळ लंडनकडे वळणा-रच नव्हतं पण त्या दिवशीं हें कुणाला ठाऊक होतं ? तसे लहान-सहान हल्ले लंडनवर पुढे झाले. पण असा हल्ला होणार नव्हता.

नंतरच्या जर्मन वर्तमानपत्रांतून मथळे झळकले 'काय चर्चिल-साहेब ! रग जिरली की, आणखी खुराक हवाय् ?' शनिवारसारखाच

(पान ५६ वर पहा)

'माणूस'च्या प्रतिनिधींनी संग्रहित व संकलित केलेलें
पानशेत धरणाच्या पुण्यांतील प्रलयाचें इतिहास कथन...

# पुणं ...ही शूरतरी



लेखांक : पहिला

—१—

**या** दिवसांत पुण्यांत हा अनुभव यावयाचाच. श्रावणांतल्या एखाद्या मंगळवारची मध्यरात्र झालेली असावी. सगळीकडे अगदी सामसूम असावी. पावसाची मधूनच एखादी श्रावणसर घराच्या पत्री छपरावरून तडतडतड करीत नाचत जावी. आपली झोपमोड व्हावी अन् मग त्या चिडीचिप्प वेळीं ठिबकत्या पागोळ्यांपलिकडून कुठल्या तरी घरांतून मंगळागौर जागवणाऱ्या मुलींच्या खेळाचा गोड धिंगाणा कानीं पडावा. झिम्म्याचा ताल, बांगड्यांचा आवाज, हास्याची खळखळ, फुंगड्यांची दणदण, उखाण्यांची उधळण आणि ठेवणींतल्या गाण्यांची उजळणी चालू असावी. अन् त्यांतच फेर धरून टाळ्यांच्या तालावर म्हटलेलं असं एखादं गाणं ऐकू यावं—

**काय बाई पुण्याची तारीफ, लवंगा निघाल्या बारीक।**
**शनवारवाड्याच्या साभोरी, झुलते सोन्याची अंबारी।**
**डंका पुण्याचा दणदणतो, पेशवा सवाई आंदुळतो।**
**पाणी मुठेचं अवखळ ग, सूनबाई घागर सांभाळ ग।**
**पाणी मुठेचं चढलन् ग, फलटण गोऱ्यांची बुडलीन् ग।**
**पाणी मुठेचं वाढलन् ग, मोंगल हैदर बुडलान् ग।**
**पाणी मुठेचं अवखळ ग, सूनबाई घागर सांभाळ ग।**

अन् असंच पुढे किती तरी. तें ऐकतां ऐकतां पुन्हा आपल्याला अलगद गोड झोप लागून जावी अन् दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर आपल्या जिभेला चिकटून बसावी त्यांतलीच एखादी ओळ—

**पाणी मुठेचं अवखळ ग, सूनबाई घागर सांभाळ ग।**

वर्षन् वर्ष पुण्यांतल्या पोरी हें गाणं म्हणत आहेत. आणि सूनबाईला मुठा नदीच्या अवखळपणापासून घागर सांभाळण्याचा इशारा देत आहेत.

तरीहि अखेर गेल्या बारा जुलैला ह्या अवखळ मुठा नदीच्या प्रवाहांत पुण्याच्या असंख्य लेकीसुनांच्या घागरी वाहून गेल्याच! केवळ घागरीच नव्हे तर त्यांचीं सर्व भांडीकुंडीं, दागदागिने, घरेंदारें, अवघे संसारचे संसारच मुठेने हिसकावून ओढून नेले. कित्येकजणींना तर तिने अंगावरच्या साडीचोळीशिवाय कांहीहि शिल्लक ठेवलं नाही. कित्येकजणींवर ती इतकी संतापली की, त्यांचें सर्वस्व नेलेंच, पण त्यांचीं मुलेंमाणसेंहि तिने ओढून नेलीं. दुधाच्या बाळ-

वाट्या, कुंकवाचे करंडे आणि सुखाने भरलेल्या घागरी उलथ्या पालथ्या करीत तिने हिरावून नेल्या !

आजवर हें असं कधी घडलं नव्हतं. आज कमींतकमीं एक हजार वर्षं उलटून गेलीं. ह्याच मुठा नदीच्या विशाल कांठावर विशाल थाटाचा संसार मांडून ही पुण्यवती पुण्यनगरी सुखानें नांदते आहे. पण तिच्या संसाराची एवढी भयंकर नासाडी मुठेने केल्याचं कुणालाहि आठवत नाही. इतिहासाला विचारलं तर तोहि नाहीच म्हणतो.

आळंदीला ज्ञानेशांनी समाधि घेतल्यानंतर आणि महाराष्ट्राचें यादवराज्य अल्लाउद्दिनाने जिंकून घेतल्यानंतर पुण्यावर अनेकदा अस्मानी आणि सुलतानी संकटांचा कहर उसळला. कत्तली झाल्या. लुटी झाल्या. गाढवांचे नांगर फिरले. अपहरणें झालीं. सुलतानांनीं उभ्या गावाला वणवे लावून राख केली. अकाळविकाळ दुष्काळ पडले. पण मुठा नदीने पुण्याचा घात केल्याचा दाखला इतिहासाच्या दप्तरीं नमूद नाही.

स्वराज्याच्या कालांतही निजामाने इ. १७६३ सालीं धाड घालून पुणें लुटलें आणि जाळून टाकलें. यशवंतराव होळकरांनी इ. १८०२ सालीं पुणें लुटून फस्त केलें. इंग्रजांनी इ. १८१७ सालीं तें जिंकून गुलाम केलें. पुन्हापुन्हा दुष्काळ पडले. तुफान वादळें झालीं. प्लेगने त्याला त्राहि भगवान् केलें. रँडसाहेबाने त्याला छळून पिळून काढलें. इथे जातीय दंगे झाले. १९४८ सालीं महात्माजींच्या हत्येनंतर पोटजातीय दंगलीही झाल्या. त्यांत अग्निप्रलय उडाला. सर्व सर्व अमानुषी आणि अतिमानुषी प्रकार इथे घडले. पण मुठा नदीने मात्र पुण्याला कधीही दगा दिला नाही.

मुठा तशी मोठी समजूतदार. आपल्याच वेगांत आणि तोऱ्यांत चालणारी खरी; पण नाकासमोर पाहात चालणारी ही मुलगी. आपला रस्ता सोडून उगीच लोकांच्या भरल्या घरावावरांत घुसून हूडपणा करावा असा स्वभाव तिचा नव्हेच.

मुठा ही सह्याद्रीची मुलगी. जन्म तिचा 'वेगरें' गावचा. हें गाव मुळशी पेट्यांत आहे. म्हणजे मावळांत. ही मुलगी अंगावांध्याने अगदी सडपातळ. पण अति चपळ. अति अवखळ. मावळपट्टींत बरसणाऱ्या जलधारा आपल्या ओटींत घेऊन 'मुठाबाई' सासरीं जाते ! झाडून सारे लहानमोठे ओढे आणि नद्या तिच्यावरोबर तिच्या सासरीं पाठराखणी जातात. ऐन पावसाळ्यांत आपल्या भावाबहिणींची एवढी मोठी यात्रा बरोबर घेऊन मुठा पुण्याच्या पायरीला खेटून जाते; पण गेल्या शंभर वर्षांत फक्त दोनदाच असं घडलं की, कांठावरच्या कांही घरांत जाऊन तेथील संसाराची तिनं पहाणी केली ! इ. १८९६ सालीं पहिल्यांदा आणि इ. १९५८ सालीं दुसऱ्यांदा. पण तें सुद्धा अगदी हलक्या पावलाने ! एरवी दरवर्षी कांठालगतच्या देवदैवतांना एकदा स्नान घालून आणि पुण्यनगरीकडून खणानारळाची ओटी पदरांत घेऊन अगदी प्रसन्न मनाने आणि हसतमुखाने ती पुढे जाते. अगदी दरवर्षीचा असाच परिपाठ.

पण यंदा ? यंदा मात्र मुठेने विलक्षण थैमान घातलें. पुण्याची तिने अगदी दाणादाण उडवून टाकली. ज्येष्ठाच्या अवसेला मुठा भयंकर संतापली. परमावधीची चवताळली. कल्पनेच्या पलीकड. न भूतो न न भविष्यति !

पण कां ? कां खवळली ती इतकी ? तिला कोणीं बोललं का ? चिडवलं का ? तिचा अपमान केला का ? आपल्या एकेका लाथेच्या ठोकरीने पुण्यांतलीं शेकडो घरें उधळून देत आणि असंख्य मुलामाणसांचे बळी घेत घेत ती शहरांत इतकी संतापून कां घुसली ?

आता खरं सांगायचं म्हणजे मुठा मुळी संतापलीच नाही ! जी संतापली आणि जिने एवढें निर्दय थैमान घातलें तिचें नांव आहे 'अंबी' ! पुण्यावर पहिली चाल ह्या अंबीने केली. खडकवासल्याजवळ अकरा मैलांवर असलेल्या पानशेत नांवाच्या एका चिमुकल्या गावाजवळून ही अंबी वहात येते आणि पुढे मुठेला सामील होते. म्हणजेच मुठेला असलेल्या खडकवासल्याच्या धरणांत ही उतरते ! ह्या अंबी नदीला पानशेतजवळ मातीचें १७० फूट उंचीचें धरण बांधण्याचा प्रचंड उद्योग नुकताच पुरा झाला होता. पण ह्या अंबिकेला तें खपलं नाहीं. ही बया भयंकर भडकली ! सारा प्रताप ह्या अंबीचा ! अन् सात तासांच्या हिच्या चिथावणीने मग मुठाहि बिथरली ! खवळली ! पुण्यांतलें रामायण त्यांतूनच घडलें !

—२—

## त्या भीषण प्रलयाची ही कथा

खडकवासला धरणांतील पाणी वाढत्या वस्तीच्या पुण्याला पुरें पडेना, म्हणून मुंबई सरकारने ह्या धरणाला पूरक असें एक नवें धरण बांधण्याचा संकल्प सोडला. हा संकल्प सोडला अंबी नदीच्याच भर पात्रांत ! स्थापत्यशास्त्राच्या महापंडितांनी सर्व पाहाणी, मोजणी, आखणी केली आणि पानशेतजवळ अंबीला धरण बांधण्यासाठी त्यांनी रेघ मारली.

दि. १० एप्रिल १९५७ रोजीं पानशेत धरणाचें स्वतंत्र कार्यालय उघडण्यांत आलें. खडकवासल्यापासून पानशेतपर्यंत रस्ता तयार झाला. तंत्रज्ञांच्या राहाण्यासाठी टुमदार घरांची छोटीशी वसाहत उभी राहिली अन् तिच्या शिवेवर वळणदार अक्षरांत एक पाटी झळकली, —'मोसेनगर'

सह्याद्रीच्या कुशींतला हा मावळी मुलख भारी भारी रमणीय. उंच उंच डोंगर, हिरवीगार झाडी, चिमुकलीं खेडीं, त्यांत इवली, इवली भातशेतांचे गालिचे आणि डोंगरदाटींतून खळखळत येणारी अंबी. कवि अन् चित्रकार यांना कल्पनेंतच जें दिसतं तें इथे साकार झालं होतं. धरण झाल्यावर तर ह्या सह्याद्रीचा थाट दिसणार होता कसा ? पांचूच्या अर्घ्यपात्रांत, निळ्या जळवंतीचा अर्घ्य घेऊन, भूमिपूजनास बसावा बळीराजाच जसा !

ह्या त्याच्या अर्घ्यप्रदानाने पुण्याची तहान भागणार होती आणि पुण्याच्या पूर्वेची पाऊण लाख एकर दुष्काळी भूमि बहरणार, फुलणार होती. अर्धपोटी अन् कित्येकदा तर पूर्ण उपाशी राहाणाऱ्या हजारो शेतकऱ्यांच्या मुखीं पोटभर घास पडणार होता. आनंदाने त्यांचीं मुलेंबाळें बागडणार होतीं.

पण त्याकरिता अंबीच्या खोऱ्यांतल्या शेतकऱ्यांना आपल्या घरांचा अन् वावरांचा कायमचा त्याग करावा लागणार होता. कारण हें धरण होणार म्हणजे त्यांचीं गावें, घरें व शेती धरणाखाली जाणारच ! त्याच्या मोबदल्यांत दौंडजवळ त्यांना जमिनी, घरें बांधायला जागा व इतर कांही मदत देण्याचें सरकारने ठरविलें होतें. सरकारी ट्रक्स-मधून त्यांना त्यांच्या संसारासकट नव्या ठिकाणीं पोहोचविण्याचेंहि ठरलें होतें. हें सारं खरं हो ! पण ह्या शेतकऱ्यांच्या पिढ्यान् पिढ्या ज्या काळ्या आईच्या जिवावर जगल्यावाढल्या, ज्या गावांत ते शतकानुशतकें नांदले, तीं घरेंवावरें एकदम सोडून दुसरीकडे जायचें ? एकदम माया तोडायची ? कासेचं वासरूं कायमचं ओढून दूर न्यायचं ? कसं कसं हें ?

पण हें अवघड काम मोठ्या मायेनं, आपुलकीच्या समजावणीनं आणि भविष्याच्या आशावादानं तेथील अधिकारी मंडळींनी मोठ्या कौशल्याने पार पाडलं. आणि काय सांगावं या मावळी मनाचं मोठेंपण! त्यांनी सारे सारे प्रेमपाश आवरून आपले संसार आवरले. डोळे पुसले. बायकामुलें आणि गाईवासरें घेतलीं. आपआपल्या शेतांतील मूठमूठ माती पदरांत बांधून घेतली. गावच्या देवदेवतांचें अखेरचें दर्शन घेतलें. गावाच्या भूमीला साष्टांग दंडवतं घातलीं. मान फिरवली आणि भजन करीत करीत त्यांनी आपलीं गावें सोडलीं ! जय जय रामकृष्ण हरि। जय जय पांडुरंग हरी।

शिवजीमहाराजांच्या एका अत्यंत प्याऱ्या सरदाराचं गाव आणि घर पानशेतपासून अगदी जवळ आहे. गावाचें नांव 'मोसें' आणि त्या सरदाराचें नांव बाजी पासलकर. पानशेतला होणाऱ्या धरणाला आमच्या बाजी पासलकराचेंच नांव द्या, असा ह्या भागांतील झाडून साऱ्या मावळ्यांचा मा. यशवंतराव चव्हाणांपाशी हट्ट होता.

गावें उठलीं आणि प्रचंड यंत्रांचीं चाकें फिरूं लागलीं. दोन अडीच हजार स्त्रीपुरुष धरणाच्या कामावर राबूं लागले. आपल्या एकाच ओंजळींत शंभर सव्वाशें घमेलीं माती उचलणारे 'डंपर्स', शंभर गेंड्यांचं बळ अंगीं असलेले माती उकरणारे 'स्क्रेपर्स' आणि 'ट्रॅक्टर्स' भयंकर आरडाओरडा करीत राक्षसासारखे कामाला लागले. प्रचंड क्रेनूस् बगाडासारखे झुलूं लागले. एकाच ढुशींत हत्तीएवढाले मातीचे ढीग रेटीत नेणारे 'बुलडोझर्स' मातीशीं टकरा खेळूं लागले. कामगारांच्या आरोळ्यांनी आणि गाण्यांनी पानशेतचा परिसर भरून गेला. शंभरशंभर सुरुंग एकदम धडाडूं लागले. खडकाच्या काळजाचे कप्पे उंच उडूं लागले. इशाऱ्याचीं तांबडीं हिरवीं निशाणें फडफडूं लागलीं. शिट्ट्या वाजूं लागल्या. तिकाटण्यावर दुर्बिणी लागल्या. कमरेंत वाकून आणि एक डोळा झाकून शास्त्रज्ञ आखणीपाहाणी करूं लागले.

आणि या सर्व कामाची जबाबदारी पडली एका उत्साही प्रौढ स्थापत्यविशारदावर. श्री. शरच्चंद्र मनोहर भालेराव हें या विशारदाचें नांव. श्री. भालेराव व त्यांचे विश्वासू सहकारी श्री. पानसे यांनी पानशेतजवळ अंबीला हा एवढा मोठा मृत्तिकेचा कमरपट्टा घालण्याची सर्वथैव कामगिरी आणि जबाबदारी मोठ्या हौसेने उचलली.

हें धरण पूर्ण व्हायला एकूण पांच वर्षें लागणार होतीं. काम काय लहान होतें तें ? धरणाची लांबी २७०० फूट, उंची १७० फूट. धरणाच्या तळाची रुंदी सुमारे १००० फूट आणि माथ्यावर रुंदी ३० फूट. संपूर्ण धरण मातीचें. मातीचीं धरणें स्वस्तांत होतात. असतातहि बळकट. जगांत कितीतरी प्रचंड धरणें मातीचीं आहेत. अमेरिकेंत तर एक धरण ४५६ फूट उंचीचें आहे !

श्री. भालेरावांच्या नेतृत्वाखाली सर्व तंत्रज्ञ व कामगार एकदिलाने काम करूं लागले. जणु 'पानशेत' हें एक कुटुंबच झालें. पहिला उन्हाळाभर कामें झालीं. पावसाळा आला तशी कामें थांबलीं. धरण-कामगार शेतावर गेले. कॉलनींत गणपतीची स्थापना झाली. सर्वांच्या सांगाती गणपति दहा दिवस नाचला खेळला. अनंतचतुर्दशीला लेजीम–ढोलांच्या धुंद तालावर गुलाल उधळीत मंगलमूर्तीची मिरवणूक निघाली. अंबीच्या प्रवाहांत गणरायाचें विसर्जन झालें. पुनरागमनाय.'

दि. १० एप्रिल १९५८ हा दिवस उजाडला. धरणकामाचा हा दुसरा वाढदिवस. धरणावरील झाडून सारे 'कर्मयोगी' एकत्र जमले. अगदी श्री. भालेरावांपासून ते छोट्या कामगारापर्यंत.

सर्वजण रोज धरणावर उत्साहाने, एकजुटीने आणि जिव्हाळ्याने खांद्याला खांदा लावून राबत होते. आज ते त्याच जिव्हाळ्याने मांडीला मांडी लावून जेवणार होते! जेवले! हसले, खिदळले, खेळले, आणि पुन्हा कामास लागले.

अपेक्षेपेक्षाहि झपाट्याने व बळकटीने पानशेतचें धरण पुरें होत आलें. भारत सरकारच्या जल व शक्तिसंशोधन केंद्राच्या विभागाचे एक सदस्य श्री. के. एल. राव हे पानशेतला भेट देऊन गेले. त्यांना फार समाधान झालें. दोन वर्षांनंतर पूर्ण होणारें हें काम आधुनिक यंत्रसामग्रीच्या वापराने एक वर्षांतच पूर्ण होण्याची शक्यता आहे असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला.

—३—

इ. १९६१ साल उजाडलें. धरणाच्या उजव्या कडेने अंबीला वहात जायला ठेवलेली वाट फक्त बंद करायची राहिली ! बाकीचें धरण पूर्ण झालें ! २७०० फूट लांबीच्या धरणापैकी फक्त १५० फूट लांबीची ही वाट बंद केली, की झाला अंबीचा कमरपट्टा पूर्ण ! अर्थात् याच ठिकाणीं या धरणाला द्वारें ठेवण्यांत येणार होतीं. ज़रूर तेव्हा पाणी बाहेर सोडण्यासाठी वा बंद करण्यासाठी.

परंतु हीं द्वारें बसविण्याचें काम कांही कारणास्तव लांबणीवर पडत गेलें व तें पुरें व्हायला मार्च महिना उजाडला. मार्चच्या तिसऱ्या आठवड्यांत धरणाची शेवटची खिंड बुजविण्याचें काम हातीं घेण्यांत आलें. तळाशीं तीस फूट, उंचीला १७० फूट व माथ्याशीं दीडशे फूट लांब असणारी, इंग्रजी 'व्ही' या अक्षरासारखी थोडीफार दिसणारी ही खिंड भरली की, नदीचें पात्र अडविलें जाणार होतें. धरणाच्या तलावांत पाणी सांठूं लागणार होतें.

पावसाळा लागायच्या आंतच हें सर्व काम संपायला हवें होतें. खिंडार पूर्ण भरलें नाही तर सांठलेलें पाणी धरणाच्या भिंतीवरून वाड

लागेल. आणि मातीच्या धरणावर एकदा का पाणी वरून वाहूं लागलें की, धरण संपलेंच. म्हणून नेटाने कामास प्रारंभ झाला. दिवसपाळ्या रात्रपाळ्या याकडे कोणीं पाहिलें नाही. रात्रीच्या अंधारांत वाघांनी गुरगुरावें तशीं यंत्रें गुरगुरत फिरत होतीं. विजेच्या आडव्यातिडव्या प्रकाशझोतांत माणसें राबत होतीं.

आणि मेच्या दुसऱ्या आठवड्यांत पानशेतवर वळवाने फाटक्या पखालींतून सडा घालायला सुरुवात केली. भयंकर मुसळधार पाऊस पडला. एकदाच नव्हे कांही दिवस! धरणावरचें काम बंद ठेवावें लागलें. एकूण बारा दिवस यामुळे वाया गेले.

याच मे महिन्याच्या दि. २२ ला सायंकाळीं पुण्याला त्र्याहत्तर मैल वेगाचें वादळ झालें! हें महाभूत खवळलें. खूप नुकसानी झाली. विद्युत्‌यंत्रांत बिघाड झाला. पुणें अंधारांत लुप्त झालें. जणू पुण्याची डावी पापणी फडफडली.

—४—

जून उजाडला. पानशेत धरणावर पावसाच्या सरी कोसळतच होत्या. या महिन्यांत कामाचे बहुमोल असे सात दिवस वाया गेले.

दिनांक १५ जूनला धरणांत १६ कोटि ४० लक्ष घनफूट पाणी होतें. दि.३० जूनला पाण्याचा साठा ११० कोटि घनफुटापर्यंत एकदम वाढला.

आणि मग धो धो पावसाला आरंभ झाला. भयंकर पाऊस! इतका पाऊस ह्या भागांत कधीच पडत नाही. जून ते ऑगष्ट ह्या तीन महिन्यांत मिळून येथे दरवर्षी सुमारे ८५ इंच पाऊस होतो. पण यंदा ९ जुलैपर्यंतच यांतील ६१ इंच पाऊस होऊन गेला. आणि त्यांतहि ३० जून ते ९ जुलै ह्या दहा दिवसांतच ३७ इंच पाऊस झाला! ! आणि ९ जुलैच्या एकाच दिवशीं १०।११ इंच पाऊस कोसळला! ! ! जें पानशेत धरण हळूहळू भरत जाईल ही कल्पना होती तें धरण एकदमच भरलें! धरणांतील पाण्याची पातळी १६१ फुटाला पोहोचली! ९ दिवसांत पाण्याचा सांठा जवळजवळ पांचशे कोटि घनफुटांनी एकदम चढला.

पानशेतची सबंध दरी पावसाने, धुक्याने आणि ढगाळ वातावरणाने काळवंडून सुन्न होऊन गेली. पानशेत कॉलनींतील सेवकवर्गाने धरण पूर्ण झाल्याबद्दल निरनिराळे कार्यक्रम पूर्वीच ठरविले होते. दि. ९ ला सत्यनारायण व रात्रीं गायन असाहि एक कार्यक्रम ठरला होता. लोकानी अतिशय हौसेने हॉल सजविला. सत्यनारायणहि झाला. पण पावसाच्या भयंकर माऱ्याने हॉलमध्येहि पाणी आलें. जमिनीवर तट्टे पसरून लोक बसले. रात्रीं १० ते २ पर्यन्त सुप्रसिद्ध लेखिका व गायिका कु. योगिनी जोगळेकर यांचें गायन झालें. बाहेर आकाशांतून घागरी सांडतच होत्या. या कार्यक्रमाला श्री. भालेराव हजर राहूं शकले नाहीत. पूर्वी ठरलें होतें म्हणून सर्व कार्यक्रम झाले; पण कोणाचीहि मनःस्थिति ठीक नव्हती.

दि. १० जुलैचा दिवस उगवला. नवीनच पूर्ण केलेल्या भागांतून अधूनमधून पाणी झिरपून बाहेर पडत होतें. प्रथम प्रथम असें पाणी निघतेंच. त्यांत भीति किंवा नवल कांहीच नव्हतें. झिरपणीवर नेहमीचा उपाय म्हणजे माती, मुरूम, सीमेंट, वाळूचीं पोतीं यांचा भराव टाकणें. हा उपाय श्री. भालेरावांनी सुरू केला. लोक कामाला उतरले. पोतीं भरलीं जाऊं लागलीं.

पाऊस पडतच होता. आणि एक भयंकर गोष्ट घडत होती. ती म्हणजे वादळ. सोसाट्याचा वारा. त्याचा वेग ताशी २५ ते ३० मैल होता. वाऱ्याने लाटा उठत होत्या. पाण्याचा दाब धरणावर वाढत होता.

झिरपत्या भागावर भराव टाकण्यास सुरुवात झाली. सतत काम चालूं होतें. भर पावसांत. पण तरीहि स्थिति कायमच! चिखल, पाऊस, धुकें व वारा इतका होता की, धरणाला नेमकं काय झालंय याचा लौकर अंदाज येईना.

आणि क्षणाक्षणाला परिस्थिति गंभीर होत चालली! पानशेतचे कामगार, स्टाफ, ऑफिसांतील नोकरवर्ग, इतकेंच नव्हे तर स्त्रिया आणि कित्येक मुलेंहि धरणावर चालू असलेल्या भराव टाकण्याच्या कामावर आलीं! सर्वच लोक कामाला लागले.

धरण खचत होतें! सबंध दिवस आणि रात्रभरहि सर्वांचीं हींच कामें चाललीं होतीं. पोत्यांत वाळू भरणें आणि पोतीं खचणाऱ्या भागावर आणून टाकणें!

श्री. भालेराव यांनी आपल्या वरिष्ठांना या बाबतींत काय कळविलें, केव्हा कळविलें याबाबत आताच काय लिहिणार?

दि. ११ चा दिवस उजाडला. लोक काम करीतच होते. श्री. भालेराव धरणावर नजर देऊन सतत उभे होते. भयंकर पावसाने धरणाला जबरदस्त 'रक्तदाब' झाला होता. वारा भळाळत होता. अंबी लाटा उडवीत धुसफुसत होती. सतत पोतीं, दगड, मुरूम टाकूनहि खचायचा भाग खचतच होता.

लोक सतत श्रम करून अतिशय दमले होते. ह्या लोकांना थोडी तरी विश्रांति हवी ना? पण कामहि थांबून चालणार नाही. मग ताज्या दमाचें नवें मनुष्यबळ कोठून आणावें? परिस्थिति जास्तच गंभीर होत होती. अखेर श्री. भालेरावांनी लष्कराच्या बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रूपला बोलावून घ्यायचे ठरविलें व त्याप्रमाणे पुण्याकडे निरोप दिले. त्या वेळीं दुपारचे दोन वाजले होते.

याच सुमारास केव्हा तरी मुंबईहून बांधकामखात्याचे वरिष्ठ अधिकारी श्री. मणेरीकर व श्री. देसाई पानशेत धरणाला 'धावती' भेट देऊन गेले.

—५—

पानशेतचें सोनेरी स्वप्न साकार होऊन डोळ्यादेखत विरघळत होतें. वारा सुसाट सुटला होता. काळ्या ढगांनी आभाळ गच्च भरलें होतें. पाऊस पडतच होता. धरणांतील अपेक्षेपेक्षा जादा चढणारें पाणी परस्पर बाजूने काढून लावून बाहेर सोडण्याकरिता जी सांड खोदलेली होती ती पानशेत कॉलनीच्या व पुण्याकडून येणाऱ्या रस्त्याच्या मधून वाहत होती. ही सांड धरणाच्या १६२ फूट उंचीवर आहे. पण तिच्यांतून एखाद्या तुफानी नदीसारखें पाणी उसळून वाहत होतें. म्हणजेच या सांडेमुळे पुण्याहून येणारा पानशेतचा रस्ता बंद झाला होता!

पुण्याहून बॉम्बे इंजिनीयरिंग ग्रूपचे दोनशे जवान निघाले. कर्नल ब्रॅगांझा आणि कॅप्टन बक्षी यांच्या नेतृत्वाखाली ही तुकडी लष्करी मोटरींतून कूच करून निघाली. सायंकाळीं सात वाजण्याच्या सुमारास

ती पानशेतजवळ पोहोचली. वाटेवरच्या प्रत्येक गावांतलीं माणसें संचित होऊन बसलीं होतीं. धरणाला कांही तरी झालंय् एवढंच त्यांना समजलं होतं.

लष्करी जवानांची तुकडी आली. पण वाटेवरच धरणांतील सांडपाण्याची नाली घो घो वाहत होती. पलीकडे जायचें कसें? धरणाची जखम बुजवायला मदतहि चटकन् येऊं नये, असाच जणू अंबीचा डाव होता! अखेर केबलचा पूल करून एक एक जवान पैलतीरावर गेला. फार वेळ लागला, पण निरुपाय होता.

जिकडे तिकडे चिखल झाला होता. पावसाच्या घो घो वृष्टीमुळे सर्व सृष्टीच ओलीचिंब होऊन थबथबत होती. वाऱ्याला वेड लागलं होतं. अंबीबद्दल तर आतां बोलायची सोयच उरली नव्हती.

कॅ. ब्रॅगांझा व कॅ. बक्षी ताबडतोब भालेरावांच्याकडे गेले. भालेराव अगदी सुन्न होऊन धरणाकडे पाहत बसले होते. शब्द व संवेदना थांबल्या! ब्रॅगांझांना त्यांच्या मनःस्थितीची स्पष्ट कल्पना आली होती. तेवढ्यांत वृत्तपत्राचे एक प्रतिनिधि धरणाची स्थिति पहाण्यासाठी म्हणून तेथें आले होते. कॅ. ब्रॅगांझांनी त्या प्रतिनिधींना बाजूला घेऊन म्हटलें, "कांहीहि करा! मिस्टर भालेरावांना तुम्ही बोलायला लावा!"

प्रतिनिधीने आपली सिगारेटची पेटी उघडून भालेरावांपुढे धरली व सिगारेट स्वीकारण्याची विनंती खुणेने केली. भालेरावांचा हात पुढे होईना!

तिघांनाहि धास्ती वाटूं लागली. कांहीहि करून हे बोललेच पाहिजेत. ह्यांच्या मनावरचा ताण कमी झालाच पाहिजे. अतिशय ताणलेल्या व दुःखी मनःस्थितींत माणूस सुन्न राहणें बरें नव्हे आणि मग त्या प्रतिनिधीने म्हटलें, "आम्हांला धरण वचायचं आहे!"

अन् भालेराव लगेच उठले. घोंघावत्या वाऱ्यांत ते रेस्ट हाउसमधून बाहेर आले. प्रतिनिधि, ब्रॅगांझा व बक्षी यांच्यासह ते गाडींत बसले आणि धरणावर आले.

वाऱ्याने लाटा धडाधड आपटत होत्या. धरणावर गुडघा गुडघा चिखल झाला होता. लाटांचा आवाज उठत होता. दिवस मावळत होता, सारं वातावरण कसं एखाद्या भयाण स्मशानभूमीसारखं वाटत होतं. लोक पोतीं भरून आणून टाकीतच होते. ज्येष्ठाच्या वद्य चतुर्दशीची रात्र काळोख पेरीत हळूहळू येत होती.

श्री. भालेरावांनी धरणाचा नेमका धोक्याचा भाग लष्करी अधिकाऱ्यांना दाखविला. भयंकर भीषण दृश्य होतं तें. भणाणत्या वाऱ्याकडे पाहत भालेराव म्हणाले, "पाऊस कितीहि पडेना का, पण हा वारा नको होता!"

पण तें कुणाच्या हातीं होतं? वारा इतका होता की, पानशेतला ठेवलेला वायरलेस सेटहि या सुमारास बंद पडला होता.

ताज्या बांधकामापैकी सुमारे ७० फूट लांबीचा भाग ७ फूट खाली दबला होता! असाच खाली खाली मंद गतीने तो दबत होता! पाण्याची पातळी अवघ्या तीन फुटांवर खाली होती!! आणि असाच आणखी तीन फूट तो भाग खाली दबला तर—? छे छे! ती काळकल्पनाहि नको! अन् म्हणूनच गेले तीन दिवस पानशेतचीं अवघीं अवघीं माणसें जिवाचें रान करून खचणाऱ्या त्या भागावर पोत्यांची रास घालीत होतीं.

आता बॉम्बे ग्रूपचे जवान आले. ब्रॅगांझा यांनी असें ठरविलें की, बक्षींनी आपल्या जवानांसह धरणावर कामाला लागावें व स्वतः ब्रॅगांझांनी पुण्याला जाऊन जादा कुमक आणावी. त्याप्रमाणें ते स्वतः पुण्याला परतले आणि बक्षींनी कामाला सुरुवात केली.

अंधार पडला! जनरेटर्स सुरू करून मोठे मोठे प्रकाशझोत फेकण्यांत आले. त्या झोतांत धरणाच्या लाटा चमकत होत्या. नव्हे मृत्यू दात विचकीत हसत होता. माणसाच्या दुबळ्या धडपडीला तो जणूं हसत होता. चिखलांतून चबक चबक पावलें पडत होतीं. धपाधप पोतीं पडत होतीं. चिखल उडत होता. लोक नखशिखांत मातीने माखून गेले होते. जणू मातीचीं मोठीं मोठीं चित्रेंच सजीव होऊन काम करीत होतीं. रात्रीच्या काळ्याकुट्ट भयाण गर्भात ही सारी धावपळ चालली होती.

पोतीं आणून खचलेल्या भागावर टाकावींत अन् राक्षसाच्या जबड्यांत तिळाचे दाणे पडून कुठल्या कुठे ते दिसेनासे व्हावेत अशांतला प्रकार चालला होता. पोतीं टाकावींत अन् खाली दबत जावींत असें चाललें होतें.

तास झाला. दोन तास झाले. तीन, चार तास झाले. धरण खचतच होतें! लोक आपलें काम करीतच होते. पाण्याने आपले निकराचे हल्ले धरणावर चढवावयास सुरुवात केली. वाऱ्याने व लाटांच्या आवाजाने एकमेकांचे शब्दहि ऐकूं येईनासे झाले. अन् बोलायला तरी वेळ होता कुणाला? पानशेतचे भागीरथ आणि लष्करांतले जवान धरणाला पडत चाललेली ती काळदरी बुजविण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत होते. बक्षी आणि भालेराव त्यांना मार्गदर्शन करीत होते. धडपड चालू होती. धरण खचतच होतें. पाणी वर वर सरकत होतें. भरा भरा पोतीं येऊन पडत होतीं. पाणी तेवढ्यापुरतें थोपवलें जात होतें. नव्हे नव्हे, पुण्याचा अपमृत्यु थोपविला जात होता! जर धरण फुटलें तर—तर रातोरात ही बावीस मैल पसरलेली १६८ फूट उंचीची अक्राळ विक्राळ अंबी किंचाळत आक्रंदत पुण्यावर तुटून पडेल आणि शांत झोपलेल्या खेड्यापाड्यांचा आणि पुण्याचा संहार उडविल्याविना ती राहणार नाही याची खात्री होती सर्वांना.

जर ह्या माणसांनी कसूर केली असती तर—? त्या कभिन्न काळरात्रीं काय घडलें असतें? पुण्याच्या पेठापेठांत अन् घराघरांत काय दिसलें असतें? प्रेतावरचं लोणी अलगद खाणाऱ्या स्वार्थी नरपशूंना नि कुठेहि शिरून चोऱ्या करणाऱ्या सैतानहृदयी चोरांना त्या भागांत जाण्याची हिम्मत झाली असती का?

ती संहाराची रात्र कुणीं टाळली? ह्या सर्व लोकांनी ती टाळली. कुणी त्यांना शब्दाने धन्यवाद देवोत वा न देवोत, पण मानवतेचा इतिहास त्यांना कधीहि विसरूं शकणार नाही.

मध्यरात्र झाली. रात्रीचे सुमारे अडीच वाजले अन् एकदम सर्वांच्या काळजांत धस्स झालें! अचानक सर्व दिवे विझले! शॉर्ट सर्कीट झालें. जनरेटर्स बंद पडले. भयंकर अंधार! क्षणभर दिशा

उमजेनाशा झाल्या. सर्वच काळें काळें होऊन गेलें. काळें आभाळ, काळी जमीन, काळें पाणी, भविष्यहि काळें. नशिबच काळें!

पहाट होत होती. भीषण रात्र संपत होती. भीषण दिवस उगवण्याच्या मार्गावर होता. आतां धरण जरा अधिक गतीने खचूं लागलें. पोतीं रचलीं जात होतींच. पांच वाजून गेले. स्पष्ट उजाडलें. साडेपांच वाजले. अंबी दात खात होती.

यावेळीं श्री. भालेराव हे धरणाच्या जवळच उंचावर असलेल्या रेस्ट हाउसमध्ये गेले होते. ते येरझारा घालीत होते. धरण समोर दिसत होतें. लोक काम करीत होते.

दि. ११ च्या दुपारपासून दि. १२ च्या पहाटेपर्यंत जवानांच्या पोटांत अन्नाचा कणहि गेला नव्हता. उजाडतां उजाडतां कॅ. बक्षींनी सर्वांना चहाची सुटी दिली. जवानांचे हात थांबले. धरण निर्मनुष्य झालें. कॅ. बक्षीहि रेस्ट हाउसमध्ये जरा वेळ विसावण्यासाठी रवाना झाले.

आणि साडेसहा–सातच्या सुमारास बक्षी-भालेराव रेस्ट हाउसच्या बाहेर येऊन पाहतात तों काय?

पाण्याची पातळ चादर धरणाच्या खचलेल्या भागावरून वाहूं लागली होती.

काळपुरुषाच्या आगमनासाठी अंबीने ही सफेद पायघडी उलगडायास आरंभ केला होता.

धरण फुटलें होतें. अंबीच्या प्रचंड मुसंड्यांनी मातीचा हत्ती हळूहळू विरघळत होता.

क्षणभर धरणाच्या जन्मदात्याला असें वाटलें असावें की, अरुणीप्रमाणें आपल्या देहाचा बांध आडवा टाकून पाण्याचा हा प्रचंड लोंढा थांबवावा! पण सहस्रअर्जुनाचे हजार हातहि अपुरे पडावेत असाच यावेळीं अंबीचा थयथयाट चालू होता.

(अपूर्ण)

●●●

---

'लंडन' ती मृत्युंजयनगरी (पान ५० वरून चालू)

पुन्हा हल्ला करायचा का हें हिटलरच्या मनावर अवलंबून होतं पण त्याचं मन आता नक्की रशियाकडे वळलं होतं. या दिवशींच आणखी एक गंमत झाली होती. जें एकटं विमान लंडनवर मागील बाजूने आलं होतं नि सर्व त्यामुळं गोंधळांत पडले होते, त्यांत हिटलरचा एक हात–हेस–इंग्लंडशीं बोलणीं करायला जर्मनींतून गुपचुप पळून आला होता. हिटलरला त्याचं फार दुःख झालं. गोअरिंगनं लंडनवर पुन्हा हल्ला करण्याचं बोलणं काढलं तेव्हा हिटलर संतापानं ओरडला, "आधी रशियाला नमवीन मग इंग्लंडकडे बघतां येईल."

दैवाची लीला कशी थक्क करते! शनिवारच्या एका हल्ल्यांत पूर्वी हिटलरला जें हवं होतं तें जवळजवळ साधलं होतं. कांही आठवडे हल्ले करून जें झालं असतं तें काम एका हल्ल्यानं केलं होतं. सुसंस्कृत जगाचें एक आशेचें स्थान, लंडन खलास झालं होतं. त्या रात्रीं ज्या आगीं लागल्या त्या विझल्या नाहीत जळून विझल्या. नंतर अकरा दिवसांनी लंडनचा शेवटचा बंब पाणी टाकायचा थांबला. लंडनला भस्म करण्याची उत्तम संधी हल्ले थांबवून जर्मनीनं घालवली. दोही बाजूचे अनेक जीव नि संपत्ति बरबाद झाली. पण युद्धाच्या दृष्टीनं या हल्ल्याने कांहीच सिद्ध केलें नाही.

—२२—

लंडनच्या नागरिकांना तेव्हा पुढच्या संकटाची कांही कल्पना नव्हती. रविवारचा दिवस त्यांनी झगडण्यांत घालवला. लंडनच्या विख्यात ऑर्केस्ट्रातील वादनकारांनी एकदा आपल्या भस्मसात् रंगभूमीकडे पाहिलं. मग तेथील मोडतोडींतून जीं वाद्यें काढतां आलीं तेवढीं काढून याच दिवशीं दुसऱ्या रंगभूमीवर कार्यक्रम ठरवलाहि.

थॉमस सिडेन–नवरदेव–ठरल्याप्रमाणे चर्चमध्ये आला. त्याला समजलं की, आपली वधू अर्धा तास जळलेलं चर्च शोधीत होती. तियल्या भिक्षुकानं त्या तशाच चर्चच्या जागेवर दोघांचं लग्नहि लावून टाकलं.

जे कांही हाल झाले किंवा भोगलं त्याबद्दल गंहजब करायचा नाही असंच जणू नागरिकांनी ठरवलं होतं कांहीचे अंगावरचे कपडेच तेवढे राहिले होते. एका धर्मोपदेशकाने पट्ट्यापट्ट्याचा लेंगा घालून चर्चमध्ये धर्मोपदेश केला. जो तो सहज नेहमी वागावा तसा वागत होता.

अलेक्झांड्रा हॉटेलची दुर्दशा पाहून गेलेला एकजण तिथे चार तासानं परत आला तेव्हा वर पाटी लागली होती,

"पुनःश्च हरी ॐ! हॉटेल चालू आहे"

लाखो लोकांनी कर्तव्याची जाणीव राखली होती. अलेक्झांड्राची आग विझेपर्यन्त मिल्स उभा होता. अडकलेला प्रत्येक माणूस त्यानं बाहेर काढला होता. पुढारी किंवा जनता सर्वच काम आटपेपर्यन्त जाग्यावरून हलली नाहींत. वाटर्लू स्टेशन विझेपयन्त उभ्यानेंच जेवण घेत बंबवाले पाणी फेकीत राहिले.

—२३—

नंतर मात्र सर्वांना एकच इच्छा राहिली झोपेची. सौ. डॅलीबाई घरीं गेली. स्वच्छ कपडे घालतां घालतां थकव्यानं तिनं डोकं टेकलं. मिल्स आपल्या कचेरींत गेला नि एक दारूचा घुटका घेऊन ओंडक्या सारखा झोपला.

स्टाल्ही पण झोपेच्या गुंगींत इस्पितळांत बिछान्यावर पडली होती. तिला गुंगीच औषधच दिलं होतं. तिच्या वेदना त्यानं कमी झाल्या होत्या. पण थकवा भयंकर होता. बुइंडसर बद्दलचे शोकाचे विचार मनांत न आणण्याचा तिचा प्रयत्न चालला होता. तें करतां करतां तिला नॉर्मन्सचं सकाळचं प्रेमळ बोलणं नि गोड हसणं आठवलं. कां कुणास ठाऊक पण बुइंडसरशी त्याचा सारखेपणा तिला दिसला. आपल्या हें आधी कसं लक्षांत आलं नाही याचं तिला आश्चर्य वाटलं.

आणि–स्तब्ध, निश्चल आणि संकटग्रस्त लंडनच्या बाहेर हवा सोशीक गरम् होती. तिथं फुलांनी फुललेलीं हिरवीं कुरणं डोलत होतीं आणि पक्षी मंजुळ सुरांत गात होते. दुपारच्या प्रसन्न उन्हानं इस्पितळाच्या खिडक्या उजळून निघाल्या होत्या: मार्गारिटा स्टील्हा शांत झोपली होती.

●●●


---


'The city that wouldn't die'
रिचर्ड कॉलियरच्या पुस्तकाचा अतिसंक्षिप्त स्वैर अनुवाद.

# पुराचीं कांहीं दृश्यें


बारा जुलै १९६१

नवी पेठ





विठ्ठलवाडी · दुपारी दीडचा सुमार



पुलाची वाडी




कसबा पेठ




# खडकवासला



धरणाची लांबी : ४८०० फूट
धरणाची उंची : ९० फूट





टलेला भाग–

तळाशी
१०० फूट

माथ्याशी
२०० फूट

बांधणीकाल–

इ. स.
१८६३
ते
१८६९

संपादक–मुद्रक–प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर. ★ प्रकाशनस्थळ : राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव, पुणें २.
मुद्रणस्थळ : साधना प्रेस, ४३०–३१ शनिवार पेठ, पुणें २.